टिळक महाराष्ट्र विद्यापीठाच्या सामाजिक शास्त्र विभागातील इतिहास विषयातील एम.फिल. पदवीसाठी सादर केलेला संशोधन प्रबंध

# पुणे करार आणि तत्कालीन प्रसार माध्यमांनी घेतलेली दखल

एम.फिल. संशोधन प्रबंध

## इतिहास

संशोधक

**राजेंद्र अजिनाथ शिंदे**

एम.ए. (इतिहास)

**मार्गदर्शक**

**डॉ. अरुणचंद्र शं. पाठक**.

एम$^2$ .ए., एम.फिल., पीएच.डी (इतिहास)

मा.कार्यकारी संपादक आणि सचिव, दर्शनिका (गॅझिटिअर्स) विभाग,

महाराष्ट्र शासन, मुंबई

**इतिहास विभाग**

**टिळक महाराष्ट्र विद्यापीठ**

**सदाशिव पेठ, पुणे ४११ ०३०**

**जून २०१४**

# प्रमाणपत्र

प्रमाणित करण्यात येते की, टिळक महाराष्ट्र विद्यापीठाच्या सामाजिक शास्त्र विद्याशाखांतर्गत इतिहास याविषयाच्या विद्या निष्णात (एम.फिल) या पदवीसाठी **राजेंद्र अजिनाथ शिंदे** यांनी ''**पुणे करार आणि तत्कालीन प्रसार माध्यमांनी घेतलेली दखल**'' या विषयावरील शोध निबंधाचे काम माझ्या मार्गदर्शनाखाली पूर्ण केलेले आहे.सदर शोधनिबंधामध्ये त्यांनी नमूद केलेली माहिती आणि संशोधनात्मक विधाने माझ्या माहितीप्रमाणे बरोबर आहेत. सदर माहिती त्यांनी इतरत्र कोठेही वापरलेली नाही.

मार्गदर्शक

स्थळ :

दिनांक :

**डॉ. अरुणचंद्र शं. पाठक**

(एम. ए, एम .फिल, पीएच.डी.)

# प्रतिज्ञापत्र

मी, राजेंद्र अजिनाथ शिंदे, प्रतिज्ञापूर्वक प्रमाणित करतो की, ''पुणे करार आणि तात्कालीन प्रसार माध्यमांनी घेतलेली दखल,'' या विषयावरील संशोधन प्रबंध माझा स्वत:चा असून हा प्रबंध मी भारतातील किंवा भारताबाहेरील कोणत्याही विद्यापीठाला सादर केलेला नाही.

सदर संशोधन प्रबंध मी टिळक महाराष्ट्र विद्यापीठाच्या सामाजिकशास्त्र विद्याशाखांतर्गत इतिहास विषयातील विद्या निष्णात (एम.फिल.) पदवीसाठी सादर करीत आहे. हे संशोधन स्वतंत्रपणे केलेले असून संपूर्णपणे नवीन आहे. आवश्यक तेथे संदर्भ निर्देशित केलेले असून सदर माहितीचा प्रबंधाव्यतिरिक्त अन्यत्र कोठेही उपयोग केलेला नाही.

स्थळ :

दिनांक :

राजेंद्र अ. शिंदे

संशोधक

# ऋणनिर्देश

'पुणे करार आणि तत्कालीन प्रसार माध्यमांनी घेतलेली दखल' हा संशोधन प्रबंध पूर्ण करण्यासाठी मला अनेक व्यक्तिंचे सहकार्य आणि मार्गदर्शन लाभले. त्या सर्वांचे मन:पूर्वक आभार मानणे, हे मी माझे कर्तव्य मानतो.

प्रथमत: विद्या निष्णात (एम.फिल.) अभ्यासक्रमासाठी टिळक महाराष्ट्र विद्यापीठाने मला जी संधी उपलब्ध करून दिली, त्याबद्दल मी विद्यापीठाचे कुलसचिव डॉ. उमेश केसकर, अधिष्ठाता डॉ विजय कारेकर आणि सर्व प्राध्यापक आणि कर्मचारी यांचा मी अत्यंत आभारी आहे.

माझे मार्गदर्शक आदरणीय डॉ. अरुणचंद शं. पाठक, कार्यकारी संपादक आणि सचिव, दर्शनिका विभाग, महाराष्ट्र शासन, मुंबई यांनी संशोधन पूर्ण होईपर्यंत मला सतत प्रोत्साहन देऊन माझ्या प्रबंधाला योग्य दिशा देणारे मार्गदर्शन केले, याबद्दल मी त्यांचा अत्यंत ऋणी आहे. टिळक महाराष्ट्र विद्यापीठातील इतिहास विभागाच्या माजी विभाग प्रमुख डॉ. श्रद्धा कुंभोजकर आणि प्राध्यापक विजय कुंजीर यांचेही त्यांच्या मौलिक मार्गदर्शनाबद्दल मी आभार मानतो.**इतिहास विभागाच्या विभागप्रमुख डॉ.संध्या पंडीत याचेही मी आभार मानतो.**

शिक्षण प्रवासामध्ये ज्यांच्यामुळे इथपर्यंत मजल शक्य झाली अशा माझ्या आईच्या सदैव ऋणात राहणे मी पसंत करतो, त्याचबरोबर माझी पत्नी, बंधू, भगिनी, मामा आणि सर्व आप्तसंबंधितांच्या वेळोवेळी झालेल्या बहुमूल्य मदतीमुळे आणि आधारामुळेच हा संशोधन प्रबंध पूर्ण होऊ शकला, त्यांचे प्रतीही मी कृतज्ञता व्यक्त करतो.

प्रस्तुत संशोधनासाठी टिळक महाराष्ट्र विद्यापीठाचे ग्रंथालय, मराठी ग्रंथ संग्रहालय, ठाणे शासकीय ग्रंथालय, दादर येथील ग्रंथपाल आणि कर्मचाऱ्यांचे विशेष सहकार्य लाभले, त्याबद्दल त्यांचेही मी आभार मानतो.

माझे सहाध्यायी श्री सचिन राजभोज आणि श्री मिलिंद कोठावदे यांचे वेळोवेळी मोलाचे सहकार्य लाभले,त्यांचाही मी आभारी आहे.

माझ्याप्रबंधातील व्याकरण**दृष्ट्या** चुकांची दुरुस्ती करून त्यास चांगले रूप देण्याच्या कार्यात ज्यांनी मोलाचे सहकार्य केले , असे माझे मित्र श्री.ज.सो.बोरसे यांचाही मी आभारी आहे.

सदर प्रबंध वेळेवर आणि व्यवस्थित टंकलिखित करून त्याचे सुबक मुद्रण करून दिल्याबद्दल श्री शैलेंद्र इंगळे **आणि श्रीहरी कुलकर्णी** यांचेही मन:पूर्वक आभार मानतो.

सर्वांच्या सदिच्छा आणि सहकार्यामुळेच मी हा संशोधन प्रबंध पूर्ण करू शकलो, हे पुनश्च नमूद करतो.

**राजेंद्र अजिनाथ शिंदे**
संशोधक

# अनुक्रमणिका


| अनुक्रमांक | प्रकरणाचे नाव | पृ.क्र. |
|---|---|---|
| | **प्रस्तावना** | ०१ |
| १. | पुणे कराराची ऐतिहासिक पार्श्वभूमी | ०८ |
| २. | कम्युनल अॅवॉर्डची घोषणा म. गांधी ,डॉ. आंबेडकर व इंग्रज अधिकारी यांच्या भूमिका | २० |
| ३. | पुणे कराराचे स्वरूप | ४३ |
| ४. | पुणे करारानंतर | ६८ |
| ५. | प्रसार माध्यमांनी (मासिकांनी) घेतलेली दखल | ७६ |
| ६. | निष्कर्ष आणि समारोप | ८५ |
| ७. | संदर्भ ग्रंथ सूची | ९६ |
| ८. | परिशिष्टे | ९९ |

# प्रस्तावना

## प्रास्ताविक

इतिहास विषयाचा अत्यंत महत्त्वपूर्ण भाग म्हणजे इतिहासातील ऐतिहासिक घटना बऱ्याच ऐतिहासिक घटनांचे इसवीसन प्रधान मानून तर काही ऐतिहासिक घटनांचे स्थळ (ठिकाण) प्रधान मानून इतिहासात उल्लेख केलेले आहेत.

उदा. बोस्टन टी पार्टी- वसाहतींवरील निर्बंध इंग्लडने रद्द करावेत. वसाहतींना त्यांचा राज्यकारभार करू द्यावा. अशी मागणी अमेरिकन नागरिक करू लागले. या मागणीस इंग्लडने नकार देताच वसाहतींनी इग्लंडच्या मालावर बहिष्कार टाकला व अमेरिकेतील बोस्टन बंदरात इंग्लिश जहाजांवरील चहाच्या पेट्या नागरिकांनी समुद्रात फेकून दिल्या ही घटना इ. स. १७७३ साली बोस्टन येथे घटली. आणि बोस्टन या स्थळाला प्रधान मानून या ऐतिहासिक घटनेचा इतिहासात 'बोस्टन टी पार्टी' असा उल्लेख केला.इ. स. १९१७ साली बिहारमधील चंपारण्य येथे ब्रिटीश मळेवाल्यांनी शेतकऱ्यांना नीळ पिकवण्याची सक्ती केली होती. म. गांधीजींनी या पिळवणुकीविरूद्ध सत्याग्रह करून तेथील शेतकऱ्यांना न्याय मिळवून दिला .गांधीजींनी केलेला हा सत्याग्रह चंपारण्य या स्थळाला प्रधान मानून इतिहासात चंपारण्य सत्याग्रह या नावाने प्रसिद्ध आहे.चंद्रशेखर आझाद, योगेश चटर्जी इ. क्रांतिकारकांनी क्रांती कार्यासाठी लागणारा पैसा उभा करताना इ. स. १९२५ साली उत्तर प्रदेशातील काकोरी येथे रेल्वेतून खजिना लुटला. ही ऐतिहासिक घटना इतिहासात स्थळ प्रधान मानून 'काकोरी कट' या नावने प्रसिद्ध आहे.

वरील ऐतिहासिक घटनांचा उल्लेख करण्यामागील उद्देश एवढाच की, स्थळ प्रधान माणून ज्या ऐतिहासिक घटना प्रसिद्ध आहेत .त्यांपैकीच पुणे येथे म. गांधीजी व डॉ. आंबेडकर यांच्यात झालेला समझोता 'पुणे करार' नावाने इतिहासात प्रसिद्ध आहे. हा करार सप्टेंबर महिन्याच्या २४ तारखेला इ. स. १९३२ साली पुण्यातील येरवडा जेलमध्ये घडून आला. तसे पाहिले तर गांधीजी २० सप्टेंबर रोजी पुणे येथील येरवडा कारागृहात उपोषणाला बसले .परंतु २४ तारखेला २३ पुढाऱ्यांनी व २५ सप्टेंबरला १८ जणांनी मसुद्यावर स्वाक्षऱ्या केल्या. याच ऐतिहासिक घटनेला 'पुणे करार' असे म्हणतात.

पुणे कराराचा तपशील जाणणे ,पडताळणे या दृष्टिकोनातून वरील विषयाची निवड केली.पुणे करार ही **स्वातंत्र्यपूर्व** भारतातील एक ऐतिहासिक घटना आहे. तत्कालीन भारतीय राजकारणातील

अत्यंत प्रभावशाली नेते म्हणून म. गांधीजींचे व डॉ आंबेडकरांचे नाव घेता येते. परंतु अस्पृश्य वर्गाच्या हक्क अधिकाराचा प्रश्न निर्माण झाला असता. गांधीजींनी अस्पृश्य वर्ग हिंदूसमाजाचा अभिन्न अंग

असलेला भाग आहे, असे सांगून हिंदू समाजात फूट पडेल ,या विचाराने अस्पृश्यांच्या जातीयनिवाडयातील स्वतंत्र मतदारसंघाच्या मुद्दयाला विरोध केला व प्राणांतिक उपोषणाचा मार्ग निवडला.

दुसरीकडे डॉ. आंबेडकर हे अस्पृश्य समाजात जन्मले असल्यामुळे त्या समाजबांधवांचे दुःख, त्रास, यातना, जनावारांपेक्षाही हीन दर्जाचे त्यांचे जीवनमान त्यांनी प्रत्यक्ष डोळयांनी पाहिले व अनुभवले असल्यामुळे अस्पृश्य वर्गाला या नरकातून बाहेर काढण्यासाठी त्यांना काही विशिष्ट हक्क आणि अधिकार असणे गरजेचे आहे .हे इंग्रज अधिकाऱ्यांना समजावून दिले. २० ऑगस्ट १९१७ साली मॉटेग्यू सुधारणा घोषणा झाल्या. त्या अमलात आणण्यासाठी साऊथबरोबर कमिशनने भारतात साक्षी घेण्याचे काम केले. डॉ. आंबेडकर, विठ्ठल रामजी शिंदे, सरनारायणराव चांदवरकर यांनी साक्षी दिल्या.

१९२८ साली सायमन कमिशन[१] भारतात आले .त्यात एकही हिंदी प्रतिनिधी नाही असे सांगून कॉंग्रेस व गांधीजींनी या कमिशनला तीव्र विरोध केला. या विरोधाची तीव्रता कमी करण्यासाठी इंग्रजांनी कॉंग्रेसला आश्वासन दिले की, या कमिशनच्या शिफारशी प्रत्यक्ष लागू करण्याअगोदर भारतीय प्रतिनिधींचा सल्ला घेतला जाईल. त्यानुसार १९३०[२] साली इंग्लंड मधील लंडन शहरात गोलमेज परिषद भरविण्यात आली. व १९३२साली कम्युनल अॅवॉर्ड घोषित झाला व डॉ आंबेडकरांच्या चार मागण्या मान्य झाल्या. त्यातील स्वतंत्र मतदार संघाच्या मागणीमुळे देशाचे तुकडे होतील व इंग्रजांचा फोडा आणि झोडा या नीतिचा कुटील डाव साध्यहोईल, असे गांधीजींना वाटले त्यांनी उपोषण करून स्वतंत्रमतदार संघाऐवजी संयुक्त मतदार संघ या मुद्दयाचा समावेश करून प्रस्ताव तयार केला आणि त्यावर बरीच चर्चा केल्यानंतर उभयतांची संमती मिळाली हाच तो पुणेकरार!

या पुणेकराराची दखल त्यावेळेच्या विविध प्रसार माध्यमांनी घेतली आहे व आज सुद्धा त्या अनुषंगाने लिखाणकाम करून लेखक, समाजचिंतक, राजकीय पुढारी आपली मते मांडताना आपणांस दिसतात. जसे १९९१ साली प्रसिद्ध झालेले ठाकूरदास बंग यांचे 'गांधी विचार' या पुस्तकात गांधीजींची पुणेकरारासंदर्भातील भूमिका ही समाज हितास पोषक अशीच आहे , असे विचार मांडले आहेत.तर राजेश रघुवंशी यांनी प्रकाशित केलेल्या पुणेकरार -संपूर्ण इतिहास या पुस्तकात पा. नं. ८८ वर डॉ. आंबेडकर असे म्हणतात

[१] डॉ. बाबासाहेब **आंबेडकर**, दलितांचे राजकीय अस्तित्व संपुष्टात आणणारा पुणे करार पृ.क्र.१ प्रकाशक राजेश रघुवंशी राजेश प्रकाशन पुणे ३८.

[२] डॉ. बाबासाहेब **आंबेडकर**, दलितांचे राजकीय अस्तित्व संपुष्टात आणणारा पुणे करार पृ.क्र. १ प्रकाशक राजेश रघुवंशी राजेश प्रकाशन पुणे ३८.

की, ''पुणे करार हा स्पर्धेने ,वाईट गोष्टींनी भरला होता. तो म. गांधींच्या क्रूर उपोषणामुळे स्वीकारला गेला.

अशाचप्रकारे उभयतांच्या समर्थनात व विरोधात अनेकांनी आपली मते प्रदर्शित केली होती .या सर्व गोष्टींचा वस्तुनिष्ठ अभ्यास करण्याचा माझा हा छोटासा प्रयत्न, पुणे कराराविषयीची संपूर्ण पार्श्वभूमी, प्रत्यक्ष करार होत असताना घडलेल्या घटना ,भारतीय राजकरणावर याचा झालेला प्रत्यक्ष व अप्रत्यक्ष परिणाम याचा आढावा घ्यावा ,हा उद्देश आहे.

## संशोधन विषयाची निवड

सप्टेंबर १९३२ एका प्रसंगी डॉ. आंबेडकर से म्हणाले होते की, मला समोरच्या इलेक्ट्रिकच्या पोलला फाशी दिले तरी चालेल[३] पण मी माझ्या अस्पृश्य बांधवांसाठी मिळविलेले हक्क आणि अधिकार मुळीच सोडणार नाही.

डॉ आंबेडकर म्हणजे 'मोडेन पण वाकणार नाही' झुंझार नेतृत्व, विरोधकांवर घनाघाती प्रहार करणारे व्यक्तिमत्त्व अशी ओळख रा. के. लेले यांनी मराठी वृत्तपत्रांचा इतिहास या आपल्या ग्रंथात करून दिली आहे. २७ वर्षाच्या पूर्ण अवधित राष्ट्रहिताच्या विरुद्ध जाणारी कोणतीही सवलत कोणत्याही वर्गाला, वर्णाला,धर्माला गांधीजींनी राजकारणात दिली नाही – असे मत ठाकूरदास बंग यांनी आपल्या गांधीविचार यापुस्तकात व्यक्त केले आहे.

खुद्द गांधीजींचे अस्पृश्यांसंबंधी असलेले मत पुढीलप्रमाणे:- अस्पृश्य तर मला माझ्या जिवापेक्षा प्यारे आहेत. जर मला सर्व जगाचे साम्राज्य मिळाले तरी मी त्या बदल्यात त्यांच्या (अस्पृश्यांच्या) हक्काची सौदेबाजी करणार नाही. मी स्वत: व्यक्तिगत रूपात अस्पृश्यांचा एकमेव प्रतिनिधी आहे. जर अस्पुश्यांचे सार्वमत घेतले तर त्यांची मते मलाच मिळतील.[४]

भारतीय समाजरचनेतील अत्यंत खालच्या स्तराला असलेला व फारच हीनकस दृष्टीने वागविल्या गेल्या कारणाने समाजाच्या मुख्य प्रवाहापासून शेकडोमैल दूर फेकल्या गेलेल्या अस्पृश्य समाजाच्या प्रगती विषयी व त्यांच्या प्रगतीस पोषक ठरणाऱ्या प्रतिनिधित्वाच्या प्रश्नासंबंधी अनेकांनी वेगवेगळया प्रकारे मतं मांडली आहेत. गांधीजी व डॉ. आंबेडकरांचा अस्पृश्य समाजाप्रतीचा दृष्टिकोन वरील चार मुद्दयांवरून आपणास कळून येतो. आपणास निश्चितपणे हे जाणवते की महात्मा गांधी व डॉ बाबसाहेब आबेडकर हे दोन्ही नेते अस्पृश्यांच्या प्रगतीबाबत,विकासाविषयीचिंता करतात. त्यांच्या मनात अस्पृश्यबांधवांविषयी

---

[३] डॉ. बाबासाहेब **आंबेडकर**,लेखन आणि भाषणे खंड १८ भाग १ प्रकाशक डॉ बाबसाहेब आबेडकर चरित्र साधने प्रकाशन समिती महाराष्ट्र शासन दि.१५.१०.२००२ पृ.क्र.३५३.

[४] डॉ. बाबासाहेब **आंबेडकर**,दलितांचे राजकीय अस्तित्व संपुष्टात आणणारा पुणे करार प्रकाशक राजेश रघुवंशी राजेश प्रकाशन पुणे ३८. पा.नं. ३०.

अपार प्रेम आहे, करूणा आहे.राजकीय दृष्टीकोणातून गोलमेज परिषदेत अस्पृश्यांची बाजू मांडण्यासाठी दोन्ही नेते आपणच अस्पृश्यांचे खरे प्रतिनिधी आहोत असा दावाही करतात.

या संदर्भात वाचन करीत असताना मनात प्रश्न निर्माण झाला की म. गांधी व डॉ. बाबासाहेब यांच्या मनात अस्पृश्यबांधवांप्रतीअपार प्रेम ,करूणा, जिव्हाळा आहे. दोघेही अस्पृश्यता निवारण्यासाठी प्रयत्न करतात. इंग्रजांकडून अस्पृश्यांसाठी हक्क आणि अधिकार मिळविण्यासाठी एकवेळ आपण हे ही समजू शकतो की, दोघेही अस्पृश्यांचे प्रतिनिधी आहेत.

परंतु १९३२ सालच्या घटना अशा सांगतात की, अस्पृश्यांच्या हक्क आणि अधिकाराबाबत गांधीजी व आंबेडकर यांच्यात तीव्र मतभेद निर्माण झाले व दोन्ही नेत्यांच्या प्राणाची किंमत मोजली जाईल इथपर्यंत ते ताणले गेले.

हा विरोधाभास निश्चितपणे दूर्लक्षित करण्याजोगा नाही.म्हणून पुणे कराराचे खरे स्वरूप व म. गांधीजी तसेच डॉ. आबेडकरांच्या तत्कालीन भूमिका व प्रसारमाध्यमांनी घेतलेली दखल याचा वस्तूनिष्ठ अभ्यास करण्याच्या प्ररेणेने वरील विषयाचा अभ्यास करण्याचे निश्चित केले.

## संशोधन विषयाची गरज

आपण २६ जानेवारी १९५० पासून लोकशाही गणराज्य पद्धतीचा स्वीकार केला आहे. म्हणूनच २६ जानेवारी हा दिवस आपण दरवर्षी 'प्रजासत्ताक दिन' म्हणून साजरा करतो .प्रजासत्ताक याचा अर्थ प्रजेची (जनतेची) सत्ता . आज आपल्या देशाची जनसंख्या १२० कोटींपेक्षा थोडी जास्त आहे. ही १२०कोटी जनता संसदेत जाऊन प्रत्यक्ष कामकाजात सहभाग घेऊ शकत नाही. अशावेळी जनतेतून निवडलेले जनतेचे प्रतिनिधी संसदेत जनतेची बाजू मांडतात. हे जनतेचे खरे प्रतिनिधी असतात. लोकांच्या न्यायहक्कांसाठी ते संघर्ष करीतअसतात. तात्पर्य योग्य प्रतिनिधित्व हे लोकशाही राज्य व्यवस्थेचे प्राणतत्त्व आहे.

परंतु आज भारतात खेडयातील किंवा शहरातील जनतेच्या समस्यांचा विचार केला असता संसदेत लढणारी, झगडणारी व जनतेचे हक्क अधिकार प्राप्त करणारी माणसे न दिसता आपापल्या पक्ष श्रेष्ठींची मर्जी सांभाळण्यात धन्यता मानणारी माणसे आपणांस दिसतात. प्रतिनिधित्वाच्या खऱ्या अर्थापासून त्यांनी फारकत घेतली आहे की काय? असे वाटावे अशी आजची आपली स्थिती आहे आणि म्हणून प्रतिनिधित्वाशी संबंधित असलेल्या पुणेकराराचा अभ्यास करणे गरजेचे वाटते आहे.

## संशोधनाची व्याप्ती आणि मर्यादा

''पुणेकरार व तत्कालीन प्रसार माध्यमांची भूमिका'' या विषयावर संशोधन करताना 'पुणे कराराचे' समर्थक व विरोधक अशा दोन्ही प्रकारच्या लेखकांनी लिहिलेल्या पुस्तकांचा अभ्यास केला. म. गांधीजी व डॉ. बाबासाहेब यांच्या या संदर्भातील भूमिका अभ्यासण्याची संधी मिळाली . इंग्रज आधिकाऱ्याबरोबर झालेला गांधीजींचा पत्रव्यवहार व बाबासाहेबांनी घेतलेली भूमिका यांचा तटस्थ भूमिकेतून अभ्यास केला. एम.फिल. अभ्यासक्रमाच्या दीड वर्षे मुदतीच्या मर्यादेमध्ये या सर्व बाबींचा अभ्यासकरताना बऱ्याच मर्यादा आल्या.

या मर्यादांबरोबरच पुणे करारासंदर्भात तत्कालीन घटनांचा अभ्यास करणे शक्य झाले. तरीसुध्दा भविष्यकाळात पुणे करारासंदर्भात अधिक सखोल संशोधन व्हावे असे वाटते.

## संशोधन विषयाचे महत्त्व

'पुणे करार' ही प्रतिनिधित्वाशी संबंधित अत्यंत महत्त्वाची अशी घटना आहे. भविष्यकाळात निकोपलोकशाहीच्या विकासासाठी योग्य नेतृत्वगुणांचा विकास होणे गरजेचे आहे. समाजातून योग्य प्रतिनिधित्व निर्माण झाल्यास हे शक्य आहे.

कम्युनल ॲवॉर्डच्या माध्यमातून नेमक्या कोणत्या गोष्टी प्राप्त झाल्या होत्या. म. गांधीजींचा त्यातील कोणत्या गोष्टींना विरोध होता व तो विरोध का होता? डॉ. आंबेडकरांना काय अपेक्षित होते? या प्रश्नांची उत्तरे संशोधन कार्यसुरू असताना मिळतातच .या बरोबरच म.गांधीजी व डॉ. आंबेडकर यांच्या संकल्पनेतील प्रतिनिधित्वाच्या गुणांचा परिचय होण्याच्या दृष्टीने सदर विषयाची निवड महत्त्वाची वाटते.

## संशोधनाची उद्दिष्टे

अ) पुणे कराराची ऐतिहासिक पार्श्वभूमी जाणणे.

ब) पुणे कराराचे नेमके स्वरूप अभ्यासणे.

क)डॉ. आंबेडकर व म.गांधीजींच्याभूमिकांचा अभ्यास करणे.

ड) मासिके व वर्तमानपत्रांनी घेतलेल्या नोंदींचा अभ्यास करणे.

इ)मूळसंदर्भ साधने तपासण्याचा प्रयत्न करणे.

## संशोधनाची गृहीतके

अ) पुणे करार ही एक ऐतिहासिक घटना आहे.

ब) भारतीय राजकारणावर त्याचा गंभीर परिणाम झाला आहे.

क) पुणे कराराचे मुळरूप व हेतू प्रतिनिधित्वाशी संबंधित होता.

ड) प्रसारमाध्यमांनी या घटनेची गांभीर्याने दखल घेतली आहे.

इ)पुणे कराराचे समर्थक व विरोधक दोन्ही प्रकारच्या मतांना प्रसारमाध्यमांनी प्रसिद्धी दिली आहे.

## संशोधन पद्धती

अ) ऐतिहासिक संशोधन पध्द्धतीचा अवलंब प्रस्तुत संशोधनासाठी केला आहे.

ब) प्रामुख्याने ग्रंथालयीन संशोधन पद्धतीचा अवलंब करून उपलब्ध साधने आणि साहित्य अभ्यासून संशोधन सादर केले आहे.

## संशोधनाची साधने

प्रस्तुत संशोधनासाठी खालील प्राथमिक आणि दुय्यम साधनांचा उपयोग केला आहे.

## प्राथमिक साधने

अ) क्षेत्रभेट

ब) निरीक्षणे

## दुय्यम साधने

खाली उल्लेखिलेल्या ग्रंथालयांमधील ग्रंथ आणि संदर्भ साहित्याचा प्रस्तुत संशोधनासाठी खूप उपयोग झाला.

अ) मराठी ग्रंथ संग्रहालय, ठाणे.

ब) शासकीय ग्रंथालय, दादर.

क) माझे ग्रंथभंडार, बदलापूर.

ड) टिळक महाराष्ट्र विद्यापीठ ग्रंथालय, पुणे.

## गत संशोधनाचा आढावा.

''पुणे करार'' या विषयावर यापूर्वी अभ्यास आणि संशोधन झाले आहे . अनेक व्यक्तिंनी यापूर्वी यासंदर्भात अभ्यासपूर्ण लिखाण प्रकाशित केलेले आहे.

यामधील चांगदेव भगवानराव खैरमोडे हे बाबासाहेबांचे समकालीन आहेत . त्यांनी डॉ. आंबेडकरांचे चरित्र लिहिले आहे त्यात पुणे कराराविषयी अत्यंत महत्त्वाची माहिती उपलब्ध आहे.

धनंजय कीर यांनी लिहिलेल्या आंबेडकरांच्या चरित्रात पुणेकरारा संदर्भात महत्त्वपूर्ण उल्लेख आढळतात.

ठाकूरदासबंग लिखित 'गांधी विचार' हे १९९१ मध्ये प्रकाशित झाले. त्यात पुणेकरारा संदर्भात गांधीजींच्या भूमिकेचे अभ्यासपूर्ण विश्लेषण केले आहे.

कार्यकारी संपादक सचिव, दार्शनिक विभाग महाराष्ट्र शासन, मुंबई यांनी प्रकाशित केलेल्या महात्मागांधींचे संकलित वाङ्मय यातील खंड ५०, ५१, व ५२ मध्ये म. गांधींनी लिहिलेल्या अनेक पत्रांद्वारे त्यांची पुणेकरारासंबंधातील मते आपणास कळतात.

गोलमेज परिषदांविषयी इंटरनेटवर उपलब्द असलेली माहिती अभ्यासासाठी उपयुक्त ठरते.

डॉ. बाबासाहेब आंबेडकर लिखित 'दलितांचे राजकीय अस्तित्व संपुष्ठात आणणारा पुणेकराराचा संपूर्ण इतिहास' या ग्रंथातील माहिती पुणेकरारामुळे शोषित समाजातील प्रतिनिधित्व प्रभावहीन झाल्याचे निदर्शनात आणून देते.

श्रीयुत भाऊ धर्माधिकारी यांनी संपादित व अनुवादित केलेल्या गांधी विचारदर्शन, भाग १५ या ग्रंथात इंग्रज सरकारने ४ जानेवारी १९३२ रोजी गांधीजींना पकडून येरवडा तुरुंगात बंदीगृहात ठेवले असता गांधीजींचा रॅम्से मॅक्डोनॉल्ड यांच्याशी झालेला पत्रव्यवहार पुणे कराराचे स्वरूप समजून घेण्यासाठी व गांधीजींची भूमिका समजण्यासाठी अत्यंत उपयुक्त ठरला.

प्रस्तुत संशोधनासाठी वर उल्लेखिलेल्या सर्व ग्रंथांचाअभ्यास करण्यात आला. सोबत काही मासिकांचाही (उदा. मासिक ''नवजीवन'' १९३२, मासिक ब्राम्हण पत्रिका वर्ष ९, अंक ७ सन १९३१, मासिक ''आत्मोन्नति'', अंक ८वा, सन मे १९३४, मासिक-आनंद सन फेब्रुवारी १९३३) खूप उपयोग झाला.

ह्या सर्व लिखाणांचा सर्वांगीण अभ्यास करून, पुणेकरार समर्थक आणि विरोधक यांच्या भूमिका समजावून घेऊन प्रस्तुत संशोधनाची निरीक्षणे आणि निष्कर्ष मांडण्याचा संशोधकाने प्रयत्न केला आहे.

# प्रकरण १

# पुणे कराराची ऐतिहासिक पार्श्वभूमी

## अनुक्रमणिका


| अनुक्रमांक | तपशील |
|---|---|
| १.१ | अस्पृश्य समाजाच्या मागासलेपणाचे कारण |
| १.२ | वर्तुळपरिषदेचा इतिहास |
| १.३ | पहिली गोलमेज परिषद |
| १.४ | गांधीजी व डॉ. आंबेडकरांची भेट |
| १.५ | दुसरी गोलमेज परिषद व म.गांधीजी आणि डॉ. आंबेडकर वैचारिक संघर्ष |
| १.६ | म. गांधीजी आणि सॅम्युअल होअर पत्र व्यवहार |

प्रकरण १

# पुणे कराराची ऐतिहासिक पार्श्वभूमी

## १.१ अस्पृश्य समाजाच्या मागासलेपणाचे कारण

इ. स. १८१८ साली पेशवाईचा अस्त होऊन भारतात इंग्रजांची राजवट सुरू झाली तत्पूर्वीचा भारतीय समाज हा वर्णाश्रम पद्धतीत विभागलेला होता आणि त्यात जातींची उतरंड अबाधित होती. जातीच्या आधारे कामाचे स्वरूप व कामाच्या स्वरूपानुसार समाजातील व्यक्तीचा दर्जा निर्धारित केला जात असे . जातीबाहेर रोटीबेटी व्यवहार केले जात नसत व एखाद्याने चुकून किंवा जाणीवपूर्वक तसा प्रयत्न केला तर त्याला बहिष्कृत करून त्याचे शारीरिक व मानसिक खच्चीकरण केले जात असे .त्याला भयानक स्वरूपाच्या शिक्षा दिल्या जात आणि त्या शिक्षाधर्माज्ञा आहे , असे सांगून त्या अधिकृत केल्या होत्या.

समाजव्यवस्थेच्या या कार्यप्रणालीला बळी गेलेला एक मुख्य घटक म्हणजे अस्पृश्य समाज! गावातील अत्यंत खालच्या दर्जाची व घाणेरडी कामे यांच्या वाट्याला आली . त्यांचा स्पर्श विटाळ समजला जाऊ लागला.समाजातील काही लोक त्यांना आपल्यापासून दूर ठेवू लागले. शिक्षण घेणे, द्रव्यसंचय करणे, आवडीचा व्यवसाय करणे यांसारखे न्याय्य मानवी हक्क त्यांना नाकारले गेले. परिणामी समाजातील एक तिरस्कार करण्याजोगा व खालच्या दर्जाची कामे करून घेण्याच्या लायकीचा असलेला असे समजून हा समाज अधिकाधिक दारिद्र्यात खितपत गेला व आपण माणसासारखीच माणसे आहोत, हा विचार हरवून बसला.अपमानालाच सन्मान मानू लागला . दारिद्र्य आणि लाचारी हेच आपले जीवन असे समजू लागला.

## १.२ वर्तुळपरिषदेचा इतिहास

समाजातील ही विषमता दूर करण्यासाठी इंग्रजांनी काही सामाजिक सुधारणा करण्यास सुरुवात केली. त्यानुसार २० ऑगस्ट १९१७ साली मॉटेग्यू सुधारणांची घोषणा झाली व १९१८ साली या संदर्भात पाहणी करण्यासाठी, अभ्यास करून रिपोर्ट तयार करण्यासाठी साऊथ बरो कमिशन भारतात आले. व १९१९ साली त्यावर आधारित गव्हर्मेंट ऑफ इंडिया ॲक्ट १९१९ करण्यात आला. त्यातील एक कलम म्हणजे दर १० वर्षांनी राज्यघटनेच्या कार्यपद्धतीची तपासणी करण्यासाठी एक कमिशन नियुक्त केले जाईल. या कलमाप्रमाणे १९२८ साली सायमन कमिशन भारतात आले .त्यात एकही हिंदी प्रतिनिधी नाही

असे सांगून कॉंग्रेस व गांधींद्वारा त्या कमिशनला तीव्र विरोध करण्यात आला. हा विरोध इतक्या तीव्र स्वरूपाचा होता की,या विरोधादरम्यान झालेल्या लाठीचार्जमध्ये लालालचपतरायांना लाठी लागून नंतर त्यांचा त्यातच मृत्यु झाला. या उठावाची तीव्रता कमी करण्यासाठी सायम कमिशनच्या शिफारशी लागू करण्याआधी त्यावर चर्चा करण्यासाठी भारतीय प्रतिनिधींना बोलावले जाईल, असा शब्द इंग्रजांनी भारतीय नेत्यांना दिला व सायमन कमिशनच्या शिफारशींवर चर्चा, विचार विनिमय करण्यासाठी भारतीय प्रतिनिधींना इंग्लंडमधील लंडन शहरात आमंत्रित करण्यात आले .ज्या सभागृहात इंग्रज अधिकारी व भारतीय प्रतिनिधी बसून चर्चा, विचार विनिमय करीत होते तो टेबल वर्तुळाकार होता. म्हणजे बसण्याची व्यवस्था वर्तुळाकृती होती म्हणून या परिषदेला गोलमेज परिषद म्हणजेच राऊंडटेबल कॉन्फ्रंस असे म्हणतात.

## १.३ पहिली गोलमेज परिषद

१८८५ ला सर ॲलनह्यूम यांच्या नेतृत्वाखाली काँग्रेस पक्षाची स्थापना झाली. तेव्हा काँग्रेसची मुख्य मागणी 'प्रतिनिधित्व हवे' अशी होती. साऊथ बरोबर कमिटीने भारतात साक्षी घेण्याचे काम कले तेव्हा १) डॉ. आंबेडकर २) विठ्ठल रामजी शिंदे ३) सर नारायणराव चांदवारकर यांनी आपल्या साक्षी नोंदविल्या होत्या. सायमन कमिशनने सुचविलेल्या शिफारशी प्रत्यक्षात लागू करण्याआधी त्यावर चर्चा करून सर्वांची संमती मिळवावी. या उद्देशाने दि. २० नोव्हेंबर १९३० साली पहिली गोलमेज परिषद सुरूझाली .या परिषदेत ''भारताची भावी राज्यघटना व अस्पृश्यता निवारण्याची योजना'' या नावाचा अस्पृश्यांच्या मूलभूत हक्काचा जाहिरनामा ठेवला गेला. गांधीजींना या परिषदेचे निमंत्रण असताना सुध्दा गांधीजी गेले नाहीत व कॉंग्रेसकडून दुसरा एखादा प्रतिनिधी सुद्धा पाठविला गेला नाही. अस्पृश्यांच्या वतीने डॉ आंबेडकर व श्रीनिवासन हे दोन प्रतिनिधी होते.[५]

गोलमेज परिषदेच्या कार्यावर विचारविमर्ष (चर्चा) करण्यासाठी नऊ समित्या बनविल्या गेल्या. त्यापैकी एक समिती 'अल्पसंख्यांक समिती' या समितीला जातीयतेच्या प्रश्नांवरील समस्यांवर उपाययोजना शोधून काढण्याचे **काम** सोपविले होते. ब्रिटनचे प्रधानमंत्री रॅम्से मॅक्डोनॉल्ड हे तिचे अध्यक्ष होते.

गोलमेज परिषदेद्वारा दुसरी समिती 'फेडरल स्ट्रक्चर कमिटी' या नावाने बनविली होती. जी केंद्र सरकारच्या कामकाजावर विचार करण्याच्या दृष्टीने बनविली होती. तिला फेडरल संबंधित अस्पृश्यांच्या प्रश्नांवरपण विचार करण्याची जबाबदारी होती.[६]

---

[५] डॉ. बाबासाहेब **आंबेडकर**, लेखन आणि भाषणे, खंड १८ भाग १, प्रकाशक डॉ. बाबासाहेब **आंबेडकर**,चरित्र साधने प्रकाशन समिती महाराष्ट्र शासन दि.१५.१०.२००२ पृ.क्र.३१४.

[६] डॉ. बाबासाहेब **आंबेडकर**,दलितांचे राजकीय अस्तित्व संपुष्टात आणणारा पुणे करार, प्रकाशक राजेश रघुवंशी राजेश प्रकाशन पुणे ३८. पृ.क्र.१६

पहिल्या गोलमेज परिषदेत वरील दोन्ही समित्यांचें अहवाल मांडण्यात आले. व त्यांची नोंद करण्यात आली. या अहवालाला विस्तृत रूपात पूर्ण मान्यता प्राप्त झाली नव्हती. परंतु सर्वांच्या संमतीने राजनैतिक आणि घटनात्मक बबींमध्ये अस्पृश्यांसाठीच्या स्वतंत्र अस्तित्वाचा स्वीकार करण्यात आला. गोलमेज परिषदेच्या पहिल्या सत्रात अस्पृश्यांबाबतच्या वरील निर्णयावर काँग्रेसचे स्पष्ट असे मत नव्हते कारण त्यावेळी कॉंग्रेस पक्षाने गोलमेज परिषदेवर बहिष्कार टाकला होता व इंग्रज सरकारच्या विरोधात सविनय कायदेभंगाचे आंदोलन छेडले होते. या पहिल्या गोलमेज परिषदेत भाग घेतलेल्या प्रतिनिधींच्या आपापसातील सहकार्यामुळे व प्रतिनिधींच्या समर्पित भावनेमुळे असे वाटत होते की दुसरी परिषद अधिक चांगल्या प्रकारे काम करून ठोस निर्णयाप्रत पोहोचेल.

परंतु या पहिल्या गोलमेज परिषदेबाबत काँग्रेस स्नेहींचे असे मत होते की, जर प्रथम अधिवेशनात परिषद कुठल्याही निर्णयाप्रत येऊन पोहोचली नसेल तर त्याचे कारण म्हणजे फक्त काँग्रेसची अनुपस्थिती. अशा प्रकारे १९ जाने १९३१ ला पहिली गोलमेज परिषद स्थगित झाली.[७]

## १.४ गांधीजी व डॉ. आंबेडकरांची भेट

दुसरी गोलमेज परिषद ७/९/३१ सप्टेंबर ला सुरू झाली.

परंतु तत्पूर्वी म. गांधीजी व डॉ. आंबेडकरांची भेट झाली त्यातील संवादाचा आशय असा.

गांधीजी :तुमचा जन्म झाला नव्हता तेव्हा पासून मी अस्पृश्यता निवारणाचा विचार करीत आहे. कॉंग्रेसच्या कार्यक्रमात अस्पृश्यता निवारणाचा प्रश्न गोवून घेताना मला कोण सायास पडले! **काँग्रेसने** आजपर्यंत अस्पृश्यता निवारणासाठी २० लाख रु. खर्च केले आहेत. असे असताना आपली माझ्या व कॉंग्रेसच्या विरुद्ध तक्रार का असावी?

बाबासाहेब : मी जन्माला येण्याआधीपासून आपण हे कार्य करीत आहात हे खरे आहे. आपल्यामुळे अस्पृश्यता निवारणाचा प्रश्न कॉंग्रेसने कार्यक्रमात घेतला हेही मला मान्य आहे. पण त्या प्रश्नाला औपचारिकता देण्यापलीकडे कॉंग्रेसने काहीही केले नाही. वीस लाख रुपये कॉंग्रेसने खर्च केले असे आपण सांगता म्हणूनच मी ते मान्य करतो. एवढी मोठी रक्कम जर माझ्या हाती असती तर त्या रकमेचा अधिक योग्य रीतीने व जिव्हाळ्याने विनियोग झाला असता आणि अस्पृश्य समाजाच्याप्रगतीला केवढी चालना मिळाली असती ! आपणाला आणि **काँग्रेसला** हा प्रश्न जिव्हाळयाचा वाटतो असे आपण सांगता. जर असे आहे तर **काँग्रेसचा** सभासद होण्यासाठी खादी वापरण्याची **जशी** अट तुम्ही घातली तशी अस्पृश्येतेसंबंधी अट का

[७] डॉ. बाबासाहेब **आंबेडकर**, दलितांचे राजकीय अस्तित्व संपुष्टात आणणारा पुणे करार. प्रकाशक राजेश रघुवंशी राजेश प्रकाशन पुणे ३८. पृ.क्र.१७.

घातली नाही? अस्पृश्यांच्या मुलाला आपल्या घरी जो विद्यार्थी म्हणून ठेवेल अगर आठवडयातून एक दिवस त्याला आपल्या घरी जेवायला बोलवील किवा गरीब अस्पृश्य बाईस आपल्या घरी कामकाजाकरिता ठेवील त्यालाच कॉंग्रेसचा सभासद होता येईल. अशी भरीव स्वरूपाची अट आपण ठेवायला हवी होती. असे जर आपण केले असते तर नाशिक जिल्हा कॉंग्रेसच्या अध्यक्षांनी अस्पृश्यांच्या मंदिर प्रवेश विरुद्ध भिक्षुकांच्या आघाडीचे अध्यक्षपद स्वीकारले नसते. व विसंगती दिसून आली नसती, आपण म्हणता कॉंग्रेसला **कोट्यावधी** सभासद करून घ्यावयाचे आहेत. तेव्हा तिला ही असली अट कशी घालता येईल? तुमचे म्हणणे बरोबर आहे. तुमची अडचण मी समजू शकतो ! पण मग ही वस्तूस्थिती कबूल करा संख्येपेक्षा व पैशांपेक्षा कॉंग्रेसला तत्त्वांचे महत्त्व अधिक आहे. अशा तत्त्वनिष्ठेच्या बढाया कॉंग्रेसने उगाच मारू नये. इंग्रजांचे हृदय परिवर्तन अद्यापि झाले नाही. असे ज्याप्रमाणे तुम्ही म्हणता त्याचप्रमाणे अस्पृश्यांच्या प्रश्नाबाबत कॉंग्रेसची चित्तशुद्धी अजून झाली नाही असे मी म्हणतो .जोपर्यंत अशी चित्तशुद्धी होत नाही तोपर्यंत कॉंग्रेस व तुम्ही महात्मा असलात तरी तुमच्यावर अस्पृश्यांनी विश्वास कसा ठेवायचा? आजपर्यंत इतिहासाचा पुरावा असा आहे की, महात्मा लोक शाब्दिक तत्त्वज्ञानाचा नुसता धुरळा हवेत उडवितात पण जमिनीची पातळी मात्र काही उंचावत नाही. अस्पृश्यता नष्ट होईल अशी शिकवण मी माझ्या अस्पृश्य बांधवांना देतो.म्हणूनच कॉंग्रेस माझा द्वेष करते. वर्तुळ परिषदेने मुसलमानांचे राजकीय दृष्टया स्वतंत्र अस्तित्व कबूल केले असून त्या गोष्टीला कॉंग्रेसनेही मान्यता दिली आहे. मग अस्पृश्यांच्या राजकीय मागण्या वर्तुळ परिषदेने मान्य केल्या असता. त्यांचे स्वतंत्र राजकीय अस्तित्व मान्य करण्यास तेवढा तुमचा विरोध का? हे मला समजत नाही.

गांधीजी : त्याला राजकीय दृष्टया हिंदूंपासून वेगळे करण्याच्या मी विरुद्ध आहे.

बाबासाहेब : (प्रक्षुब्ध स्वरात) ज्या देशात अस्पृश्यांना राहायला जागा मिळत नाही, ज्या धर्मात त्यांना कुत्र्यामांजरांपेक्षा हीन दर्जाने वागविले जाते. त्या देशाबद्दल व धर्माबद्दल त्यांना आपलेपणा कसा वाटेल, हे तुम्हीच सांगा (त्यानंतर दोघेही एकमेकांना बोलण्याच्या स्थितीत नाहीत.)

गांधीजी : पण अस्पृश्यांनी हिंदूंपासून राजकीय दृष्टया अलग होण्याला माझा विरोध आहे. त्यामुळे अस्पृश्य आपला नाश करून घेतील.

आंबेडकर : (उठून) ठीक आहे आपले हे मत प्रत्यक्ष आपल्या तोंडून कळले हे बरे झाले. (गांधीजींचा निरोप घेतात)[८]

---

[८]आचार्य अत्रे संकलक : भाऊसाहेब अडसूळ, दलितांचे बाबा, आवृत्ती ६ वी (१९९५) प्रकाशक : परचुरे प्रकाशन मंदिर दि.१२.१२. १९९५ रोजी _amR>m पेपरमध्ये आचार्य अत्रे यांनी छापलेली मुलाखत.

## १.५ दुसरी गोलमेज परिषद व म.गांधीजी आणि डॉ. आंबेडकर वैचारिक संघर्ष

दुसऱ्या गोलमेज परिषदेसाठी सर्व प्रतिनिधींची एकसंघीय समिती (फेडरल स्ट्रक्चर कमिटी) तयार करण्यात आली.तिच्या पहिल्या बैठकीत म्हणजे दिनांक १५/९/१९३१ रोजी गांधीजी अस्पृश्यांच्यासमस्येविषयी खालील मत मांडतात.

काँग्रेसने अस्तित्वात येताच **अस्पृशांची** समस्या हाती घेतली आहे. श्री. रानडे यांच्या पुढाकाराने सोशल कॉन्फरन्सची योजना चालू होती. अस्पृश्यासंबंधातील सुधारणांना त्यात मुख्य स्थान दिलेले होते. काँग्रेसने सर्व वर्गामध्ये एकता आणण्याच्या दृष्टीने हिंदू आणि मुसलमान एकतेला स्वराज्य प्राप्त करण्यासाठी जेवढे आवशयक मानले तेवढाच सर्व वर्गात एकता आणि अस्पृश्यता निवारणावर भर दिला होता. काँग्रेसची अस्पृश्यांच्या हितासंबंधी जी स्थिती १९२० मध्ये होती तीच आज आहे.

फेडरल स्ट्रक्चर कमिटीची १७/९/१९३१ रोजी बैठक झाली त्यात गांधीजींनी व्यक्त केलेले विचार, ''मी काँग्रेस पक्षाच्या बाजूने बोलत आहे. काँग्रेसने हिंदू-मुसलमान -शीख यांच्या एकतेवर भर दिला आहे. त्याला काही ऐतिहासिक कारणे आहेत. मी विशेष सूचीबद्दल ऐकले आहे .जेथपर्यंत अस्पृश्यांचा संबंध आहे. मी पूर्णपणे त्यांना समजू शकलो नाही की, डॉ. आंबेडकरांना काय म्हणायचे होते परंतु अस्पृश्यांच्या प्रतिनिधित्वासाठी काँगेस डॉ. आंबेडकरांना पाठींबा देईल. अस्पृश्यांचे हित काँग्रेसला जेवढे समजले आहे तेवढेदेशाच्या अन्य कुठल्याही व्यक्तीला समजले नाही आणि म्हणून मी विशेष प्रतिनिधित्वास पूर्ण शक्तीनिशी विरोध करेन.

या दुसऱ्या गोलमेज परिषदेत गांधीजी व डॉ. आंबेडकर यांच्यात वैचारिक संघर्ष निर्माण झाला.

गांधीजींच्या मते काँग्रेस हीच अस्पृश्यांचे प्रतिनिधित्व करते. तसेच या परिषदेतील सदस्य सरकार नियुक्त आहेत ते लोक नियुक्त नाहीत. असा आक्षेप गांधीजींनी घेतला.

वरील विवेचनावरून म. गांधीजी व डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांची मानसिक स्थिती आपणास निश्चित लक्षात येते.

श्री. आगाखान यांनी मुसलमान, दलित, अँग्लोइंडियन, ख्रिश्चन या सर्वांच्या वतीने 'अल्पसंख्यांक समझोता' सादर केला, तेव्हा गांधीजींनी अत्यंत क्रोधीत मन:स्थितीत खालीलप्रमाणे मत व्यक्त केले .

''मी स्वत: व्यक्तीगत रूपात अस्पृश्यांचा एकमेव प्रतिनिधी असल्याचा दावा करतो. जर अस्पृश्यांचे सार्वमत घेतले तर त्यांची मते मलाच मिळतील. मी भारतातील सर्व अस्पृश्यांना सांगू इच्छितो की, स्वतंत्र निवडणूक पद्धती आणि त्यांच्यासाठी वेगळया राखीव जागा हा काही अस्पृश्यता निवारण्याचा योग्य मार्ग नाही. ही त्यांच्यासाठी लज्जास्पद गोष्ट असून सनातनी हिंदूसाठी देखील लज्जास्पद गोष्ट आहे.

''डॉ. आंबेडकरांची आकांक्षा आहे की, अस्पृश्यांची उन्नती व्हावी. मी त्यांची भावना व योग्यता यांचा आदर करतो, परंतु मी येथे स्पष्ट करू इच्छितो की, त्यांनी घेतलेल्या परिश्रमात ही फार मोठी चूक झाली आहे. त्यांना जे आजपर्यंत कटू अनुभव आले आहेत. त्यामुळेच त्यांनी असा तुटून वेडावाकडा निर्णय घेतला. त्यामुळे मला दु:ख होत आहे, परंतु मी त्यांच्यासाठी कशाला खोटेपणा करू! अस्पृश्य तर मला माझ्या जिवापेक्षा प्यारे आहेत. जर मला सर्व जगाचे साम्राज्य मिळाले, तरी मी त्या बदल्यात त्यांच्या हक्कांची सौदेबाजी करणार नाही. डॉ आंबेडकर जो दावा करत आहेत , ते भारताच्या सर्व अस्पृश्यांच्या वतीने बोलत आहेत. या उपर मी जबाबदारीने सांगू इच्छितो की, त्यामुळे भारतातील हिंदू धर्माचे विभाजन होईल. ते मी कुठल्याही परिस्थितीत होऊ देणार नाही. जर अस्पृश्य मुसलमान झाले, ख्रिश्चन झाले तर माझी त्याला हरकत नाही. ते मी सहन करू शकतो. परंतु हिंदू धर्म थेट गावापर्यंत विभागला जावा, हे मात्र सहन करू शकत नाही. जे अस्पृश्यांच्या राजनैतिक अधिकाराच्या हिताची वार्ता करतात. ते भारत जाणत नाहीत.त्यांना भारतीय समाज कशाचा बनला आहे व कसा घटला आहे ते माहीत नाही. म्हणून मी या गोष्टींचा प्राणपणाने विरोध करण्यास तयार आहे''.[९]

डॉ. बाबासाहेबांनी अस्पृश्यांच्या राजकीय हक्काच्या मुद्दयांचे सप्रमाण विवेचन करून ते इंग्रज अधिकाऱ्यांना व भारतातील सर्व प्रतिनिधींना समजावून दिले व अस्पृश्यांच्या विकासाकरिता कोणाच्या दयेची किंवा सहानुभूतीची आवशयकता ही तकलादू असून त्यांना त्यांच्या प्रगतीसाठी राजकीय **स्वातंत्र्याची** गरज आहे व हे राजकीय **स्वातंत्र्य** अस्पृश्यांना त्यांच्या स्वतंत्रमतदार संघामुळेच प्राप्त होऊशकते. सवर्ण हिंदूंच्या दयेवर अस्पृश्यांना सोडून त्यांची प्रगती होणे शक्य नाही. तर त्यांना त्यांच्या हक्काच्या राजकीय **स्वातंत्र्याची** गरज आहे. हे प्रभावशाली रीतीने समजावून दिले व इतर अल्पसंख्यांकांचा अस्पृश्यांच्या मागणीला पाठिंबा मिळविला. जेव्हा **गांधीजींना** इतर अल्पसंख्यांक अस्पृश्यांच्या मागणीला पाठिंबा देत आहेत, ही गोष्ट समजली तेव्हा गांधीजी मुसलमानांकडे जाऊन त्यांच्या १४ सूत्री मागण्या ज्या कॉंग्रेस, हिंदू महासभा, इतकेच नव्हे तर सायमन कमिशनने सुद्धा स्वीकारल्या नव्हत्या, त्यांचा बेधडक स्वीकार केला.[१०]

भारताच्या भावी राज्यघटनेत अल्पसंख्याक समाजाचे कोणते स्थान असावे,याबाबत निर्णय घेण्यासाठी गोलमेज परिषदेत अल्पसंख्यांक वर्गीय उपसमिती' म्हणजे 'मॉयनॉरिटीज सब कमिटी' नेमण्यात आली होती यात सर्व अल्पसंख्यांकांच्या प्रतिनिधींनी सर्वानुमते एक करारनामा केला होता. या

[९] **डॉ.बाबासाहेब आंबेडकर**, दलितांचे राजकीय अस्तित्व संपुष्टात आणणारा पुणे करार, प्रकाशक -राजेश रघुवंशी राजेश प्रकाशन पुणे ३८. पृ.क्र.३०व ३१

[१०] **डॉ.बाबासाहेब आंबेडकर**, दलितांचे राजकीय अस्तित्व संपुष्टात आणणारा पुणे करार, प्रकाशक -राजेश रघुवंशी राजेश प्रकाशन पुणे ३८. पृ.३८. पृ.क्र.३६.

करारनाम्यातील अकरा मागण्यांपैकी क्र. ९ ची मागणी- सध्या कायदेमंडळात प्रतिनिधीत्वाचा हक्क असलेल्या अल्पसंख्यांक जातीसाठी प्रत्येक कायदेमंडळात स्वतंत्र मतदारसंघ असावा व त्यांना योग्य प्रतिनिधित्व मिळावे, पण यामुळे कोणत्याही बहुसंख्यांक जातीला दुसऱ्या जातीपेक्षा अल्पसंख्यांक अगर तुल्यबळ करण्यात येऊ नये.अशा स्वरूपाची एक मागणी होती. या निवेदनावर....

१) आगा खान (मुस्लीम)

२) डॉ. आंबेडकर (अस्पृश्य)

३) राव बहादूर पन्नियर सेल्वम ( ख्रिश्चन)

४) सर हेन्री गिडने (अँग्लो इंडियन)

५) सर हबर्ट करर (युरोपियन)

यांनी सह्या करून आपली सहमती दर्शविली.

या व्यतिरिक्त डॉ. आंबेडकर व राव बहादूर, आर.श्रीनिवासन यांनी सहया करून अस्पृशांच्या विशेष प्रतिनिधित्वासाठी एक स्वतंत्र निवेदन दिले.अस्पृश्यांच्या मागण्यांसंदर्भात १३/११/१९३१ च्या पत्रात डॉ. आंबेडकर, म. गांधीजींची भूमिका स्पष्ट करताना म्हणतात. अस्पृश्यांना स्वतंत्र मतदारसंघ मिळू नयेत, एवढया बाबतीतच गांधी हे विरुद्ध नसून ''अस्पृश्यांना स्वतंत्र प्रतिनिधीही मिळू नयेत असाही गांधीजींचा कटाक्ष आहे! अस्पृश्य हे हिंदू आहेत म्हणून त्यांच्यासाठी राखीव जागांची वगैरेसुध्दा कायदेशीर तरतूद करण्याची आवश्यकता नाही. असा गांधीजींचा ठाम दुराग्रह आहे! मझी मुंडी गेली तरी बेहत्तर पण हिंदूहून स्वतंत्र असे अस्पृश्यांना मी हक्कपूर्वक काहीही मिळू देणार नाही .इतका गंधीजींना आपल्या विरोधाचा पारा अस्पृश्यांच्या बाबतीत वर चढविला आहे आणि यात आत्मघात आहे. म्हणून मी विरोध करतो असे सांगून आपल्या विरोधाचे जगासमोर समर्थन करीत आहेत.[११]

अशा प्रकारे अल्पसंख्याक व अल्पसंख्याकांचे प्रतिनिधीत्व म्हणजे हक्क यावर म. गांधीजी व डॉ. आंबेडकर यांच्यात बरीच वैचारिक चर्चा घडून आली व अस्पृश्यवर्गाच्या राजकीय हक्काच्या समर्थनात व विरोधात बरेच मुद्दे मांडले गेले. एकमेकांना समजावून देण्याचा प्रयत्न केला गेला ,परंतु कोणताच निर्णय न लागल्यामुळे प्रधानमंत्री घेतील तो निर्णय मान्य होण्याबद्दल गांधीजींनी स्वीकृती दिली व १ डिसेंबर १९३१ रोजी दुसरी गोलमेज परिषद संपली.

[११] **डॉ.बाबासाहेब आंबेडकर**, लेखन आणि भाषणे, खंड १८ भाग १, प्रकाशक **डॉ.बाबासाहेब आंबेडकर** चरित्र साधने प्रकाशन समिती **महाराष्ट्र शासन**, दि.१५.१०.२००२ पृ.क्र.३१४.

## १.६ म. गांधीजी आणि सॅम्युअल होअर पत्र व्यवहार

प्रधानमंत्री घेतील तो निर्णय मान्य करण्याबद्दल सहमती दर्शविली असताना सुद्धा अस्पृश्यांच्या मागण्या मान्य होऊच नयेत. याबाबत गांधीजींनी भारताचे स्टेट सेक्रेटरी सर सॅम्युअल होअर यांच्याशी पत्रव्यवहार केला तो खालीलप्रमाणे.

## गांधीचे होअर यांना पत्र[१२]

येरवडयाच्या तुरूंगातून ता. ११मार्च १९३२ रोजी सर सॅम्युअल होअर याना गांधींनी पुढील पत्र लिहिले.

'प्रिय सर सॅम्युअल,

तुम्हाला आठवत असेलच की, अल्पसंख्यांकांच्या हक्काची मागणी गोलमेज परिषदेपुढे मांडण्यात आली, त्यावेळी केलेल्या भाषणाच्या शेवटी मी म्हटले होते की, अस्पृश्य वर्गांना स्वतंत्र मतदारसंघ देण्याच्या योजनेला मी प्राण जाईपर्यंत विरोध करीन. हे शब्द मी वादाच्या भरात किंवा वक्तृत्वाच्या भरात बोललो नव्हतो. ते विधान मी गंभीरपणाने माझ्या विचाराचे निदर्शक म्हणूनच केले होते. ह्या विधानाची पूर्तता करण्याकरिता हिंदुस्थानात परत आल्यावर सामान्यपणे स्वतंत्र मतदारसंघाच्या पण विशेषतः अस्पृश्यांना ते देण्याच्या योजनेच्या विरूध्द असे लोकमत तयार करण्याचा माझा इरादा होता. परंतु तसे घडून यावयाचे नव्हते! जी वर्तमानपत्रे वाचण्याची मला परवानगी आहे. त्यावरून मलाअसे दिसते की, अस्पृश्यांचे स्वतंत्र मतदारसंघ निर्माण करण्याच्या बाबतीत ब्रिटीश सराकर लवकरच निर्णय जाहीर करणार आहे. प्रथम मला असे वाटत होते की, जर या निर्णयाने स्वतंत्र मतदारसंघ स्थापन केले गेले तर तो निर्णय जाहीर झाल्यानंतर मगच माझी शपथ पाळण्याकरिता कोणते उपाय योजावे हे ठरवावे.परंतु आता असे वाटते की,सरकारला आगाऊ कळविल्याखेरीजआपण आपली शपथ प्रत्यक्ष कृतीत आणणे ही गोष्ट न्याय होणार नाही. शिवाय, माझ्या विधानाबद्दल जे महत्त्व मला वाटते तितके इतरांना न वाटणे हेही साहजिकच होय.

---

१२ **डॉ.बाबासाहेब आंबेडकर**, लेखन आणि भाषणे, खंड १८ भाग १, प्रकाशक **डॉ.बाबासाहेब आंबेडकर** चरित्र साधने प्रकाशन समिती **महाराष्ट्र शासन**, दि.१५.१०.२००२ पृ.क्र.३१९.

## मी स्वतंत्र मतदारसंघाच्या विरूध्द का?

अस्पृश्य वर्गाकरता स्वतंत्र मतदारसंघ निर्माण करण्याच्या योजनेला माझा जो विरोध आहे तो तपशीलवार या ठिकाणी पुनः सांगण्याचे कारण नाही. मी एक अस्पृश्यच आहे असे स्वतःला समजतो. इतरांची गोष्ट व त्यांची गोष्ट अगदी वेगळी आहे. कायदे मंडळात त्यांचे प्रतिनिधी असावे याच्या मी विरुद्ध नाही.दुसऱ्या वर्गाकरिता मतदानाचा अधिकार कितीही संकुचित करण्यात आला तरी चालेल. परंतु शिक्षण, मालमत्ता वगैरे बाबतीतील जरूर अशा मतदार होण्याच्या अटी अस्पृश्यांना न लावता त्यांच्यापैकी प्रत्येक स्त्रीपुरूषाचे नाव मतदारांच्या यादीत समाविष्ट व्हावे असे माझे मत आहे. परंतु मतदारसंघ दिल्याने त्यांचे व केवळ राजकारणाच्या दृष्टीने पाहता हिंदू समाज म्हणून जो काही आहे त्यांचे फार नुकसान होणार आहे असे मला वाटते. स्वतंत्र मतदारसंघामुळे तयांचे किती नुकसान होणार आहे याची बरोबर समजूत पटण्याकरिता स्पृश्य हिंदू समाजामध्ये अस्पृश्य वर्ग कसा सामील आहे व तो त्या समाजावर किती अवलंबून आहे याची जाणीव असणे जरूरीचे आहे. हिंदू समाजाविषयी बोलावण्याचे असल्यास मी असे म्हणेन की, स्वतंत्र मतदार संघामुळे त्या समाजाला जिवंतपणीच छिन्नविछिन्न केल्यासारखे होणार व त्यात फाटफूट होणार!

माझ्या समजुतीने या दलित वर्गाचा प्रश्न हा प्रामुख्याने नैतिक व धार्मिक आहे. या प्रश्नाच्या नैतिक व धार्मिक महत्त्वापुढे राजकारणाच्यादृष्टीने त्यांचे महत्त्व कवडीमोल किंमतीचे ठरते.

## मी प्राणांतापर्यंत अन्नत्याग करणार

मी अगदी लहान असल्यापासून या वर्गाच्या स्थितीबद्दल किती काळजी करीत होतो व अनेक वेळा त्यांच्याकरिता मी प्राणार्पणही करावयास तयार होतो ही गोष्ट तुमच्या लक्षात आली, तरच याबाबतीत माझ्या भावना कोणत्या प्रकारच्या आहेत याची तुम्हाला पारख होईल. या प्रकरणात ही गोष्ट मी गर्वाने सांगतो असे मात्र नव्हे. कारण माझे  असे मत आहे की, शतकेच्या शतके या अस्पृश्यांना या अपमानाच्या दलित स्थितीत हिंदू समाजाने ठेवले आहे याची भरपाई हिंदू समाजाने कोणतेही प्रायश्चित्त यापुढे घेतले तरी होणार नाही.

परंतु ,स्वतंत्र मतदारसंघ निर्माण केल्याने ज्या अपमानाच्या मरणप्राय दु:स्थितीत आज ते आहेत ती सुधारत नाही व त्याचप्रमाणे हिंदू समाजाने त्यांच्या बाबतीत केलेल्या अपकराची निष्कृतीही होत नाही असे मला वाटते, म्हणून अत्यंत नम्रतापूर्वक मला ब्रिटीश सरकारला कळवायचे आहे की, जर ब्रिटीश सरकारने **अस्पृश्यांकरिता स्वतंत्र मतदार संघ निर्माण केले तर मी प्राण जाईपर्यंत अन्न त्याग करीन. मी तुरुंगात कैदी असताना अशा तऱ्हेची गोष्टी करु लागलो तर सरकारला एका मोठ्या घोटाळ्यात पाडून त्यांच्या कारभारात अडचण उपस्थित करणे होय** याची मला जाणीव आहे व त्याबद्दल मला दु:खही होते. शिवाय मी अन्नत्याग करू लागलो तर राजकारणाच्या क्षेत्रात जे मला उच्च स्थान आहे ते लक्षात घेता मी असल्या

अन्नत्यागाच्या गोष्टी करणे म्हणजे ही एक माझी वेडी लहर आहे इतके तरी कित्येकांना वाटल्याशिवाय राहणार नाही व असे करणे हे अत्यंत अनुचित आहे असेही ते म्हणतील. मी अन्नत्याग करण्याचे जे ठरविले आहे ही एक काम करण्याची माझी पद्धत आहे. एवढेच तुम्हाला माझ्यातर्फे म्हणता येईल. मी मोठा समंजस मनुष्य आहे. अशी जी काही माझी ख्याती असेल ती मी गमावून बसलो तरी हरकत नाही. पण मला माझ्या सद्सद्विवेकबुद्धीची आज्ञा मोडता येत नाही. आता जी माझी दृष्टी आहे त्या दृष्टीने पाहता मला तुरुंगातून सोडले तरी माझ्या अन्नत्यागाची शपथ मोडता येणार नााही. मला अशी आशा आहे की, अस्पृश्य वर्गाकरिता स्वतंत्र मतदारसंघ निर्माण करण्याचा सरकारचा काही निश्चय आहे असे नसल्यामुळे तसे संघ करण्यात येणार नाहीत व मला वाटणारी भीती पोकळ ठरेल.

तुमच्याशीहा जो पत्रव्यवहार मी चालू केला आहे. त्याबाबतीत माझ्यापुरता तरी मी अत्यंत गुप्तपणा ठेवला आहे. हे मी सांगणे नकोच. सरदार वल्लभभाई व श्री. महादेव देसाई हे मजबरोबर राहण्याकरिता नुकतेचआले आहेत. त्यांना मात्र या पत्रव्यवहाराची माहिती आहे. तुम्ही सांगाल त्याप्रमाणे व त्या वेळीच हया पत्रांचामी उपयोग करीन.

आपला

(सही) एम. के. गांधी

**गांधीजींच्या पत्राला सर सॅम्युअल होअर यांनी पत्राद्वारे दिलेले उत्तर.**[१२.१]

प्रिय मि. गांधी,

तुमच्या ११ मार्चच्या पत्राला उत्तर म्हणून मी हे पत्र लिहित आहे. प्रथमच मला म्हटले पाहिजे की, अस्पृश्य वर्गाचा स्वतंत्र मतदारसंघ उत्पन्न करण्याच्या बाबतीत तुमच्या भावना किती उत्कट आहेत याची मलापूर्ण जाणीव आहे. मला आता इतकेच म्हणता येईल की, त्या प्रश्नासंबंधी निर्णय देताना त्या प्रश्नांच्या सर्व बाजूंचा विचार करूनच निर्णय दिला जाईल. तुम्हाला माहीतच आहे की, लॉर्ड लोथियन यांच्या अध्यक्षतेखाली नेमलेल्या कमिटीने आपला दौरा अद्याप संपविला नाही व त्या कमिटीने केलेल्या शिफारशी आमच्या हाती येण्यास काही आठवडे लागतील. त्या शिफारशी आमच्या हाती झाल्यानंतर त्या शिफारशींचा विचार आम्हाला काळजीपूर्वक करावा लागेल आणि त्याच वेळी तुम्ही व तुमच्यासारखीच ज्यांची मते आहेत त्यांच्या मताचा पूर्ण विचार केल्याशिवाय आम्ही निर्णय देणार नाही. माझी खात्री आहे की, तुम्ही जर माझ्या जागी असता तर जे मार्ग मी रेखाटला आहे त्याच मार्गाने तुम्हीही गेला असता.

---

१२.१ डॉ.बाबासाहेब आंबेडकर, लेखन आणि भाषणे, खंड १८, भाग १, उपरोक्त पृष्ठ क्रमांक ३१२.

कमिटीच्या शिफारशीची वाट पाहणे तुम्हालाही जरूर वाटले असते. मग त्या शिफारशींचा पूर्ण विचार तुम्ही केला असता आणि शेवटी निश्चित निर्णय करण्यापूर्वी त्या वादविवादात जे दोन पक्ष आहेत त्यांच्या म्हणण्याचाही तुम्ही विचार केला असता. यापेक्षा मी अधिक लिहू शकत नाही. आणि यापेक्षा अधिक मला काही लिहिता येईल अशी तुमची अपेक्षा असेल असे मला वाटत नाही.

आपला

(सही) सर सॅम्युअल होअर

बुधवार दिनांक १७ ऑगस्ट १९३२ रोजी ब्रिटीश सरकारतर्फे मुख्य प्रधान रॅम्से मॅकडोनॉल्ड यांनी जातिविषयक प्रश्नांचा निर्णय हिंदुस्थानात व इंग्लंडात एकाच वेळी जाहीर केला होता. हया निर्णयामध्ये प्रांतिक कायदे कौन्सिलमध्ये प्रत्येक समाजाच्या प्रतिनिधींचा समावेश किती प्रमाणात होईल व सरंक्षणाची कोणाकोणाला आवश्यकता आहे, यांचे निवेदन केलेले होते. अल्पंसख्यांकांच्या काराराप्रमाणे १) मुसलमान २) शीख ३) इंडियन ख्रिश्चन ४) अँग्लो इंडियन आणि ५) युरोपियन यांना 'स्वतंत्र मतदारसंघ' देण्यात आला होता. स्त्रियांनाही जादा स्वातंत्र मतदार संघ देण्यात आला होता. अस्पृश्य समाजासाठी स्वतंत्र मतदारसंघ ठेवला होता. त्याशिवाय सर्वसाधारण सामान्य मतदार संघातर्फे जादा मत देण्याचा अधिकर ठेवला होता.[१३]

[१३] **डॉ.बाबासाहेब आंबेडकर**, लेखन आणि भाषणे, खंड १८ भाग १, प्रकाशक **डॉ.बाबासाहेब आंबेडकर** चरित्र साधने प्रकाशन समिती **महाराष्ट्र शासन**, दि.१५.१०.२००२ पृ.क्र.३१४.पृ.क्र.३२३.

## प्रकरण २

# कम्युनल ॲवॉर्डची घोषणा ,म. गांधी ,डॉ. आंबेडकर व इंग्रज अधिकारी यांच्या भूमिका

## अनुक्रमणिका


| अनुक्रमांक | तपशील |
|---|---|
| २.१ | जातिविषयक प्रश्नाचा निर्णय |
| २.२ | रॅम्से मॅकडोनॉल्ड यांचा खुलासा |
| २.३ | डॉ. आंबेडकरांच्या दृष्टिकोनातून कम्युनल ॲवॉर्ड |
| २.४ | कम्युनल ॲवॉर्ड संदर्भात म.गांधीजींची भूमिका |
| २.५ | मुख्य प्रधान रॅम्से मॅकडोनॉल्ड यांचे गांधीजींना उत्तर |
| २.५.१ | गांधीजींचे मुख्य प्रधानांना उत्तर |
| २.५.२ | डॉ. आंबेडकरांचे गांधीजींच्या उपोषण विरुद्ध पत्रक |

**प्रकरण २**

# कम्युनल ॲवॉर्डची घोषणा, म. गांधी ,डॉ. आंबेडकर व इंग्रज अधिकारी यांच्या भूमिका

## २.१ जातिविषयक प्रश्नाचा निर्णय

१ डिसेंबर १९३१ ला कोणताच निर्णय नहोता दुसऱ्या गोलमेज परिषदेचे सूप वाजले .शेवटी आठ महिन्यानंतर ब्रिटीश सरकारने स्वतः निर्णय घेतला आणि बुधवार दि. १७ ऑगस्ट १९३२ रोजी जातिविषयक प्रश्नांचा निर्णय $(Communal Award)$जाहीर केला.

हया निर्णयामध्ये प्रांतिक कायदे कौन्सिलमध्ये प्रत्येक समाजाच्या प्रतिनिधींचा समावेश किती प्रमाणात होईल व संरक्षणाची कोणाकोणाला आवश्यकता आहे, यांचे निवेदन केलेले होते. अल्पंसंख्यांकांच्या कराराप्रमाणे १) मुसलमान २) शीख ३) इंडियन ख्रिश्चन ४) अँग्लो इंडियन आणि ५) युरोपियन यांना 'स्वतंत्र मतदारसंघ' देण्यात आला होता. स्त्रियांनाही जादा स्वतंत्र मतदारसंघ देण्यात आला होता. अस्पृश्य समाजासाठी स्वतंत्र मतदारसंघ ठेवला होता. त्याशिवाय सर्वसाधारण सामान्य मतदारसंघातर्फे जादा मत देण्याचा अधिकर ठेवला होता.

## निर्णयाची कलमे[१४]

१. डिसेंबरच्या पहिल्या तारखेला दुसऱ्या राऊंड टेबल परिषदेच्या शेवटी मुख्य प्रधानांनी स्पष्टपणे जाहीर केले होते की, जातिविषयक प्रश्नांवर सर्व पक्षांना मान्य होईल, अशा प्रकारची तोड जर हिंदुस्थानातील सर्व जातींनी काढली नाही, तर साम्राज्य सरकारने असा निश्चय केला आहे की, हिंदुस्थानच्या राज्यघटनेच्या प्रगतीला जातिविषयक प्रश्नाचा अडथळा न येऊ देता एक तात्पुरती योजना काढून सरकार अडथळा दूर करील. हया मुख्य प्रधानांच्या घोषणेला ताबडतोब पार्लमेंटच्या दोन्ही सभागृहांनी पाठिंबा दिला होता.

[१४] **डॉ.बाबासाहेब आंबेडकर**, लेखन आणि भाषणे, खंड १८ भाग १, प्रकाशक **डॉ.बाबासाहेब आंबेडकर** चरित्र साधने प्रकाशन समिती **महाराष्ट्र शासन**, दि.१५.१०.२००२ पृ.क्र.३१४. पृ.क्र.३२३.

२. दि. १९ मार्चला जेव्हा जातीचे एकमत न झाल्यामुळे नव्या राज्यघटनेच्या प्रगतीला अडथळा होत असल्याचे साम्राज्य सरकारला कळविण्यात आले .तेव्हा सरकारने आपण या कठीण व वादग्रस्त प्रश्नाचा फेरविचार करीत असल्याचे निदर्शनास आणले. आता सरकारला असे स्पष्ट समजून आले आहे की, नव्या राज्यघटनेतील  अल्पसंख्यांकांच्या दर्जाबद्दलचे काही प्रश्न तरी निदान सोडविल्याशिवाय घटना तयार करण्याच्या कार्यात पुढील प्रगती होणे शक्य नाही.

३. म्हणून साम्राज्य सरकारने पुढे दिलेल्या योजनेतील सूचनांचा, पार्लमेंटपुढे हिंदी राज्यघटनेबाबत ठेवण्यात येणाऱ्या योजनेमध्ये समावेश करावयाचा असे ठरविले आहे. या योजनेची मर्यादा फक्त प्रांतिक कायदेमंडळात ब्रिटीश हिंदुस्थानातील जातीचे प्रतिनिधी घेण्यासंबंधीच्या प्रश्नापुरती मर्यादित करण्यात आली आहे. मध्यवर्ती कायदे मंडळातील प्रतिनिधी संबंधीचा विचार का पुढे ढकलण्यात आला आहे याची कारणे कलम २० मध्ये दिलेली आहेत. हया योजनेचे स्वरूप मर्यादित केले. याचा अर्थ इतर प्रश्न सोडविण्यात अपयश आले असे नसून प्रतिनिधित्वाचे प्रमाण व मार्ग हया मुख्य प्रश्नासंबंधी निर्णय दिल्यानंतर ज्या प्रश्नांचा अद्याप विचार झालेला नाही. त्या प्रश्नांसंबंधी जातीने आपसात तडजोडीचा मार्ग शोधून काढणे शक्य होईल अशी आशा आहे.

४. हया बाबतीत साम्राज्य सरकारला असे स्पष्ट जाहीर करावयाचे आहे की, सरकारने आता दिलेल्या निवाडयात फेरफार करण्याबद्दलच्या सर्व पक्षांनी पाठिंबा न दिलेल्या अशा कोणत्याही सूचनांचा सरकार विचार करणार नाही. परंतु हिंदुस्थान सरकारचा नवा कायदा पास होण्यापूर्वी जर देशातील जातींनी आपापसातएखाद्या प्रांताकरिता किंवा अखिल ब्रिटीश हिंदुस्थानकरिता याहून निराळी अशी योजना एकमताने तयार केली तरी ती मान्य करून हया योजनेच्या जागी ती मान्य करण्यविषयी पार्लमेंटला शिफारस करण्याला साम्राज्य सरकार आनंदाने तयार होईल.

५. गव्हर्नर असलेल्या प्रांतातील कायदे व जेथे अप्पर चेम्बर असेल तेथील लोअर चेम्बरमध्ये कोणत्या प्रमाणात प्रतिनिधी निवडायचे हे कलम २४ मध्ये नमूद केले आहे.

## दहा वर्षानंतर फेरविचार

६ मुसलमान, युरोपियन व शीख वगैरे मतदारसंघांना दिलेल्या जागांकरिता निवडणुक प्रांतातील स्वतंत्र मतदार संघामधून होतील. परंतु काही ठिकाणी मागासलेली म्हणून निवडणुकीच्या क्षेत्रमर्यादेतून वगळण्यात येतील. निवडणुकीच्या बाबतीत केलेली ही व खाली नमूद केलेल्या व्यवस्थेच्या दहा वर्षांनी त्या त्या जातीच्या संमतीने फरेविचार करण्याची राज्यघटनेत तरतूद करण्यात येईल व त्यासाठी योग्य मार्गही ठरवून देण्यात येईल.

७. मुसलमान, शीख, हिंदी ख्रिश्चन (कलम १०) अ‍ॅग्लो इंडियन (कलम ११) किंवा युरोपियन मतदार संघात जे मतदार नाहीत अशा सर्व लायक मतदारांना सामान्य मतदार संघात मते देता येईल.

## मराठयांकरिता सात जागा

८ मुंबई प्रांतात एकाहून अधिक सभासद निवडून येण्याच्या काही मतदार संघातून मराठयांकरिता सातजागा राखून ठेवण्यात येतील.

## अस्पृश्यांकरिता तरतूद

९ बहिष्कृत वर्गातील लायक मतदार सामान्य मतदारसंघातून मते देतील. हया एकाच उपायाने बहिष्कृत वर्गात आणखी बराच काळपर्यंत कायदे मंडळातून पुरेसे प्रतिनिधी मिळणे शक्य नसल्यामुळे कलम २४ मध्ये नमूद केल्याप्रमाणे त्यांना सामान्य मतदारसंघात काही खास जागा देण्यता येतील. हया जागांवरील निवड केवळ ''बहिष्कृत वर्गातील'' लायक मतदारांच्या मतांनीच होईल व या मतदारांना सामान्य मतदार संघातूनही मते देता येतील. हे मतदारसंघ 'बहिष्कृत वर्गाची' संख्या जास्त असेल अशा निवडक जागीच निर्माण करण्यात यावेत व मद्रास खेरीज इतर प्रांतात असे मतदार संघ सर्व प्रांतभर असू नयेत असा इरादा आहे.बंगालमध्ये काही सामान्य मतदारसंघात बहुसंख्यांक मतदार 'बहिष्कृत वर्गाचे' मतदार असतील असा अंदाज आहे, म्हणून पुढील चौकशी होईपर्यंत त्या प्रांतात खास बहिष्कृत वर्गाच्या मतदारसंघातून किती सभासद निवडून यावयाचे हे ठरविलेले नाही. तथापि बंगालच्या कायदे मंडळात 'बहिष्कृत वर्गाचे' निदान दहाहून कमी प्रतिनिधी असू नयेत.

लायक मतदारांपैकी बहिष्कृत वर्गाच्या खास मतदारसंघातून मते देण्याला लायक कोण याची व्याख्या अद्याप ठरविलेली नाही. परंतु त्या बाबतीत मतदान कमिटीने नमूद केलेल्या तत्त्वाचे अनुकरण करण्यात येईल. परंतु उत्तर हिंदुस्थानात काही ठिकाणी केवळ 'अस्पृश्यतेचे' तेवढे लक्षण मान्य करणे अयोग्य असल्यामुळे त्यात फेरफार करणे जरुरीचे भासेल.

हे बहिष्कृत वर्गाचे खास मतदार संघ काही कालमर्यादेपेक्षा अधिक वर्षे आवश्यक आहे, असे सरकारला वाटत नाही. म्हणून अशी योजना आहे की, अगोदरच जर ते रद्द करण्यात आलेले नसतील तर वीस वर्षानंतर रद्द व्हावेत.

१० हिंदी ख्रिश्चन मतदार स्वतंत्र मतदारसंघातून मते देतील. परंतु प्रांतातून फक्त एक दोन ठिकाणीच हिंदी ख्रिश्चनांचे स्वतंत्र मतदारसंघ निर्माण करावे लागतील असे दिसते. हया भागातील हिंदी ख्रिश्चनांना सामान्य मतदार संघातून मते देता येणार नाहीत. परंतु बाहेरील हिंदी ख्रिश्चन सामान्य मतदारसंघातून मते देतील. बिहार, ओरिसा प्रांतातील बहुतेक हिंदी ख्रिश्चन हे रानटी जामतीचे असल्यामुळे त्यांच्यासाठी निराळी व्यवस्था करावी लागेल.

११ अँग्लो इंडियन मतदार स्वतंत्र मतदारसंघातून मते देतील. त्यांच्यासाठी सर्व प्रांतांची क्षेत्रमर्यादा ठेवण्याचा विचार असून पोस्टाने मते पाठविण्याचीही तरतूद करता येईल. परंतु या बाबतीतील व्यावहारिक अडचणीचा विचार करावयाचा असून अद्याप निश्चित निर्णय करण्यात आलेला नाही.

१२ मागासलेल्या भागांना द्यावयाच्या जागांचा प्रश्न अद्याप विचारात असल्यामुळे आता अशा विभागासाठी दिलेल्या जागा हया तात्पुरत्या समजण्यात याव्या.

## स्त्रियांचे प्रतिनिधी

१३ कायदे मंडळातील स्त्रियांचे थोडे तरी प्रतिनिधी निश्चितपणे यावेत या गोष्टीला साम्राज्य सरकार फार महत्त्व देत असून स्त्रियांसाठी काही जागा राखून ठेवल्याशिवाय ही गोष्ट शक्य दिसत नाही. त्याचप्रमाणे स्त्रियांचे प्रतिनिधी एकाच जातीतून प्रमाणाबाहेर येता कामा नये. परंतु हे भय नाहीसे करण्याचा निश्चित मार्ग अद्याप सरकारला सापडलेला नाही. म्हणून स्त्रियांच्या प्रतिनिधींची एकेक जागा एकेका जातीकरिता मर्यादित करण्यात आली असून त्याला अपवाद कलम २४ मध्ये नमूद करण्यात आले आहे व अशारीतीने स्त्रियांच्या खास जागा निरनिराळया जातींमध्ये विभागण्यात आल्या आहेत, मात्र त्यांच्या निवडणुकीच्या निश्चित पद्धतीचा अद्याप विचार चालू आहे.

## मजूर वर्गाचे प्रतिनिधी

१४ मजूर वर्गाचे प्रतिनिधी जातिविशिष्ट नसलेल्या मतदार संघातून निवडण्यात येतील. निवडणुकीचा मार्ग अद्याप निश्चित व्हावयाचा आहे. पण काही ठिकाण मजुरांचे प्रतिनिधी ट्रेड युनियन्समधून निवडून येतील व काही ठिकाणी मतदार कमिटीने शिफारस केल्याप्रमाणे खास मतदारसंघातून निवडून येतील.

१५ व्यापार, उद्योगधंदे, खाणी व मळे यांना दिलेल्या खास जागावंरील निवडणुका, चेम्बर्स ऑफ कॉमर्स व इतर संस्था यांच्यामार्फत होतील. पण त्या संबंधीच्या सविस्तर योजनेचा अद्याप विचार चालू आहे.

१६ जमिनदारांना दिलेल्या खास जागांवरील निवडणुका जमीनदारांच्या खास मतदारसंघातून होतील.

१७ युनिव्हर्सिटीच्या जागांच्या निवडणुकीच्या पद्धतीचा अद्याप विचार चालू आहे.

## फेरफार करण्याचा हक्क

१८. वरील प्रश्नांचा विचार करताना किरकोळ मुद्यांचा विचार न करणे सरकारला अशक्य झाले आहे. तथापि अद्याप मतदारसंघाच्या मर्यादा निश्चित करण्याचा प्रश्न शिल्लक राहिलाच असून तो हिंदुस्थानातच शक्य तितक्या लवकर विचारासाठी घेण्यात यावा.काही बाबतीत मतदारसंघाच्या सोयीसाठी जागांच्या संख्येत थोडाफार फरक करणे कदाचित आवश्यक वाटल्यास तसे करण्याचा हक्क सरकारने आपल्याकडे राखून ठेवला आहे. पण असे फेरफार करताना जातींचा समतोलपणा बिघडणार नाही. अशी खबरदारी घेण्यात येईल. बंगाल व पंजाब यांच्या बाबतीत मात्र काही फेरफार करण्यात येणार नाही.

## सेकंड चेम्बरचा विचार

१९. प्रांतामधील कायदे मंडळात सेकंड चेम्बर असावे काय? या प्रश्नाचा आतापर्यंत फारच थोडा विचार झाला आहे. कोणत्या प्रांतातून सेकंड चेम्बरची आवश्यकता आहे. याचा विचार व्हावयाचा आहे. परंतु सरकारला असे वाटते की, सेकंड चेम्बर स्थापन करतानासुद्धा लोअर चेम्बरमध्ये जातीचे जे प्रमाण असेल, त्यात कोणत्याही प्रकारचा बिघाड होऊ देता कामा नये.

## मध्यवर्ती कायदेमंडळ

२०. मध्यवर्ती कायदेमंडळाच्या घटनेचा विचार करताना संस्थांचा व इतर प्रश्न उद्‌भवत असल्यामुळे सध्या त्याचा विचार करण्याचा सरकारचा इरादा नाही. परंतु पुढे ज्यावेळी विचार करावयाचा त्यावेळी सर्व जातींना त्यात पुरेसे प्रतिनिधित्व मिळेल याबद्दल सरकार खबरदारी बाळगील.

२१. सिंध प्रांत स्वतंत्र व्हावा हे सरकारने तत्वत: मान्य केलेआहे. परंतु त्याचा आर्थिकदृष्टया अद्याप विचार व्हावयाचा असल्यामुळे कायदेमंडळातील सभासदांचे आकडे देताना मुंबई प्रांत व सिंध यांचे निरनिराळे आकडे दिले आहेत. त्याप्रमाणे सिंधसह मुंबई प्रांताचेही आकडे दिलेले आहेत.

२२. बिहार, ओरिसाचे आकडे सध्याच्या प्रांताचे असून ओरिसा स्वतंत्र करण्याचा प्रश्न अद्याप विचारात आहे.

२३. कलम २४ मध्ये मध्य प्रांत व वऱ्हाड यांचे मिळून आकडे दिले आहेत. यावरून वऱ्हाडच्या भावी घटनेसंबंधी काही निश्चित धोरण ठरले आहे असे नाही.

## निरनिराळया प्रांतातील जागांची वाटणी

२४. प्रांतिक कायदेमंडळात खालच्या सभेत खालीलप्रमाणे जागांची वाटणी केली जाईल.

| | विविध वर्ग | मद्रास प्रांत | मुंबई प्रांत सिंधसह | बंगाल प्रांत | संयुक्त प्रांत | पंजाब प्रांत |
|---|---|---|---|---|---|---|
| | १ | २ | ३ | ४ | ५ | ६ |
| १ | सर्वसाधारण | १२८ | ९२ | ७८ | १२८ | ४२ |
| | स्त्री प्रतिनिधी | ०६ | ०५ | ०२ | ०४ | ०१ |
| २ | अस्पृश्य | १८ | १० | - | १२ | - |
| ३ | मागासलेले | ०१ | ०१ | - | - | - |
| ४ | मुसलमान | २० | ६२ | ११७ | ६४ | ८४ |
| | स्त्री प्रतिनिधी | ०१ | ०१ | ०२ | ०२ | ०२ |
| ५ | हिंदी ख्रिश्चन | ०८ | ०३ | ०२ | ०२ | ०२ |
| | स्त्री प्रतिनिधी | ०१ | - | - | - | - |
| ६ | अँग्लो इंडियन | ०२ | ०१ | ०३ | ०१ | ०१ |
| | स्त्री प्रतिनिधी | - | ०१ | ०१ | - | - |
| ७ | युरोपियन | ०३ | ०४ | ११ | ०२ | ०१ |
| ८ | व्यापारी वगैरे | ०६ | ०८ | १९ | ०३ | ०१ |
| ९ | जमीनदार | ०६ | ०३ | ०५ | ०६ | ०५ |
| १० | विश्वविद्यालय | ०१ | ०१ | ०२ | ०१ | ०१ |
| ११ | मजूर | ०६ | ०८ | ०८ | ०३ | ०३ |
| १२ | शीख | - | - | - | - | ३१ |
| | स्त्री प्रतिनिधी | - | - | - | - | ०१ |
| | एकूण | **२१५** | **२००** | **२५०** | **२२३** | **१७५** |

| | विविध वर्ग | बिहार ओरिसा | मध्यप्रांत वऱ्हाड | आसाम प्रांत | नॉर्थ वेस्ट फ्रंटियर |
|---|---|---|---|---|---|
| १ | सर्वसाधारण | ९६ | ७४ | ४३ | ०९ |
| | स्त्री प्रतिनिधी | ०३ | ०३ | ०३ | ०१ |
| २ | अस्पृश्य | ०७ | १० | ०४ | - |
| ३ | मागासलेले | ०८ | ०१ | ०९ | - |
| ४ | मुसलमान | ४१ | १४ | ३४ | ३६ |
| | स्त्री प्रतिनिधी | ०१ | - | - | - |
| ५ | हिंदी ख्रिश्चन | ०२ | - | ०१ | - |
| | स्त्री प्रतिनिधी | - | - | - | - |
| ६ | अँग्लो इंडियन | ०१ | ०१ | - | - |
| | स्त्री प्रतिनिधी | - | - | - | - |
| ७ | युरोपियन | ०२ | ०१ | ०१ | - |
| ८ | व्यापारी वगैरे | ०४ | ०२ | ११ | - |
| ९ | जमीनदार | ०५ | ०३ | - | ०२ |
| १० | विश्वविद्यालय | ०१ | ०१ | - | - |
| ११ | मजूर | ०४ | ०२ | ०४ | - |
| १२ | शीख | - | - | - | ०३ |
| | स्त्री प्रतिनिधी | - | - | - | - |
| | एकूण | १७५ | ११२ | १०८ | ५० |

बंगाल प्रांतातील अस्पृश्य प्रतिनिधींची संख्या मागाहून कळविण्यात येईल. याशिवाय ज्या ज्या प्रांताला जादा स्वतंत्र उमेदवारसंघ देण्यात येणार आहेत, त्यांचीही नावे हया जातिविषयक प्रश्नाच्या निर्णयामध्ये दिलेली नाहीत. परंतु त्या प्रांतांची नावे लवकरच जाहीर होतील. ज्या प्रांतात अस्पृश्य वर्गाची लोकसंख्या बरीच आहे त्या प्रांतात जादा स्वतंत्र मतदारसंघ देण्यात येतील.

## २.२ रॅम्से मॅक्डोनॉल्ड यांचा खुलासा

१७ ऑगस्ट १९३२ रोजी जातिविषयक प्रश्नाचा $(CommunalAward)$ निर्णय जाहीर केल्यानंतर मुख्य प्रधान रॅम्से मॅक्डोनॉल्ड यांनी हा निर्णय का दिला? कोणत्या परिस्थितीत निर्णय दिला? निर्णय देताना कोणकोणत्या मुदयांचा विचार केला? निर्णय जाहीर झाल्यानंतर लोकांच्या मनात कोणकोणते प्रश्न निर्माण होऊशकतात आणि भारतीय पुढाऱ्यांनी या निर्णयाकडे सकारात्मकम दृष्टीने पाहून पुढे प्रगतीच्या मोकळया वाटेने वाटचाल करण्याबाबत जाहीर खुलासा केला, तो मुख्य प्रधान रॅम्से मॅकडोनॉल्ड यांच्याच शब्दात खालीलप्रमाणे.

ब्रिटीश सरकारच्यावतीने मी आज जो जातिविषयक प्रश्नाचा निर्णय जाहीर केला आहे. त्याबद्दल मुख्यप्रधान म्हणून नव्हे ,तर गेल्या दोन वर्षाच्या निकटच्या सहवासाने जी सहकार्याची मैत्री जडली आहे त्या मैत्रीच्या प्रेरणेने थोडासा खुलासा करीत आहे.

हिंदुस्थानातील जातिविषयक प्रश्नांच्या बाबतीत आम्हाला ढवळाढवळ करण्याची काहीच आवश्यकता नव्हती. गेल्या राऊंड टेबल परिषदेच्या प्रसंगी याबद्दल आम्ही मुद्दाम हा प्रश्न तुम्ही आपापसात सोडवा असे सांगितले आहे. आम्हाला पक्के ठाऊक आहे की, या जातिविषयक प्रश्नाचा आम्ही कसाही निर्णय दिला तरी प्रत्येक जातीला, समाजाला आपल्या मागण्या अपुऱ्या मिळण्याची कुरकूर राहणारच. तरी पण हिंदी राजकीय घटना सुरळीतपणे यशस्वी होण्यासाठी प्रत्येक समाजाला काहीतरी सोयीचे मार्ग स्वीकारून संघशक्तीने ही नवीन घटना अंमलात आणणे आवश्यक आहे. अशाप्रकारच्या उज्ज्वल कर्तव्याची जाणीव झाल्यास हिंदुस्थानला ब्रिटीश राष्ट्राच्या वसाहतीच्या घटनेत नवीन स्थान प्राप्त होईल.

आमचे कर्तव्य उघड आहे. जातिविषयक प्रश्नाबाबत समाजासमाजात एकमत न होता उलट नवीन राज्यघटनेला अडथळा उत्पन्न होण्याची भीती वाटल्यास सरकारला कडक उपाययोजना करणे भाग पडेल आणि म्हणून आम्ही पूर्वी वचन दिल्याप्रमाणे व गेल्या दोन्ही गोलमेज परिषदेमध्ये हिंदुस्थानातील निरनिराळया समाजाच्या प्रतिनिधींनी केलेल्या विनंतीप्रमाणे आणि ब्रिटीश सरकारने जो पूर्वी खुलासा केला होता त्याला अनुसरून आज आम्ही हिंदी प्रांतिक कायदे कौन्सिलातील निरनिराळया समाजाच्या प्रतिनिधींची संख्या कितपत असू शकेल हे जाहीर करीत आहोत. आम्ही हा जाहीर केलेला निर्णय प्रत्येक समाजाने पडताळून पाहून आम्ही नवीन राज्यघटेनेचे बिल पार्लमेंटला सादर करण्यापूर्वी आपला सलोख्याचा निकाल सादर करावा.

पार्लमेंट पुढे जाऊन आमच्या आजच्या या योजनेला कायद्याचे स्वरूप येण्यापूर्वी दुसरी एखादी सर्व हिंदी प्रतिनिधींच्या संमतीने तयार झालेली अशी जर एखादी योजना मध्यंतरी निर्माण होऊ शकली तर आम्हाला अर्थातच अतिशय आनंद वाटेल. पण मागील अनुभववरून पाहता या बाबतीतील कोणतीही वाटाघाट अगर तडजोड फलद्रूप होत नाही आणि म्हणून हिंदी पुढाऱ्यांनी जर नवी योजना निर्माण

करण्यासाठी वाटाघाट सुरू केली तर तिच्यात सरकार भाग घेऊ शकणार नाही. पण हिंदी पुढाऱ्यांनी आपापसात आपल्या ज्ञातिविशिष्ट भानगडी मिटवून सर्वांच्या संमतीने जर एखादी अशी नवीन योजना सादर केलीच, तर आमची ही आजची योजना परत घेण्यास व ती नवीन स्वीकारण्यास सरकार मोठया आनंदाने कबूल होईल. एखाद्या विशिष्ट प्रांताने जरी सर्वसंमत अशी नवीन योजना तयार केली तरी त्या प्रांतापुरती आमची ही योजना रद्द करून ती नवीन स्वीकारण्यात येईल.

आजच्या या सरकारी निर्णयाचा बरेवाईटपणा ठरविण्यापूर्वी कोणत्या प्रत्यक्ष परिस्थितीत हा निर्णय सरकारला द्यावा लागला, याचा विचार होणे जरुरीचे आहे. अल्पसंख्यांक समाजांना आपले हितसंरक्षण करण्यासाठी स्वतंत्र मतदारसंघाची अपरिहार्य आवश्यकता फार वर्षापासून वाटत आहे. ही गोष्ट प्रथम लक्षात घेतली पाहिजे. त्यामुळे आतापर्यंत सनदशीर व प्रगतीपर अशा ज्या योजना तयार झाल्या .त्यापैकी प्रत्येकीत स्वतंत्र मतदारसंघाचा अंतर्भाव करण्यात आला आहे. सगळ्यात एकसारखा मतदारसंघ असावा अशी सरकारची कितीही इच्छा असली तरी स्वतंत्र मतदारसंघाची व इतर संरक्षणबंधनांची आवश्यकता अल्पसंख्यांक समाजांना तीव्रपणे भासत आहे. ही गोष्ट सरकारला दृष्टिआड करता येत नाही. ही आवश्यकता अल्पसंख्यांक समाजांना पूर्वी का वाटावी याची चर्चा करीत बसण्यात काही फायदा नाही. भूतकाळापेक्षा भावी काळाचा विचार करणे मी अधिक इष्ट समजतो. हिंदुस्थानातील लहान मोठया सर्व जमाती एकदिलाने व विश्वासाने कार्याला लागतील व संरक्षणबंधनाची कोणालाच आवश्यकता भासणार नाही .अशा भावी काळाची मी मार्गप्रतीक्षा करीत आहे. पण मंध्यतरी आहे ही वस्तुस्थिती लक्षात घेऊन तिला अनुरुप अशी ही अपवादात्मक स्वरुपाची योजना सादर करणे सरकारला भागच होते.

या निर्णयाला अनुलक्षून त्यातील दोन महत्त्वाच्या प्रश्नांचा खास उल्लेख करणे मला आवश्यक वाटते. एक प्रश्न अस्पृश्य समाजाविषयी आहे व दुसरा स्त्रीवर्गासंबंधी आहे. या दोन वर्गांची ज्या योजनेत खास तरतूद करण्यात येणार नाही ,अशी कोणतीच योजना सरकारला मान्य होणार नाही. अस्पृश्यांसंबंधी विचार करताना दोन मुद्यांकडे आम्ही विशेष लक्ष पुरविलेले आहे. ज्या भागात अस्पृश्यांची वस्ती पुष्कळ आहे त्या प्रांतात अगर त्या भागात त्यांच्या विश्वासाचे व त्यांना पसंत असलेले त्यांच्यपैकी प्रतिनिधी निवडून देण्याची संधी अस्पृश्य समाजाला देणे हा एक मुद्दा आणि असे करताना ज्यामुळे ते नेहमी आताप्रमाणे वेगळे राहतील अशी मतदानपद्धती त्यांना न देणे हा दुसरा मुद्दा .या दोन मुद्यांना **अनुसरून** अस्पृश्य समाजातील मतदारांनी हिंदुच्या संयुक्त मतदारसंघात मते द्यावी व आपल्याला पसंत पडेल असा प्रतिनिधी निवडून द्यावा ,अशी तरतूद करण्यात आली आहे. यामुळे अस्पृश्य समाजाची हेळसांड करणे स्पृश्य वर्णीय उमेदवारांना हिताचे वाटणार नाही व अस्पृश्य समाजाची सदिच्छा राखण्याकडे त्यांची आपोआप प्रवृत्ती होईल. याशिवाय आणखी वीस वर्षे त्यांना दुसरी एक खास सवलत देण्यात येत आहे. अस्पृश्यांचे स्वतंत्र मतदारसंघ स्थापून त्या गटांमार्फत आपले स्वत:चे प्रतिनिधी अस्पृश्य मतदारांना निवडून देता येतील. या योजनेमुळे अस्पृश्य समाजातील काही मतदारांना दुहेरी मताचा अधिकार प्राप्त

होणार आहे. ही सवलत जरी अपूर्व असली तरी अस्पृश्य समाजाची एकंदर परिस्थिती व इतर वर्गाची त्यांच्या बाबतीतील वागणूक वगैरे गोष्टी लक्षात घेता अशीही सवलत अस्पृश्य वर्गाला देणे त्यांच्या प्रगतीच्या दृष्टीने आवश्यक आहे.

स्त्रियांच्या मताधिकारासंबंधी विचार करता आधुनिक काळात एक गोष्ट सर्वांना समजून चुकली आहे आणि ती ही की, हिंदी स्त्रियांची चळवळ ही हिंदी राष्ट्राच्या प्रगतीची एक मुख्य गुरुकिल्ली आहे. सुशिक्षित आणि प्रभावशाली नागरिक या नात्याने हिंदुस्थानातील स्त्रीवर्गाने हिंदी राष्ट्राच्या सार्वजनिक आयुष्यक्रमात भाग घेतल्याशिवाय त्या राष्ट्राला पाहिजे असलेला दर्जा त्याला प्राप्त होणार नाही. स्त्री **वर्गाच्या**m मताधिकारांचा प्रश्न सोडविताना जातिविशिष्ट धोरणाचा स्वीकार करणे हे नि:संशयपणे कित्येकांना रुचणार नाही. पण स्त्रियांकरिता राखीव जागांची व्यवस्था करणे व त्या जागा सर्व समाजात सारख्या प्रमाणात वाटून देणे ही गोष्ट जर आवश्यक आहे तर असे केल्याशिवाय गत्यंतरच नाही.

हा इतका खुलासा केल्यानंतर निरनिराळया जातींच्या परस्परविरोधी मागण्या व हक्क यांची तोंडमिळवणी करण्याची ही योजना म्हणजे एक सरळ व प्रामाणिक असा प्रयत्न आहे असे सांगून हिचा स्वीकार करण्याविषयी सर्व हिंदू पुढाऱ्यांना माझी विनंती आहे. सर्वांच्या सर्वच मागण्या पूर्ण करण्याचे **सामर्थ्य या योजनेत नसले व त्या दृष्टीने ही अपूरी वाटली तरी हिचा सर्वांनी स्वीकार** करून हिंदुस्थानच्या भावी राजकीय प्रगतीचा मार्ग खुला करावा, अशी माझी सर्वांना शिफारस आहे. या योजनेला नावे ठेवून तिचा धिक्कार करणाऱ्यांनी वारंवार सांगूनही आपल्याला हिच्यापेक्षा अधिक चांगली व सगळ्यांचे अधिक समाधान करणारी अशी दुसरी योजना तयार करता आली नाही ही वस्तुथिती कृपा करून विसरू नये. शेवटी हिंदी लोकांनाच हा प्रश्न कायमचा व समाधानकारपणे सोडविता येणे शक्य आहे. या आमच्या योजनेमुळे तात्पुरती अडचण दूर होऊन पुढील प्रगतीचा मार्ग मोकळा झाला तरी ते मोठेच कार्य झाले असे आम्ही समजू आणि आमची या निर्णयासंबंधी अधिकात अधिक अशी एवढीच अपेक्षा आहे. या प्रश्नाप्रमाणे महत्त्वाचे आणखी किती तरी प्रश्न आहेत व हा अशारीतीने सुटल्यावर त्या दुसऱ्या प्रश्नाकडे हिंदी पुढाऱ्यांचे लक्ष लागून राजकीय प्रगतीचे पाऊल पुढे पडावे ,अशी आमची इच्छा आहे. जातीजातीत सलोखा होऊन सर्वांनी एकजुटीने कार्य केल्याशिवाय हिंदी राष्ट्राच्या प्रगतीचे पाऊल पडणार नाही ,ही गोष्ट ध्यानात घेऊन या महत्त्वाच्या प्रसंगी पुढारी त्याप्रमाणे आपले धोरण आखतील, अशी आम्हाला अशा आहे.[१५]

---

[१५] **डॉ.बाबासाहेब आंबेडकर**, लेखन आणि भाषणे, खंड १८ भाग १, प्रकाशक **डॉ.बाबासाहेब आंबेडकर** चरित्र साधने प्रकाशन समिती **महाराष्ट्र शासन**, दि.१५.१०.२००२ पृ.क्र.३१४.

वरील खुलाशाचे काळजी पूर्वक अध्ययन केल्यानंतर असे लक्षात येते की ''फोडा आणि झोडा'' नीतीचा अवलंब करून इंग्रज भारतात आपले स्थान बळकट करत आहेत या विचारापेक्षा इंग्रजांनी ज्या महत्त्वाच्या सुधारणा भारतात घडवून आणल्या जसे सतीची चाल बंद करणे, विधवा विवाहास मान्यता, इंग्रजी शिक्षणाचा प्रसार याच मालिकांमध्ये भारतातील सर्व सामाजिक समूहांना विकासाची संधी उपलब्ध करून देण्याच्या दृष्टीने त्यांना प्रशासनात प्रतिनिधीत्व असावे याकरिता कम्युनल ॲवॉर्ड विचारात घेणे आवश्यक आहे.

## २.३ डॉ. आंबेडकरांच्या दृष्टीकोनातून कम्युनल ॲवॉर्ड

जातीय निवाडा म्हणजेच $(Communal Award)$घोषितझाल्यानंतर भारतीय समाजातून त्यावर वेगवेगळया प्रतिक्रिया उमटणे सहाजिकच होते. या सर्व प्रतिक्रियांमध्ये डॉ. आंबेडकर व म. गांधीजी यांच्या प्रतिक्रियांना अधिक महत्त्व असणे सहाजिकच आहे. रॅम्से मॅक्डोनॉल्ड यांनी हिंदू मुसलमान, शीख, ख्रिश्चन, अस्पृश्य वगैरे समाजाच्या बाबतीत जो निकाल जाहीर केला त्याबाबत डॉ. आंबेडकर यांनी आपला अभिप्राय येणेप्रमाणे व्यक्त केला आहे.

मुख्य प्रधान मि. मॅक्डोनॉल्ड जो जातिविषयक निर्णय देणार, तो सर्वांना सर्वप्रकारे समाधानकारक वाटेल अशी अपेक्षा कोणीच केली नव्हती आणि त्यामुळे अस्पृश्य समाजाच्यावतीने राऊंड टेबल परिषदेमध्ये मी व माझे सहकारी मित्र रावबहादूर, श्रीनिवासन यांनी अस्पृश्यांकरिता ज्या राजकीय हक्कांची मागणी केली होती, ती अस्पृश्यांना तंतोतंत मिळेल अशी आशा अर्थात आम्हीही बाळगली नव्हती.'' आमच्या मागणीत थोडा फार फेरबदल होईल असे आम्हालाही वाटत होते. पण प्रत्यक्ष निर्णय पाहता त्यात केलेली छाटाछाट अत्यंत निर्दयपणाची आहे असे मला वाटते. प्रांतिक कायदे कौन्सिलात ज्या जागा आमच्या वाट्याला आल्या आहेत त्या अत्यंत अुपऱ्या असल्युमेळे अस्पृश्यांचे फारच थोडे प्रतिनिधी कायदे कौन्सिलात जाऊ शकतील व त्यामुळे त्यांचा पडावा तसा प्रभाव तेथे पडणार नाही. म्हणजेच अस्पृश्यांना आपल्या हिताचे रक्षण करण्यासाठी जितक्या कमीत कमी जागा मिळवावयाला पाहिजे होत्या तितक्याही या निर्णयाने न मिळाल्यामुळे हा निर्णय अस्पृश्य समाजाच्या दृष्टीने पाहता अपुरा. असमाधानकारक व अन्यायजनक समजला पाहिजे.

अस्पृश्यांच्या बाबतीत ही जी उघड विषमता व हा जो धडधडीत पक्षपात या निर्णयाच्या निमित्ताने व्यक्त झाला आहे त्याचे समर्थन कोणाला कसे करता येणार? असला अन्याय व्हावयाला नको होता आणि त्यातल्या त्यात पंजाबच्या बाबतीत तर या पक्षपातीपणाचा कळस झाला आहे. इतर प्रांतात अस्पृश्यांना अपुऱ्या का होईनात पण काही तरी स्वतंत्र जागा मिळालेल्या आहेत पण पंजाबमध्वये अस्पृश्य समाजाच्या वाट्याला काहीही स्वतंत्र राजकीय हक्क अगर प्रतिनिधित्व आलेले नाही आणि मला प्रत्यक्ष पंजाबची जी माहिती मिळाली आहे तिच्यावरून पाहता उत्तर हिंदुस्थानातील दुसऱ्या इतर प्रांतांपेक्षा पंजाब प्रांतातील

अस्पृश्य समाजाची स्थिती अत्यंत वाईट आहे. अमानुष प्रकारच्या सामाजिक जुलूमाखाली व अन्यायाखाली पंजाबमधील अस्पृश्य समाज चिरडून गेला आहे. असे असल्यामुळे पंजाबमधील अस्पृश्य समाजाला आपल्या हितरक्षणासाठी व उन्नतीसाठी स्वतंत्र मतदारसंघाची व राखीव जागांची वगैरे तर खास आवश्यकता होती. अशी वस्तुस्थिती असता इंग्रज सरकारने पंजाबच्या अस्पृश्यांना काहीच सवलती का देऊ नयेत हेच मुळी समजत नाही. माझ्या मते या अन्यायाचे एकच कारण दिसते आणि ते पंजाबातील इतर समाजाचा जबरदस्तपणा व अस्पृश्यांची असहाय व गरीब स्थिती हे होय. पंजाबातील इतर जबरदस्त समाजांच्या गोंगाटाला घाबरून त्यांच्या संतोषाकरिता व त्यांच्या वाटणीच्या सोयीसाठी अस्पृश्य समाजासारख्या सर्वतोपरी नाडलेल्या वर्गाला जे मिळणे अत्यावश्यक होते ते त्यांना न देता त्यांचा तो न्याय्य हिस्सा इतर समजांना सरकारने देऊन टाकलेला आहे. हा ढळढळीत अन्याय आहे आणि ख्रिश्चन व अॅग्लो इंडियन की ज्यांची संख्या अस्पृश्यांच्या मानाने पंजाबमध्ये काहीच नाही आणि ज्यांच्यावर अस्पृश्याप्रमाणे सामाजिक जुलूम अगर अन्यायही तेथे होत नाही त्यांना मात्र स्पेशल जागा व खास प्रतिनिधी सरकारने दिलेले आहेत. या पक्षपातीपणामुळे असपृश्यांच्या बाबतीतील अन्यायाचे स्वरूप मात्र अधिक उघडकीस आलेले आहे.

अशाप्रकारचे अन्याय व पक्षपात या निर्णयात असल्यामुळे त्याचा विचार करण्याकरिता ऑल इंडिया डिप्रेस्ड क्लासेस फेडरेशनची जी बैठक लवकरच भरणार आहे त्या बैठकीत या निर्णयाला अस्पृश्य समाजाचा पाठिंबा मिळेल असे मला वाटत नाही.[१५.१]

## २.४ कम्युनल अॅवॉर्ड संदर्भात म.गांधीजींची भूमिका

कम्युनल अॅवॉर्ड घोषित झाला तेंव्हा गांधीजी येरवडा तुरुंगात होते .११ मार्च १९३२ रोजी गांधीजींनी सर सॅम्युअल होअर यांना पत्र लिहून इंग्रजांना या बाबतीत पूर्व सूचना दिली होती की, जर इंग्रजांनी अस्पृश्य वर्गाला स्वतंत्र मतदारासंघ दिला तर ते इंग्रजांच्या या निर्णयाचा प्राणजाईपर्यंत विरोध करतील.

शेवटी १७ ऑगस्ट १९३२ रोजी जातीय निवाडा घोषित झाला व मुसलमान, शीख, ख्रिश्चन यांच्या प्रमाणेच अस्पृश्य समाजाला सुद्धा स्वतंत्र मतदारसंघ घोषित झाला. आणि गांधीजींच्या मनाची पक्की समजूत झाली की, इंग्रजांचा हा निर्णय जाणिवपूर्वक व षडयंत्रकारी आहे. इंग्रज हेतूपूर्वक अस्पृश्य समाजाला हिंदू समाजापासून अगल करण्याचा प्रयत्न करीत आहेत. या निर्णयामुळे स्पृश्य समाज व अस्पृश्य समाज या दोघांचाही तोटा आहे. अशा या बिकट स्थितीतून बाहेर पडण्यासाठी व परिस्थितीला सावरण्यासाठी उपोषण हा एकच मार्ग आहे. ही बाब त्यांनी दिनांक १८ ऑगस्ट १९३२ रोजी लिहिलेल्या

---

**१५.१ - डॉ.बाबासाहेब आंबेडकर लेखन आणि भाषणे, खंड १८ भाग १,उपरोक्त, पृ.क्र.३२१**

पत्रावरून समजते ते पत्र खालील प्रमाणे.

## म.गांधींचे मुख्य प्रधानांना पत्र[१६]

येरवडा सेंट्रल प्रिझन,

ता. १८ ऑगस्ट १९३२

प्रिय मित्र यांस,

अस्पृश्य वर्गाच्या प्रतिनिधीत्वासंबंधी मी सर सॅम्युअल होअर यांना तारीख ११ मार्च रोजी जे पत्र पाठविले. ते त्यांनी तुमच्या व मंत्रिमंडळाच्या अवलोकनात आणले असेल याबद्दल मुळीच संशय नाही. ते पत्र या पत्राचा भाग समजूनच वाचावे.

अल्पसंख्यांकांच्या प्रतिनिधीत्वासंबंधी ब्रिटीश सरकारने दिलेला निर्णय मी वाचला आणि त्याचा विचार करण्याचे तहकूब केले. मी सर होअर यांना जे पत्र लिहिले आणि १३ नोव्हेंबर १९३१ रोजी सेंट जेम्स राजवाडयामध्ये गोलमेज परिषदेच्या अल्पसंख्याक मंडळीच्या बैठकीत जे धोरण मी जाहीर केले त्याला अनुसरून पाहता मला तुमच्या निर्णयाला प्राणांतापर्यंत विरोध केला पाहिजे. तसे करण्याचा एकच मार्ग आहे आणि तो हा की, प्रायोपवेशनाने प्राणत्याग करावयाचा. मीठ किंवा सोडा घेऊन केवळ जलप्राशन करून उपोषण करावयाचे आणि मरण स्वीकारावयाचे असा माझा निश्चय मी जाहीर करीत आहे. या प्रायोपवेशनाच्या काळात ब्रिटीश सरकारने स्वत:च्या प्रेरणेमुळे किंवा लोकमताच्या दडपणामुळे आपल्या निर्णयाचा फेरविचार केला आणि त्यांनी आपली जातवार मतदारसंघाची योजना मागे घेतली. तर माझा उपवास थांबेल. अस्पृश्यांचे प्रतिनिधी सार्वत्रिक मतदारसंघातून निवडून यावेत आणि सर्वांना समान अधिकार असावा. मग त्यांचे क्षेत्र कितीही व्यापक होवो. यारीतीने जातिनिर्णय बदलण्यात आला नाही. तर सर्वसामान्य परिस्थितीत ता. २० सप्टेंबर रोजी दुपारपासून माझे प्रायोपवेशन सुरू होईल.

---

१६ डॉ.बाबासाहेब आंबेडकर लेखन आणि भाषणे, खंड १८ भाग १, प्रकाशक डॉ.बाबासाहेब आंबेडकर चरित्र साधने प्रकाशक समिती महाराष्ट्र शासन, दि.१५.१०.२००२ पृ.क्र. ३३४

हे माझे पत्र तुम्हाला तारेने पाठविण्यात यावे, असे मी येथील अधिकाऱ्यांना कळवित आहे. म्हणजे त्यायोगे तुम्हाला बराच काळ आधी सूचना मिळाल्यासारखे होईल. हे पत्र टपालाने अगदी सावकाशीने आपल्या हाती पडले तरी मी तुम्हाला पुरेसा वेळ देतो आहेच. हे पत्र आणि होअर यांना मी पाठविलेले उपर्युक्त ही दोन्हीही पत्रे  शक्य तितक्या लवकर प्रसिद्ध करावित. असे माझे म्हणणे आहे. तुरुंगातील नियम निष्ठेने पाळून मी या दोन्हीही पत्रांची माहिती सरदार वल्लभभाई पटेल आणि श्री. महादेव देसाई यांजशिवाय दुसऱ्या कोणालाही दिलेली नाही. पण तुम्ही सवड दिली तर माझी इच्छा अशी आहे की, त्या पत्राचा परिणाम जनतेवर व्हावा आणि म्हणूनच त्यांच्या प्रसिद्धीची मागणी मी केलेली आहे.

मी जो प्रायोपवेशनाचा निर्धार केला त्याबद्दल मला दुःख होते. पण एक धार्मिक प्रवृत्तीचा माणूस यादृष्टीने आणि तसा मी आहे असे मी समजतो मला दुसरा मार्गच मोकळा नाही. होअर यांच्या पत्रात मी म्हटलेच आहे की, सरकारने आपली कुचंबणा टाळण्यासाठी मला बंधमुक्त करण्याचे ठरविले, तरी माझे प्रायोपवेशन चालूच राहील. कारण या जातिनिर्णयाला प्रतिकार दुसऱ्या कोणत्या साधनाने करता येईल अशी मला आशा वाटत नाही आणि सन्मानपूर्वक झाली तरच माझी मुक्तता मला हवी आहे. इतर मार्गांनी ती घडवून आणण्याची मला काडीमात्र इच्छा नाही.

अस्पृश्यांना स्वतंत्र मतदारसंघ देणे हे त्यांना व हिंदू धर्माला घातक आहे ही  समजूत सर्वस्वी चुकीची असू शकेल आणि माझे मत विकृती पावलेले असेल. खरोखरच जर तशी वसतुस्थिती असेल, तर माझ्या जीविताचे तत्वज्ञान  म्हणून जे आहे त्यातील इतर बाबतीतही मी बरोबर नाही असे ठरेल. तसे झाल्यास अन्नत्यागाने प्राणत्याग करणे हे माझ्या चुकीचे प्रायश्चित होईल  आणि त्याबरोबरच जे असंख्य स्त्रीपुरुष आज एखाद्या अर्भकाप्रमाणे माझ्या चातुर्यावर विश्वास ठेवीत आहेत त्यांच्यावरील एक ओझेच उचलल्यासरखे होईल.पण जर माझे मन रास्त असेल आणि तसेच ते आहे याबद्दल मला तिळमात्र शंका वाटत नाही, तर मी योजलेले कृत्य हे माझ्या जीवनामार्गाचे सार्थक करणारेच होईल. पाव शतकाहून अधिक काळ मी त्याच जीवनमार्गाने चालत आलो आहे आणि त्यात मी भरपूर यश मिळविले नाही असेही नाही.

आपला विश्वस्त मित्र,

(सही) एम के. गांधी.

## २.५ मुख्य प्रधान रॅम्से मॅक्डोनॉल्ड यांचे गांधीजींना उत्तर

११ मार्च १९३२ रोजी गांधीजींनी सर सॅम्युअल होअर यांना लिहिलेल्या पत्रात ते कायदेमंडळात अस्पृश्यांना प्रतिनिधित्व असावे या तत्त्वाच्या विरोधी नाहीत, असे मत व्यक्त केलेले असताना देखील १८ ऑगस्ट १९३२ च्या मुख्य प्रधान रॅम्से मॅक्डोनॉल्ड यांना लिहिलेल्या पत्रात मात्र वेगळीच भूमिका घेताना दिसतात. या भूमिकेचे रॅम्से मॅक्डोनॉल्ड याना आश्चर्य वाटते व दुःख सुध्दा होते. अस्पृश्यांना त्यांच्या वतीने बोलणारे, त्यांची बाजू मांडणारे खरे प्रतिनिधी मिळूच नये ,अशी गांधीजींची इच्छा आहे. अशा आशयाचे पत्र रॅम्से मॅकडोनॉल्ड यांनी मं.गांधी यांना लिहिले .ते पत्र येणे प्रमाणे-

### मुख्य प्रधानांचे उत्तर[१७]

१० डौनिंग स्ट्रीट,

ता.८ सप्टेंबर १९३२

प्रिय मि. गांधी,

तुमचे पत्र मिळाले आणि मला मोठा विस्मय वाटला व त्याबरोबर अत्यंत तीव्र खेदही झाला. पण असेही वाटल्याशिवाय राहिले नाही की, अस्पृश्यांसंबंधी सरकारी निर्णयात खरोखर कोणता अर्थ निघतो याबद्दल तुमचा गैरसमज होऊनच तुम्ही ते पत्र लिहिले आहे. हिंदू समाजापासून अस्पृश्य वर्गाची कायमची फाळणी करण्यास तुम्ही अगदी कडवा विरोध करीत आहात, हे आमच्या धान्यात नेहमी आहेच. तुम्ही आपले मत अल्पसंख्य मंडळापुढे व ता. ११ मार्च रोजी होअर यांना लिहिलेल्या पत्रात लख्खपणे मांडले आहे. तसेच तुमच्या मनाला हिंदू समाजातील मोठया वर्गाचा पाठिंबा आहे ,हेही आम्ही जाणत होतो आणि म्हणून अस्पृश्यांना प्रतिनिधित्वाचे हक्क देण्याचा विचार करतेवेळी आम्ही तुमच्या मताकडे अत्यंत काळजीपूर्वक लक्ष पुरविले.

अस्पृश्यांच्या संस्थांकडून आमच्याकडे जे अनंत अर्ज आले आणि तुम्हांसही मान्य असणाऱ्या ज्या अडचणी अस्पृश्यांचे वाटेमध्ये आहेत .त्या सर्वांचा आम्ही विचार केला आणि कायदेमंडळात योग्य प्रमाणात प्रतिनिधी मिळविण्याचा अस्पृश्यांचा जो हक्क आहे त्याचे रक्षण करणे हे आमचे कर्तव्य आहे असे आम्हाला वाटले. पण त्याबरोबरच अस्पृश्य समाज हिंदू समाजापासून तोडण्यात येईल असे कोणतेही कृत्य न करण्याची

१७ डॉ.बाबासाहेब आंबेडकर लेखन आणि भाषणे, खंड १८ भाग १, प्रकाशक डॉ.बाबासाहेब आंबेडकर चरित्र साधने प्रकाशक समिती महाराष्ट्र शासन, दि.१५.१०.२००२ पृ.क्र. ३३६

आम्ही खबरदारी घेत होतो. कायदेमंडळात त्यांना प्रतिनिधित्व असावे या तत्त्वाला मी विरुद्ध नाही असे तुम्हीच आपल्या ता. ११ मार्चच्या पत्रात नमूद केले आहे.

सरकारी योजनेप्रामणे मागासलेले वर्ग (डिप्रेस्ड क्लासेस) हा हिंदू जातीचा एक भाग राहून त्यांना हिंदूमतदारसंघात समानतेच्या भूमिकेवरून मते देता येतील. शिवाय पहिली वीस वर्षे हिंदू जातीचा एक भाग राहूनही मागासलेल्या वर्गांना स्वतंत्र मतदारसंघामुळे आपल्या हक्कांचे व हितसंबंधाचे संरक्षण करता येईल. यास्तव सध्याचे स्थितीत त्या वर्गांना स्वतंत्र मतदारसंघ असणे आवश्यक आहे. ज्या ठिकाणी मागासलेल्या वर्गांना असे स्वतंत्र मतदारसंघ असणे आवश्यक आहे. त्या ठिकाणी सर्वसाधारण हिंदू मतदारसंघातर्फे मत देण्याचा त्यांचा हक्क हिरावून घेण्यात येणार नाही. तर उलट हिंदू जातीतील त्यांचे स्थान अचल राहावे म्हणून त्यांना मतदानाचा हा दुबार हक्क देण्यात येत आहे. शिवाय आम्ही सर्व मागासलेल्या वर्गाचा समावेश सर्वसामान्य म्हणजे प्रायः हिंदू मतदारसंघातही केल्यामुळे त्यांचा असा परिणाम होणार आहे की, स्पृश्य हिंदू उमेदवाराला अस्पृश्य मतदारापुढे मतयाचना करावी लागेल व अस्पृश्य उमेदवाराला स्पृश्य मतदारांपुढे तशीच याचना करावी लागेल. अशारीतीने हिंदू समाजातील ऐक्य कायम राहील.

मागासलेल्या वर्गांना विभक्त मतदारसंघ देताना असाही एक विचार केला की, जबाबदार राज्यपद्धतीच्या प्रारंभकाली आपल्या गाऱ्हाण्यांना वाचा फोडण्यासाठी व विशिष्ट ध्येयाच्या विरुद्ध होणाऱ्या निर्णयांना तोंड देण्यासाठी त्यांचे म्हणून स्वतंत्र उमेदवार नऊपैकी सात प्रांतात निवडून येणे अगत्याचे आहे. त्यामुळे त्यांच्यावर दुसऱ्याच्या ओंजळीने पाणी पिण्याचा प्रसंग येणार नाही. सध्याच्या काळी राखीव जागा ठेवून त्यासाठी प्रतिनिधी निवडण्याच्या प्रश्नाचा आम्ही विचार केला नाही. मुसलमानांना दिलेल्या जातवार स्वतंत्र मतदारसंघापेक्षा अस्पृश्यांना जो स्वतंत्र मतदारसंघ देण्यात आला आहे त्याुळे त्यांचा असा फायदा होणार आहे की, मुसलमानाला सर्वसाधारण मतदारसंघातर्फे मत देता येणार नाही किंवा त्याला उमेदवार म्हणूनही उभे राहता येणार नाही. उलट  कोणत्याही पात्र अशा अस्पृश्याला सर्वसामान्य मतदारसंघातर्फे मत देता येईल व उमेदवार म्हणूनही उभे राहता येईल. मुसलमानांना स्वतंत्र मतदारसंघामुळे ज्या जागा मिळाल्या आहेत त्या वाढण्याची काही आशा नाही. परंतु त्यांना बुहतेक सर्व प्रांतातून लोकसंख्येच्या प्रमाणापेक्षा जास्त प्रतिनिधित्व मिळालेले आहे. परंतु अस्पृश्यांच्या बाबतीत मात्र आम्ही जाणूनबुजूनच त्यांना लोकसंख्येच्या प्रमाणापेक्षा कमी प्रतिनिधित्व दिले आहे. असे करण्यात (म्हणजे विभक्त मतदारसंघ देण्यात) आमचा असा उद्‌देश आहे की, केवळ अस्पृश्यांतर्फे निवडलेले असे थोडेतरी त्यांचे प्रतिनिधी कायदेमंडळात निवडून यावे.

आपला संकेत तर मला असा दिसतो की, सरकारी योजनेमुळे निकृष्ट अवस्थेला पोचलेल्या अस्पृश्यांना आपल्यातर्फे बोलणारे आपले म्हणून प्रतिनिधी निवडण्याचा जो फायदा मिळणार आहे तो फायदा त्यांना मिळूच नये व त्याचसाठी प्रायोपवेशनासारखे भयंकर दिव्य आचरण्यास आपण तयार झाला आहात. आपले हे प्रायोपवेशन अस्पृश्यांना संयुक्त मतदारसंघ मिळवा यासाठी दिसत नाही कारण तो

त्यांना देण्यात आलाच आहे. तसेच हिंदू समाजात ऐक्य राहावे म्हणून आपला हा निश्चय आहे असे म्हणावे तर तेही खोटेच. कारण सरकारी योजनेत त्याचीही तरतूद करण्यात आलीच आहे. या सर्व गोष्टींचा विचार करता, मला तर असे वाटते की वस्तुस्थिती लक्षात न घेता आपण हे दिव्य आचरण्याचे ठरविले आहे. बरे, जातवारीच्या निर्णयाचा विचार न करता सर्व हिंदी लोकांनी हातपाय गाळून आम्हाला जेव्हा विनंती केली. तेव्हाच मनातून नसतानाही ब्रिटीश सरकारने अल्पसंख्यांकांचा प्रश्न हाती घेण्याचे आम्ही ठरविले. आता त्या निकालात एक अटीशिवाय फेरबदल होणे शक्य नाही व ती अट म्हणजे ही की, जातींनी मिळून एकमताने एक योजना केली तर ती सरकार मान्य करील.

सर सॅम्युअल होअर यांच्या पत्रासह सर्व पत्रव्यवहार प्रसिद्ध व्हावा अशी तुमची इच्छा आहे. याप्रमाणे तो प्रसिद्ध करण्यास माझीही संमती आहे. शेवटी आपल्याला माझी एवढीच विनंती की, सरकारी निर्णयाचा आपण पुनःएकवार साकल्याने  विचार करून आपण जी भयंकर गोष्ट करण्यास सिद्धझाला आहात तिची उपयुक्तता ठरवावी.

आपला ,

(सही) जे.रॅम्से मॅक्डोनॉल्ड

## २.५.१ गंधीजींचे मुख्य प्रधानांना उत्तर

८ सप्टेंबर १९३२ रोजीच्या गांधीजींच्या भूमिकेला विरोध करणारे व गांधीजींना आपल्या निर्णयाचा पुन्हा योग्य विचार करण्याचा सल्ला देणारे रॅम्से मॅक्डोनॉल्ड यांचे पत्र प्राप्त झाल्यानंतर दिनांक ९ सप्टेंबर १९३२ रोजी गांधीजींनी रॅम्से मॅक्डोनॉल्ड यांना जातीय निवाड्यामुळे अस्पृश्यांना स्पृश्य हिंदू समाजापासून कायद्याने वेगळे केलेजात आहे याचे दुःख होते. अशा आशयाचे पत्र खाली देत आहे.

# म. गांधींची प्रायोपवेशनाची प्रतिज्ञा[१८]

प्रिय मित्र,

आपण जे स्पष्ट व सविस्तर पत्र पाठविले त्याबद्दल मी आपला आभारी आहे. वाईट असे वाटते की, आपण माझ्या मनातही नसलेला अर्थ केला आहे. मागासलेल्या वर्गाच्या हिताचा बळी घेण्यास मी निघालो आहे हा जो आपण माझ्यावर आरोप करता त्याला सरळ उत्तर म्हणजे माझे हे दिव्य व्रतच होय. मला तर असा निश्चय करणे धर्म वाटते. अस्पृश्यांना दुबार मतदानाचा हक्क मिळाला एवढयाच गोष्टीने हिंदू समाजात पडणारी दुफळी टळू शकत नाही. अस्पृश्यांना विभक्त मतदारसंघ दिल्यामुळे त्यांचा फायदा तर होणार नाहीच परंतु त्यामुळे हिंदू समाजात विष टोचल्याप्रमाणे मात्र झाले आहे. मला एवढेच म्हणावयाचे आहे की, जिव्हाळयाच्या व धर्ममूलक प्रश्नाचा निर्णय आपल्याला योग्य लावता येणे शक्यच नाही.

अस्पृश्यांना वाजवीपेक्षा जास्त प्रतिनिधित्व देण्याच्याविरूद्ध मी जाणार नाही. ज्या गोष्टीचे शल्य मला बोचते ती गोष्ट म्हणजे हिंदू समाजापासून अस्पृश्यांना कायद्याने तोडून काढण्यात येत आहे. या सरकारी योजनेमुळे आजपर्यंत अस्पृश्योद्धाराची चळवळ ज्या महापुरुषांनी मोठया स्वार्थत्यागाने केली त्यांच्या प्रयत्नांवर पूर्ण विरजण पडणार आहे. त्यासाठीच प्रायोपवेशनाचे दिव्य अंगीकारण्यास मी तयार झालो आहे. माझ्या या व्रतासाठी मी अस्पृश्यांचाच तेवढा प्रश्न घेतला आहे. याचा अर्थ मात्र असा नव्हे की, आपल्या निर्णयातील इतर गोष्टी मला मान्य आहेत. माझ्या मते या निर्णयातील इतर बाबीही तितक्याच सदोष व आक्षेपार्ह आहेत.

आपला स्नेहांकित,

(सही) एम के. गांधी.

---

१८ डॉ.बाबासाहेब आंबेडकर लेखन आणि भाषणे, खंड १८ भाग १, प्रकाशक डॉ.बाबासाहेब आंबेडकर चरित्र साधने प्रकाशक समिती महाराष्ट्र शासन, दि.१५.१०.२००२ पृ.क्र. ३३८

## २.५.२ डॉ. आंबेडकरांचे गांधीजींच्या उपोषण विरुद्ध पत्रक

१७ ऑगस्ट १९३२ रोजी घोषित झालेल्या जातीय निवाडयाचे म.गांधीजी तसेच डॉ. आंबेडकर यांनी खुल्या दिलाने स्वागत केल्याचे दिसून येत नाही. उलट काही मुद्यांचा निषेध केल्याचेच वरील पत्रव्यवहारातून दिसून येते. याचे कारण देखील त्यास अनुरूप असेच आहे. कारण जातीय निवाडयामुळे गांधीजींना हिंदू समाजातील फुटीची भीती वाटते. तर अस्पृश्यांना सर्व प्रांतात या निवाडयामुळे पर्याप्त प्रतिनिधित्व मिळाले नाही.याची डॉ. आंबेडकरांना खंत जाणवते. अशातच म.गांधी जातीय निवाडयाच्या विरूद्ध प्राणांतिक उपोषणाचे शस्त्र बाहेर काढतात. डॉ. आंबेडकर लिखित स्वरुपात गांधीजींच्या भूमिकेचा निषेध करतात. ते जाहीर पत्रक दि. १९ सप्टेंबर १९३२ रोजीचे पत्रक आहे ते खालील प्रमाणे -

दिनांक१९/९/१९३२ रोजी बाबासाहेब आंबेडकरांनी म. गांधीजींच्या आमरण उपोषणाच्या निमित्ताने आपली न्यायभूमिका विशद करणारे आणि गांधीजींचा उपवास अस्पृश्यांचे हक्क व हितसंबंध यांच्या विरोधी कसा आहे , हे दर्शविणारे पत्रक जाहिरपणे प्रसिद्ध केले. त्याचा आशय खालीलप्रमाणे -

गांधीजींच्या उपोषणामुळे माझी स्थिती विपरित व बिकट झाली आहे. ज्ञातिविषयक (जातीय निवाडा) प्रश्न हा इतर प्रश्नांच्या मनाने क्षुल्लक आहे, असे गांधीजी गोलमेज परिषदेत म्हणाले होते. मग अशा क्षुल्लक प्रश्नांसाठी गांधीजी आपला प्राण पणास का लावीत आहेत. स्वतंत्र मतदारसंघ हा एकटया अस्पृश्य समाजालाच मिळाला आहे असे नाही. शीख, ख्रिश्चन, अँग्लोइंडियन, मुसलमान या सर्वांना स्वतंत्र मतदारसंघ देण्यात आले आहेत. शिवाय जमिनदार, मजूर,व्यापारी यांच्याकरिताही स्वतंत्र मतदारसंघाची योजना करण्यात आली आहे. आरंभी फक्त मुसलमान व शीख सोडून बाकी सर्वांच्या स्वतंत्र मतदारसंघास गांधीजींनी हरकत घेतली होती, म्हणजे विरोध केला होता. परंतु नंतर केवळ अस्पृश्यांच्या स्वतंत्र मतदारसंघाचाच विरोध कायम ठेवला बाकीच्यांना त्यांच्या विरोधातून वजा केले.

हिंदू धर्माने अस्पृश्यांना माणूसकीचा हक्क नाकारून त्याचे खच्चीकरण केले आहे. त्याला परावलंबीबनवून स्पृश्य वर्गाच्या दावनीला बांधले आहे. थोडक्यात त्याला गुलाम बनविले आहे.

अशा परिस्थितीत विचारी व न्यायी माणसाने या वर्गाच्या विकासासंदर्भात, प्रगती विषयक विचार केला पाहिजे. परंतु अस्पृश्य समाजाच्या हाती राजकीय सत्तेची सूत्रे शक्य तितक्या अधिक प्रमाणात आणण्यासाठी गांधी झटत तर नाहीत ,परंतु उलट ब्रिटीश सरकारच्या जातीय निवाडयामुळे जो अल्पसा का होईना पण राजसत्तेचा हिस्सा निश्चितपणे अस्पृश्य समाजाच्या हाती भावी राज्यघटनेत येऊ पाहत आहे तो देखील अस्पृश्य समाजाच्या हातून हिरावून घेण्यासाठी आपला प्राण पणास लावून गांधीजींनी विरोध चालविला आहे.एवढेच नव्हे तर अल्पसंख्याकांचा करारनामा अस्तित्वात येण्याच्या अधिकारापासूनच अस्पृश्यांना राजकीय सत्ता थोडीसुद्धा मिळू नये म्हणून मुसलमानांना हाती धरून गांधीजींनी खटपट

करून पाहिली .मी तुमच्या १४ मागण्या मान्य करतो, परंतु अस्पृश्यांच्या राजकीय हक्काच्या मागणीला तुम्ही विरोध करा. असा प्रस्ताव गांधीजींनी मुस्लीम प्रतिनिधींसमोर ठेवला होता, पण त्याचा काही एक उपयोग झाला नाही.

गंधीजींच्या या निर्णयाला असलेल्या विरोधाचे एक कारण म्हणजे अस्पृश्य समाज या निर्णयामुळे हिंदू समाजापासून विभक्त पडतो. परंतु  हिंदू समाजाचे हितसंरक्षक समजले जाणारे डॉ. मुंजे यांना असे अजिबात वाटत नाही.

सरकारने दिलेला हा निर्णय इतर बाबतीतही अपुरा असला तरी ज्यांना स्वतंत्र मतदारसंघ पाहिजे त्यांचे व ज्यांना संयुक्त मतदारसंघ पाहिजे त्यांचे असे दोघांचेही त्यात समाधान करण्याची व्यवस्था केली आहे.

गांधीजींविषयी म्हणाल तर त्यांना पाहिजे तरी काय, हेच स्पष्टपणे समजत नाही. असे मानण्यात येते की, गांधीजी जरी स्वतंत्र मतदारसंघाच्या विरूद्ध असले तरी ते संयुक्त मतदारसंघ व राखीव जागा देण्याच्या विरुद्ध नाहीत. पण ही मोठी भूल आहे. आज त्यांचे मत काय बदललेले असेल ते असो. पण लंडनमध्ये असताना अस्पृश्यांना हिंदूंपेक्षा राजकीय असे वेगळे अगर स्वतंत्र अस्तित्व देणारी कोणतीच योजना आपल्याला पसंत नसल्याचे त्यांनी अगदी स्पष्टपणे जाहीर केलेले होते. अस्पृश्यांच्या स्वतंत्रमतदारसंघासच नव्हे तर संयुक्त संघातील राखीव जागेच्या योजनेसही आपला प्राणांतिक विरोध असल्याचे त्यांनी लंडनला जाहीरपणे बोलून दाखविले होते. नंतर माझ्याशी वाटाघाटी करताना माझ्या समजुतीसाठी एक योजना शेवटी त्यांनी सादर केली. त्याची ही योजना निरूपयोगी तर होतीच पण तिला सुद्धा कायद्याचे स्वरूप अगर पाठिंबा देण्यास त्यांची तयारी नव्हती.

गांधीजींच्या या योजनेप्रमाणे अस्पृश्यवर्गातील उमेदवाराने निवडणुकीसाठी उभे रहावे. उच्च वर्गातील दुसरेही उमेदवार त्याच जागेकरिता उमेदवार म्हणून उभे राहतील. पुढे निवडणूक होऊन तिच्यात अस्पृश्य उमेदवार निवडून आला नाही तर त्याला वाटल्यास या निवडणुकीच्या निकालाविरूद्ध अर्ज करावा. या अर्जाप्रमाणे केवळ अस्पृश्यवर्णीय म्हणून हा उमेदवार निवडून आला नाही. असा जर त्याला न्यायाधीशांकडून निकाल मिळाला तर गांधीजी म्हणाले की, निवडून आलेल्यांपैकी एखाद्या उच्चवर्णीय हिंदुने आपल्या जागेचा राजीनामा द्यावा, अशी मी व्यवस्था करीन. मग पुन्हा या पराभूत अस्पृश्य उमेदवाराने अगर वाटल्यास दुसऱ्याने निवडणुकीला पुनः उभे रहावे. व पुन्हा तो पडल्यास त्याने वाटल्यास प्रथम केला होता तसाच अर्ज वगैरे करून व तसाच निर्णय मिळवून पुन्हा निवडणुकीची ही शर्यत खेळावी. अशा प्रकारच्या जुन्या योजनांऐवजी गांधीजींनी आपले नवे म्हणणे सादर करावे ,असा माझा आग्रह आहे.

अन्नत्याग करून प्राणसमर्पण करण्याची आपली दुर्धर प्रतिज्ञा त्यांनी दुसऱ्या थोर कार्यासाठी राखून ठेवायची होती.

काहीहीझाले तरी स्पृश्य हिंदूंच्या हवाली माझ्या लोकांचे भविष्य **सोपविण्यास** मी कदापिही कबूल होणार नाही.[१९]

अशाप्रकारे गांधींजीच्या वास्तवभूमिकेचे विश्लेषण डॉ. आंबेडकरांनी या पत्रकात केलेले आपणास जाणवते.

---

[१९] डॉ.बाबासाहेब आंबेडकर लेखन आणि भाषणे, खंड १८ भाग १, प्रकाशक डॉ.बाबासाहेब आंबेडकर चरित्र साधने प्रकाशक समिती महाराष्ट्र शासन, दि.१५.१०.२००२ पृ.क्र. ३४०.

**प्रकरण ३**

# पुणे कराराचे स्वरूप

## अनुक्रमणिका


| अनुक्रमांक | तपशील |
|---|---|
| ३.१ | राजा मुंजे करार |
| ३.२ | हिंदू पुढाऱ्यांची तातडीची बैठक |
| ३.३ | २० सप्टेंबर १९३२ उपोषणाचा -पहिला दिवस |
| ३.४ | २१ सप्टेंबर १९३२ उपोषणाचा - दुसरा दिवस |
| ३.५ | २२ सप्टेंबर १९३२ उपोषणाचा - तिसरा दिवस |
| ३.६ | २३ सप्टेंबर १९३२ उपोषणाचा - चौथा दिवस |
| ३.७ | २४ सप्टेंबर १९३२ उपोषणाचा - पाचवा दिवस |
| ३.८ | आणि गांधीजींनी उपोषण सोडले |

प्रकरण ३

# पुणे कराराचे स्वरूप

## ३.१ राजा -मुंजे करार[२०]

म. गांधीजींनी कम्युनल अॅवॉर्ड जाहीर होण्याअगोदर पासूनच अस्पृश्यांच्या राजकीय स्वातंत्र्याला म्हणजे हक्क अधिकारास विरोध केला, हे गांधीजींनी सर सॅम्युअल होअर यांना केलेल्या पत्रव्यवहारा वरून आपणास समजते व प्रत्यक्षात १७ ऑगस्ट १९३२ रोजी कम्युनल अॅवॉर्ड जाहीर झाल्यानंतर त्यास टोकाचा विरोध करीत उपोषणाचे शस्त्र काढले. या सर्व धकाधकीच्या काळात फेब्रुवारी १९३२ मध्ये अस्पृश्य समाजाच्या स्वतंत्र किंवा राखीव मतदारसंघाविषयी एक महत्त्वपूर्ण घटना घडली . त्या घटनेचा येथे उल्लेख करणे अत्यंत गरजेचे आहे. ती घटना म्हणजे ''राजा-मुंजेकरार''

हिंदू महासभेचे नेते डॉ. बा. शि. मुंजे व अस्पृश्यांचे एक नेते एम्. सी. राजा यांच्यामध्ये फेब्रुवारी १९३२ च्या तिसऱ्या आठवडयात एक करार झाला अस्पृश्य वर्गासाठी संयुक्त मतदारसंघ व राखीव जागा असाव्यात हे या कराराचे एक मुख्य अंग होते. राजा यांनी डॉ. मुंजे यांच्याशी झालेला हा करार ब्रिटीश प्रधानम्ंयांना तारेने कळविला.

श्री राजा यांचे पूर्वीचे मत वेगळे होते त्यांना असे वाटत होते की अस्पृश्यांना स्वतंत्र मतदारसंघच असावा. अणि गांधीजींना अस्पृश्य वर्गाच्या हाल अपेष्टांची पूर्ण जाणीव नसल्यामुळे ते संयुक्त मतदारसंघाची धोंड अस्पृश्यांच्या गळयात बांधीत आहेत असे सुद्धा म्हणायचे. मध्यवर्ती विधिमंडळात राजा शिवाय दुसरा अस्पृश्य सभासद नव्हता आणि त्यांना गोलमेज परिषदेस आमंत्रण नव्हते. तेव्हा त्यांनी सरकारला कळविले की,आंबेडकर हे अस्पृश्यांच्या एका अल्पसंख्याक गटाचे नेते आहेत. ते अस्पृश्य वर्गाचे खरेखुरे प्रतिनिधी नाहीत.या मत्सर भावनेमुळे म्हणा किंवा गांधीजींनी अस्पृश्यांचे आपणच प्रतिनिधी म्हणून दावा सांगितला म्हणून म्हणा, त्यांनी म्हणजे श्री राजा यांनी संयुक्त मतदार संघाची आपली मागणी सोडून दिली. त्यांनी पंजाबमध्ये ऑल इंडिया डिप्रेस्ड क्लासेस' परिषद घेऊन स्वतंत्र मतदारसंघाची मागणी केली व तसे आंबेडकरांना कळविले. याप्रमाणे गोलमेज परिषदेत आबेडकरांनी अस्पृश्यवर्गाची मागणी एकमुखी व्हावी म्हणून स्वतंत्र मतदरसंघ आणि राखीव जागांची मागणी केली होती.

---

२० धनंजय किर, डॉ.बाबासाहेब आंबेडकर आवृत्ती ६ वी, १९८९, प्रकाशक रामदास भटकळ, पान नं. २०६.

उपरोक्त  कारणामुळे डॉ. आंबेडकरांना आपल्या धोरणात हा असा फरक केला होता. सायमन मंडळाला केलेल्या निवेदनात डॉ. आंबेडकरांनी संयुक्त मतदारसंघ आणि राखीव जागा यांची मागणी केली होती आणि मुसलमानांच्या स्वतंत्र मतदारसंघविषयक मागणीला कडाडून विरोध केला होता. परंतु गांधीजींनी अस्पृश्यांना राखीव जागा ठेवण्यास विरोध केला म्हणून आणि राजाप्रभृती पुढाऱ्यांच्या आग्रहामुळे आंबेडकर स्वतंत्र मतदारसंघाकडे झटकन वळले.

अस्पृश्य समाजात डॉ. आंबेडकरांच्या नेतृत्वाला दुसरा नवा पर्याय निर्माण करणे, हा स्पृश्य हिंदू मंडळींचा बेत वरील राजा-मुंजे करारातून आपणास जाणवतो. परंतु बाबासाहेबांचे नेतृत्व हे इतके प्रभावी आणि परिणामकारक होते की त्यांच्या पुढे राजा-मुंजे करार शिषेत दखलपात्र ठरला नाही .

## ३.२ हिंदू पुढारी यांची तातडीची बैठक

अस्पृश्यांना स्वतंत्र मतदारसंघ मिळाल्यास मी माझा प्राण पणास लावीन ही गांधीजींची घोषणा ते २० सप्टेंबर १९३२ ला प्रत्यक्ष अमलात आणण्याचे ठरवितात .त्यामुळे भारतातील हिंदू पुढाऱ्यांची तातडीची परिषद १९ सप्टेंबर १९३२ रोजी भरविण्याचे ठरले. ही परिषद ''इंडियन मर्चन्टस् हॉल'' येथे काही स्पृश्य हिंदू व काही अस्पृश्य तसेच महिला प्रतिनिधी यांच्या उपस्थितीत भरली. डॉ. आंबेडकर या परिषदेला हजर राहणार असे कळल्यामुळे परिषदेच्या चालकांना व हजर पुढारी मंडळींना एक प्रकाराचे समाधान वाटले. या परिषदेची रूपरेषा श्री. हिराचंद वालचंद यांनी सांगितली. पंडित मालवीय या परिषदेचे अध्यक्ष होते. पंडित मालवीय यांच्याविनंतीवरून प्रथम डॉ. आंबेडकर बोलायला उठले व डॉ. आंबेडकरांनी कोणत्याही दबावास बळी न पडता आपले प्रामाणिक मत पुढीलप्रमाणे निर्भयपणे मांडले.

ह्या परिषदेच्या कार्यक्रमावरून पाहता ही परिषद भरविण्याचे प्रयोजन आहे असे मला वाटत नाही. आमच्या मागण्यांना म. गांधींचा विरोध असून त्याकरिता त्यांनी आपले प्राण पणास लाविले आहे. म. गांधींचे मौल्यवान प्राण वाचविले जावे असे प्रत्येकाला वाटणे सहाजिकच आहे. परंतु आपले प्राण पणास लावण्यापूर्वी गांधजींनी दुसरी एखादी स्पष्ट योजना प्रथम जनतेपुढे मांडावयास पाहिजे होती. आजच्या परिस्थितीचा एकंदरविचार करता मला जनमत असे स्पष्टपणे वाटते की, गांधीजींच्या नवीन योजनेशिवाय कोणत्याही प्रकारचे तडजोडीचे मार्ग फोल आहेत आणि अगदी उघडपणे सांगायचे म्हणजे यापुढे ठरवायचे असे काहीच राहिलेलेनाही. या परिषदेने कितीही काथ्याकूट केला तरी म. गांधीजींचे खरे म्हणणेकाय आहे, हे प्रथम  अगदी स्पष्टपणेकळल्या शिवाय मलातरी काहीच नवीन मार्ग दिसत नाही आणि मी तुम्हासर्वांना बजावून

सांगतो की, या परिषदेच्या चालकांच्या किंवा येथील कोणाही पुढाऱ्यांच्या योजनेला मी बिलकूल बांधलेला नाही. फक्त म. गांधींचे म्हणणेच मी विचारत घेणार आहे. त्यांची योजना मला कळल्याशिवाय मी तरी उत्तर काय देणार? त्यांचे म्हणणे काय आहे हे अगोदर आणा म्हणजे मी पुढील विचार करीन. तसेच त्यांचे जे काही म्हणणे असेल ते तुम्हांपैकी स्पृश्य पुढाऱ्यांनी त्यांचे प्रतिनिधी म्हणून मजपुढे आणिले तरच मी त्याचा विचार करीन कोणाही स्पृश्य पुढाऱ्यांच्या वतीने आलेल्या त्यांच्या योजनेचा मी केव्हाही स्वीकार करणार नाही. हे प्रथम बजावून सांगत आहे. म. गांधींचे प्राण वाचविण्यासाठी मी माझ्या बांधवांच्या न्याय हक्काला हरताल फासण्यास कारणीभूत होणार नाही.[२१]

यानंतर काही पुढाऱ्यांची भाषणेझाली व मुंबईतील पुढाऱ्यांचे एक शिष्टमंडळ गांधीजींना भेटण्यासाठी पुण्याला गेले. त्यांच्या आगमनानंतर म. गांधीजींच्या मिळणाऱ्या निरोपानुसार पुढील कार्यक्रम आखण्याचे ठरवून परिषदेची बैठक दुसऱ्या दिवसापर्यंत तहकूब ठेवण्यात आली.

## ३.३ उपोषणाचा पहिला दिवस

मंगळवार दिनांक २० सप्टेंबर १९३२ ला दुपारी बाराचे ठोके पडल्यावर गांधीजींनी उपवास सुरू केला. तेव्हा त्यांनी तेथेच वर्तमानपत्रांच्या प्रतिनिधींना मुलाखत देऊन आपण प्राणांतिक उपोषण का करणार आहोत, याबद्दल खुलासा केला. तो २१ सप्टेबर च्या टाईम्स ऑफ इंडिया च्या अंकांत प्रसिद्ध झाला होता.

आपला **प्राणांकित** उपवास मानवी धर्माच्या संरक्षणार्थ आहे असे त्यांचे म्हणणे होते. माझा उपावास अस्पृश्यांनास्वतंत्र मतदारसंघ नसावेत म्हणून आहे. अस्पृश्यांना घटनात्मक राखीव जागा द्यावयात याविरुद्ध नाही .[२२]

उपोषणादरम्यान चर्चा करून वाटाघाटी करून काही मार्ग काढण्याच्या हेतूने एक समिती नेमण्यात आली . त्यात स्पृश्य वर्गाचे प्रतिनिधी म्हणून सर तेज बहादूर सप्रू, बॅ. जयकर, पंडित मलवीय, मथुरामदास वसनजी हे होते. या दिवशी बॅ. जयकरांकडून डॉ. **आंबेडकर** यांना सकाळी दहा वाजता बिर्लाहाऊस मध्ये बोलविण्यत आले त्यानुसार डॉ. आंबेडकर, डॉ. सोलंकीबरोबर गेले. बिर्लाहाऊस मध्ये बॅ. जयकर, तेजबहादूर सप्रू व पंडित मदनमोहन मालवीय यांच्या बरोबर म. गंधीजींच्या नवीन योजनेवर चर्चा झाली व या नवीन योजनेच्या आधारावर केवळ तडजोड म्हणून एक तात्पूर्ती योजना ठरविण्याचे ठरले.

---

२१ डॉ.बाबासाहेब आंबेडकर लेखन आणि भाषणे, खंड १८ भाग १, प्रकाशक डॉ.बाबासाहेब आंबेडकर चरित्र साधने प्रकाशक समिती महाराष्ट्र शासन, दि.१५.१०.२००२ पृ.क्र. ३५०.

२२ डॉ.बाबासाहेब आंबेडकर लेखन आणि भाषणे, खंड १८ भाग १, प्रकाशक डॉ.बाबासाहेब आंबेडकर चरित्र साधने प्रकाशक समिती महाराष्ट्र शासन, दि.१५.१०.२००२ पृ.क्र. ३५२.

म. गांधीजींचा हा उपोषणाचा पहिलाच प्रयत्न नव्हता. परंतु हे उपोषण एका वेगळ्या कारणासाठी होते. भारतातील सर्वच जनता व पुढारी आपल्या उपोषणासाठी आपल्याला पाठिंबा देतीलच असे नाही. काही जणांच्या टीकेला आपणास सामोरे जावे लागेल याची गांधीजींना जाणीव होती. हे गांधजींनी दि. २० सप्टेंबर १९ ३२ रोजी पहाटे ३.०० वाजता रवींद्रनाथ टागोर यांना जे पत्र लिहिले त्या पत्रावरून आपल्या लक्षात येते. ते पत्र येणेप्रमाणे-

## रवींद्रनाथ टागोर यांस पत्र

२० सप्टेंबर १९३२,

प्रिय गुरुदेव,

आज मंगळवार पहाटेचे ३ वाजले आहेत. माध्यान्हापासून मी माझ्या अग्निदिव्यास प्रारंभ करणार आहे. आपण आशीर्वाद देऊ शकलात तर मला त्या आशीर्वादाची गरज आहे. प्रथमपासूनच तुम्ही माझे खरेखुरे स्नेही आहात. कारण तुम्ही स्पष्टवक्ते मित्र आहात. कित्येकदा तुमचे अंतरीचे विचार शब्दरुपाने बाहेर पडत असतात. अनुकूल असो अथवा प्रतिकूल, परंतु तुमचे पक्के मत काय आहे हे जाणून घेण्याची माझी फार इच्छा होती. परंतु तुम्ही टीका करण्याचे नाकारले आहे. तुमचा हृदयस्थ आवाज माझ्या कृतीचा निषेध करीत असेल आणि आपली टीका आता माझ्या उपोषण काळातच होणार असली तरीही मी त्या टीकेचा योग्य मान राखीन. माझ्या हातून चूक झाल्याचे मला आढळून आले तर माझ्या चुकीची मी जाहीर कबुली देईन. मग अशा कृतीचे परिणाम काहीही होवोत. अशी जाहीर कबुली न देण्याइतका मी अहंभावी नाही. माझी कृती  तुम्हास अंतःकरणापासून पसंत असेल तर आपले आशीर्वाद मला हवेत. त्याचा मला खूप आधार वाटेल. माझी भूमिका

मी स्पष्टपणे मांडली आहे,अशी  मी आशा करतो.

प्रेमादरपूर्वक प्रणाम,

मो. क. गांधी

[ताजा कलम,]

मी हे पत्र अधीक्षकाच्या हाती देत होतो तोच आपली प्रेमळ व उदात्त तार मिळाली. ज्या वादळात मी आता प्रवेश करणार आहे. त्यात वाटचाल करतांना आपल्या तारेतील मजकुराचा मला खूपच आधार वाटेल. मी तुम्हाला तार पाठवीत आहे. आभार.[२३]

मो.क.गांधी.

रवींद्रनाथ टागोर यांना पत्र लिहून झाल्यानंतर लगेच व्ही.एस.श्रीनिवास शास्त्री यांना गांधीजींनीपत्र लहिले .त्या पत्रावरून ते मानसिक चिंतेत असून आपले टीकाकार मनातल्या मनात काय विचार करत असतील याचाही ते विचार करताना दिसतात.आपल्या उपोषणाबाबत गांधीजी त्यांच्या हृदयात ज्यांना मानाचे व आदराचे स्थान आहे अशा व्यक्तींच्या स्पष्ट भूमिकांची उपेक्षा व्यक्त करीत होते. व ही कृती जर खरोखरच चुकीची आहे अशी गांधीजींची खात्री पटली तर ती चूक ठामपणे कबूल करण्याची क्षमता त्यांच्यात आहे. अशाआशयाचे पत्र त्याच दिवशी गांधीजींनी व्ही.एस. श्रीनिवास शास्त्री यांना पहाटे पहाटे लिहिले आहे. ते येणेप्रमाणे

## व्ही.एस.श्रीनिवास शास्त्री यांस पत्र[२४]

२० सप्टेंबर १९३२

माझ्या परमप्रिय मित्रा व बंधो,

ही मंगळवारची भली पहाट आहे. नुकतेच पहाटेचे ३ वाजून गेले. गुरुदेवांना एक लहानसे पत्र लिहून मी नुकतेच पूर्ण केले आहे.मानसिक चिंतेच्या या काळात तुमची मूर्ती माझ्या डोळयासमोर सतत उभी आहे.तुमच्या अंतःकरणात चाललेले विचार जणू मला वाचायला मिळाले. तुमच्याबद्दल मला किती आदर आहे हे तुम्ही जाणताच. आपल्या दोघांच्या विचारसरणीत दोन ध्रुवांइतके अंतर असले, अथवा तसे असल्याचे भासत असले, तरी कित्येक बाबतीत आपले दृष्टिकोन अभिन्न आहेत, आपली हृदये एकरूप आहेत. म्हणून

२३ म.गांधींचे संकलित वाङ्मय, खंड ५१, पृ.क्र.१६, प्रकाशक महाराष्ट्र शासन मुंबई

२४ म.गांधींचे संकलित वाङ्मय, खंड ५१, पृ.क्र.१७, प्रकाशक महाराष्ट्र शासन मुंबई

जेव्हा मला तुमच्याशी सहमत होता आले अशा प्रत्येक प्रसंगी मला निर्भेळ आनंद झाला आहे. मी जे आता पाऊल टाकणार आहे त्यामुळे मात्र आपल्या दृष्टीने अगदी हद्द गाठली गेली असेल. तरी देखील आपल्याकडून विदारक प्रहार व्हावेत अशी माझी इच्छा आहे. कारण माझ्याशी युक्तिवाद करण्याचे तुम्ही सोडून द्यावे असे मला वाटत नाही. माझ्या थोरल्या भावापासून मी, मला वाटते, जवळजवळ चौदा वर्षे पूर्ण दुरावलो होतो. प्रतिवर्षी तो नोंदणी केलेल्या पत्रातून माझ्यावर शिव्या-शापांचा वर्षाव करायचा. ते त्याचे शिव्याशाप वाचून मला मौज वाटायची. त्याचा प्रत्येक शाप वा शिवी प्रेमाचे स्फुल्लिंग होते. अखेरीस मी त्याला जिंकले. मृत्यूपूर्वी सहा महिने अगोदर माझे म्हणणे बरोबर असल्याचे त्यास पटले. त्याचा माझ्यावर ज्या अनेक कारणांमुळे रोष झाला होता .त्यापैकी एक कारण म्हणजे हाच अस्पृश्यतेचा प्रश्न होय. तुमच्या-माझ्या बाबतीत कोण चुकत आहे हेच मला कळत नाही. परंतु तुम्ही मला माझ्या सख्ख्या भावाप्रमाणे आहात हे मात्र मला चांगले ठाऊक आहे. या (कदाचित) शेवटच्या अरिष्टाच्या प्रसंगी तुम्ही माझ्याशी युक्तिवाद करणे थांबिवता कामा नये. तुम्ही तुमचे शिव्या-शाप अथवा आशीर्वाद काहीही पाठवा. मी चुकत आहे अशी तुमची धारणा असेल तर इतारांना त्या बाबतीत अपयश आले असले तरी तुम्ही माझे डोळे उघडू शकाल. माझी अशी पक्की खात्री पटली की माझ्या हातून चूक झाली आहे तर ती चूक ठामपणे कबूल करण्याचे ईश्वरप्रेरित सामर्थ्य माझ्यात आहे. माझ्याशी असलेल्या इतक्या गाढ परिचयानंतर ही गोष्ट तुम्हांस निश्चितच माहीत असेल. मला आपण जरूर पत्र लिहावे अथवा तार पाठवावी.

सुमारे एक महिन्यापूर्वी आपल्या प्रकृतीविषयी चौकशी करणारे पत्र मी आपणांस लिहिले होते. पण मला उत्तरच मिळाले नाही. माझे पोस्ट कार्ड तुमच्यापर्यंत पोचले की नाही हेच कळत नाही.

शेवटी अथांग प्रेमभावना व्यक्त करून हे पत्र पुरे करतो.

मो.क.गांधी

ज्या दिवशी गांधीजींनी उपोषणास सुरुवात केली त्या दिवशी पहाटे २.३० वाजल्या पासून त्यांनी एकूण आठ व्यक्तिंना पत्र लिहिली त्या सर्व पत्रांमध्ये केदारनाथ कुलकर्णी यांना लिहिलेले पत्र गांधीजींचा उपोषणाचा उद्देश अधिक स्पष्ट करण्यास कारणीभूत ठरते. त्या पत्रात ते असे म्हणतात की'' या जगात मला फक्त एकाच गोष्टीची लाज वाटते आणि ती म्हणजे उच्चार व आचार यातील खोटेपणा'' पुढे ते असे सांगतात की ''मी जे कृत्य करण्यास उद्युक्त झालो आहे. ते तर्कक्रमाणे पटले म्हणून नव्हे. माझ्या आतल्या आवाजाने ते करण्यास प्रेरणा दिली आहे. माझ्या तुर्कबुद्धीने मला असे सांगितले की, अस्पृश्यतेचा कलंक धुऊन काढण्यासाठी कदाचित तुझ्या सारख्या शेकडो व्यक्तिंना मृत्यूला कवटाळावे लागेल.'' ते पत्र येथे देत आहे कारण विचारी वाचकांना गांधीजींची भूमिका समजून घेण्यास सहाय्य होईल.

# श्री. केदारनाथ कुलकर्णी यांना पत्र[२५]

२० सप्टेंबर १९३२

मी खरे म्हणजे तुमच्या पत्राची वाट पहात होतो. ते मला कालच संध्याकाळी मिळाले. उपोषण चालू असतांना ते धर्म्य नाही अशी माझी खात्री पटली तर कोणतीही खोटी लाज न बाळगता मी ते तात्काळ सोडीन. या जगात मला फक्त एकच गोष्टीची लाज वाटते आणि ती म्हणजे विचार, उच्चार व आचार यातील खोटेपणा. मी जे कृत्य करण्यास उद्युक्त झालो आहे ते तर्कक्रमाने पटले म्हणून नव्हे. माझ्या आतल्या आवाजाने मला ते करण्यास प्रेरणा दिली आहे. माझ्या तुर्कबुध्दीने मात्र मला असे सांगितले की ''अस्पृश्यतेचा कलंकधुऊन काढण्यासाठी कदाचित तुझ्यासारख्या शेकडो व्यक्तींना मृत्यूला कवटाळवे लागेल.'' उपोषण करणे ही हिंदू धर्मातील अगदी नित्याची प्रथा आहे. मला त्याबद्दल सदैव आकर्षण वाटले आहे. माझा निर्णय म्हणजे माझ्या हृदयाची हाक होय. ब्रिटीश पंतप्रधानांचा निर्णय हे केवळ तात्कालिक कारण होय. त्यामुळे उपोषण करण्याची संधी मला प्राप्त झाली. तथापि ब्रिटीश मंत्रिमंडळाने घेतलेला निर्णय बदलून घेणे हाच केवळ उपोषणाचा उद्देश नाही. निर्णय बदलवून घेताना जे प्रयत्न होतील त्यातून लोकजागृती व आत्मशुद्धी झाल्याखेरीज राहणार नाही आणि उपोषणाचा उद्देश तोच आहे. दुसऱ्या शब्दात सांगायचे म्हणजे अस्पृश्यतेच्या अगदी मुळावर घाव घालण्यास ही योग्य संधी होती.

या कृतीमुळे इच्छित परिणाम घडून आले म्हणूनच केवळ ती योग्य होती असे आपणास ठामपणे म्हणता येणार नाही हे खरे. ही कृती योग्य आहे किंवा नाही याचा निर्णय प्रत्येक व्यक्तीने आपल्यापुरता घ्यावा.आणि कुणा एखाद्यास अशा निर्णयाप्रत येता आले नाही तर त्या व्यक्तीने आपल्यापेक्षा वयाने जेष्ठ असलेल्या इसमाचे मत ग्राहय धरावे. माझ्या दृष्टीने पाहता ही कृती केवळ योग्यच नसून ती अत्यावश्यक असल्याचे दिसून येते. यावर तुम्ही विचार करा व मला पुन्हा पत्र लिहा. माझ्याबद्दल कृपया निराश होऊ नका. तुमचा इसब आता बहुतेक बरा झाला असावा.

---

२५ म.गांधींचे संकलित वाङ्मय, खंड ५१, पृ.क्र.११०, प्रकाशक महाराष्ट्र शासन मुंबई

## वृत्तपत्रांस मुलाखत[२६]

मागील नऊ महिन्यांच्या कालावधीत प्रथमच २० सप्टेंबरला संध्याकाळी ५.३० वाजता येरवडा कारागृहात पत्रकारांना महात्मा गांधींची भेट घेण्यास परवानगी देण्यात आली. त्यावेळी त्यांना महात्मा गांधीनी गंभीर विचारयुक्त अशी मुलाखत आपल्या अत्यंत सहज-सुलभ अशा शैलीत दिली. महादेव भाई देखील हजर होतो आणि अशाच प्रकारच्या अनेक मुलाखतीच्या वेळी उपस्थित असण्याचे भाग्य त्यांना लाभले आहे. 'आमरण उपोषणास' आरंभ होऊन पाच तास उलटून गेल्यानंतर आज पत्रकार महात्मा गांधीना पाहत होते आणि सद्यस्थितीविषयी त्यांच्याशी चर्चा करीत होते. त्यांची लोकविलक्षण छाप ज्याच्यावर पडली नाही असा पत्रकार विरळाच म्हणावा लागेल.

या प्रकरणाचा शेवट सुखद होईल अशी तुम्हास अशा वाटते का? या प्रश्नास उत्तर देतांना ते म्हणाले. 'मी दुर्दम्य आशावादी आहे. ईश्वराने माझ्यावरची माया आवरती घेतली नसेल तर हे उपोषण प्राणांतिक ठरणार नाही.'

आपण तुमच्याबरोबर सहानुभूतीदाखल उपोषण सुरू करणार आहेत अशा आशयाच्या तारा कित्येक इसमांकडून आल्या असल्याने महात्मा गांधींनी सांगितले यावर ते म्हणाले.

''प्रत्येकास माझे आग्रहाचे सांगणे आहे की सहानुभूतीदाखल कुणीही उपोषण करू नये. ईश्वराने प्रेरणा दिली म्हणून मी उपोषण सुरू केले आहे. आणि या सर्व मंडळींना अशारीतीने निश्चित स्वरुपाची दिव्य प्रेरणा मिळाली असल्याखेरीज त्यांना उपोषण सुरू करण्याची काहीही जरुरी नाही. आत्मशुद्धीसाठी किंवा उपोषण हेतूशी एकात्मता दर्शविण्यासाठी एखादा दिवस उपोषण केले तर ते चांगले होईल, परंतु तेवढे पुरे. अशा तऱ्हेचे उपोषण हे हक्क व कर्तव्य अशा दोन्ही सदरात येते. आणि ज्यांनी त्यासाठी स्वतःस शिस्त लावली आहे अशा व्यक्तींनाच उपोषणाचा हक्क प्राप्त होतो.''

यानंतर मुलाखतीचा ओघ आजच्या ज्वलंत प्रश्नाकडे वळला. आणि तो प्रश्न म्हणजे दलित वर्गाच्या किवा ज्यांना महात्मा गांधी दडपलेले म्हणतात त्या वर्गाच्या प्रतिनिधित्वाचा प्रश्न होय.

सुरुवातीलाच त्यांनी मुंबई शासनाकडे सुपूर्द केलेले निवेदन प्रसिध्द न केल्याबद्दल आश्चर्य व्यक्त केले. ते त्यांनी पाच दिवसांपूर्वी दिले होते. आणि म्हणून ते म्हणाले की, त्यानंतर ज्या घटना घडल्या त्या लक्षात घेता तेच निवेदन पुन्हा लिहायचे झाले तर त्यात काहीसा बदल करावा लागेल आणि मुलाखतीच्या अखेरीस ते म्हणाले की 'माझे नवे निवेदन पूर्वीच्या निवेदनाची पुरवणी म्हणून असले तरी ते त्यावर अवलंबून नाही'.

२६ टाईम्स ऑफ इंडिया दि. २१.९.१९३२, म.गांधींचे संकलित वाङ्मय, खंड ५१, पृ.क्र.११२, प्रकाशक महाराष्ट्र शासन मुंबई

''माझी भूमिका मी स्पष्ट केली आहे. परंतु सध्याच्या प्रकाराबद्दल म्हणावयाचे झाल्यास एवढेच सांगेन की तुरुंगाच्या गजाआडून मला काहीच सांगता येणार नाही. आता बंधने काढून टाकण्यात आली असल्यामुळे वृत्तपत्रांच्या पहिल्याच हाकेला मी प्रतिसाद दिला आहे. माझे उपोषण केवळ स्वतंत्र मतदारसंघाच्या विरुध्द असून सांविधिकरीत्या काही जागा राखीव जागा ठेवण्याच्या तत्त्वाविरुध्द नाही. काही लोक म्हणतात की, संविधिकरीत्या राखीव जागा ठेवण्याच्या तत्त्वास थोडीही तडजोड न करता, मी विरोध करीत आहे आणि म्हणून मी अस्पृश्यता निवारणाच्या ध्येयास हानी पोचवीत आहे. परंतु हे विधान केवळ अर्धसत्य आहे. मी राखीव जागांच्या तत्त्वाविरुध्द होतो व आज आहे परंतु **सांधिधिक**रीत्या जागा राखीव ठेवण्याबाबत कोणतीही विशिष्ट योजना माझ्या स्वीकारार्थ अथवा नकारार्थ माझ्यापुढे ठेवण्यात आलेली नाही. हे लक्षात घेता त्या मुद्यावर मी काहीही निर्णय घेण्याचा प्रश्न उद्‌भवतच नाही. त्या मुद्याबाबत मी जेव्हा माझे स्वत:चे विचार व्यक्त केले त्यावेळेस अर्थातच मी निराशा व्यक्त केली होती. आणि माझे नम्र मत असे आहे की संविधिकरीत्या राखीव जागा ठेवण्याच्या पद्धतीमुळे त्यांना मदत तर होणार नाहीच पण त्यांचे नुकसान मात्र निश्चिपणे होईल. म्हणजे असे की, नैसर्गिक एकात्मतेच्या विकासात त्यामुळे व्यत्यय येईल. संविधिक राखीव जागा म्हणजे माणसाच्या हाती चालतांना आधारासाठी काठी दिल्यागत आहे. तो अशा आधारावर ज्या प्रमाणात विसंबून राहतो त्याप्रमाणात तो स्वत:वर दुर्बलपणा ओढवून घेतो.''

''लोक जर केवळ हसण्यावारी नेणार नसतील तर मी एक दावा नम्रपणे पुढे मांडू इच्छितो, जो मी पुन:पुन्हा मांडला आहे. तो दावा असा आहे की जन्माने जर मी 'स्पृश्य' नसलो तरी स्वेच्छेने एक 'अस्पृश्य' आहे. खुद्द अस्पृश्यास देखील जे वरिष्ठ वर्ग आहेत त्यांचा मी प्रतिनिधी होण्यासठी धडपडत नाही, त्यासाठी मी पात्र होऊ इच्छित नाही. त्यांच्या बाबतीतही एक लज्जास्पद गोष्ट सांगायला हवी की, त्यांच्यातही भिन्न जाती आणि वर्ग आहेत. अस्पृश्यांतले जे अगदी नीचतम म्हणून मानेल जातात उदा. 'अदर्शनीय' जे दृष्टीस पडू नयेत आणि 'नाभिगम्य' ज्यांनी जवळ येता देखील कामा नये, असे वर्ग मी कोठेही गेलो तरी सतत मन:चक्षूंपुढे तरळत असतात आणि अशा हीनावस्थेतील लोकांचा आपण प्रतिनिधी व्हावे व त्यांच्याशी तादात्म्य साधावे ही माझी महत्त्वाकांक्षा आहे. वर्णव्यवस्थेचे विष त्यांच्या वाटेला अगदी कोठोकाठ भरून आले आहे. असे लोक मी मलबारमध्ये व ओरिसामध्ये पाहिले आणि माझी अशी खात्री झाली की ,त्यांची जर कधी उन्नती होणार असेल तर ती राखीव जागांच्या व्यवस्थेमुळे होणार नसून हिंदु समाजसुधारकांनी प्रत्यक्ष त्या समजात राहून केलेल्या कष्टसाध्य सेवेमुळे होईल. आणि शिवाय मला असे वाटते की, विभक्त मतदारसंघामुळे त्या समाजात कधीकाळी सुधारण घडवून आणण्याची आशाच करावयास नको. म्हणून माझे हृदय त्याविरुद्ध बंड करून उठले आहे. आणखी एक गोष्ट मला स्पष्ट करावयाची आहे .ती म्हणजे अशी की, विभक्त मतदारसंघ रद्द झाले म्हणजे माझी प्रतिज्ञा केवळ शब्दापुरती पूर्ण झाली असे होईल. परंतु त्यातील खऱ्या गर्भित अर्थाने ती पूर्ण झाली असे म्हणता येणार नाही. आणि मी स्वेच्छा अस्पृश्य असल्याकारणाने स्पृश्यास्पृश्यातील असल्या थातुरमातुर करारावर मी माझे समाधान करून घेणार नाही.

मला अस्पृश्यतेचे संपूर्णतया निर्मूलन व्हावयास हवे. मी त्यासाठी जगतो आहे आणि ते ध्येय साध्य करतांना मी मृत्यूस मोठया आनंदाने कवटाळीन. मला जिवंत एकोपा हवा आणि त्याचे जीवनदायी परिणाम पुढे कधीकाळी प्रत्ययास येण्याऐवजी आज या घटकेस जाणवले पाहिजेत. आणि म्हणून असा करार स्पृश्यास्पृश्यांच्या परस्परमीलनाच्या अखिल-भारतीय विराट दर्शनाने साजरा झाला पाहिजे.हे परस्परमीलन केवळ नाटकी नको .परंतु हे भावा-भावांचे मधुर मिलन असले पाहिजे. गेली पन्नास वर्षे माझ्या आयुष्यातील हे एक ध्येय ,स्वप्न आहे आणि ते साध्य करून घेण्याच्या ईर्षेने मी आज या अग्निदिव्यास प्रारंभ केला आहे. ब्रिटीश शासनाने घेतलेला विभक्त मतदारसंघाचा निर्णय हे केवळ शेवटचे निमित्त ठरेल. हा निर्णय म्हणजे या सामाजिक दुरावस्थेचे निर्णायक लक्षण होते. शिवाय असल्या विषयात मला चिकित्सकाप्रमाणे अचूक निदानदृष्टी असल्याचा माझा दावा आहे व त्यानुसार मी हे लक्षण बरोबर टिपले. म्हणून म्हणतो की विभक्त मतदारसंघ रद्द होणे ही माझ्या दृष्टीने पुढील घटनांची नुसती सुरुवात असेल. यास्तव मुंबईत जमलेल्या सर्व नेत्यांनी व इतर नेत्यांनी कोणताही निर्णय घाईघाईने घेण्यापूर्वी या सर्व गोष्टींची दखल घ्यावी ,असा मी त्यांना सावधगिरीचा इशारा देतो.''

माझ्या प्राणांची मी फारशी कदर करीत नाही. या थोर कार्याच्या सिद्धीसाठी शंभर एक इसमांनी कुरवंडी केली तरी आपल्याच धर्माच्या असहाय्य स्त्री- पुरुषांवर अघोरी अत्याचार करण्याचा हिंदुमातांच्या बाबतीत ते अगदीच तुटपुंजे प्रायश्चित्त ठरेल. यास्तव माझे त्यांना आग्रहाचे सांगणे आहे की ,न्यायनिष्ठूर मार्गापासून त्यांनी एक इंच देखील विचलित होऊ नये. माझे उपोषण न्यायाच्या कसोटीवर पारखले जावे अशी माझी इच्छा आहे आणि सवर्ण हिंदू त्यामुळे आपल्या निद्रेतून जागे झाले आणि याबाबतीतले आपले कर्तव्य रुजू करण्याची ऊर्मी त्यांच्यात उचंबळली तरी माझा कार्यभाग होईल. उलटपक्षी माझ्याबाबतच्या आंधळया मायेपोटी हे विभक्त मतदारसंघ रद्द करवून घेण्यासाठी त्यांनी कसाबसा एखादा कामचलाऊ करार घडवून आणला आणि त्यानंतर ते स्वस्थ बसले तर त्यांच्या हातून तो एक दु:खद प्रमाद घडल्यासारखे होईल आणि ते माझे जीवन क्लेशदायक करतील. कारण विभक्त मतदारसंघ रद्द झाल्यामुळे माझे उपोषण स्थगित होईल हे खरे परंतु ,ज्या जिव्हाळ्याच्या करारासाठी मी प्रयत्नशील आहे, तो करार होऊ शकला नाही तर माझे जीवन जिवंत मृत्युसमान होईल. याचा सरळ अर्थ असा होईल की, प्रस्तुत उपोषण स्थगित केल्यावर लगेच माझी प्रतिज्ञा खऱ्याखुऱ्या अर्थाने पूर्ण करून घेण्यासाठी मला दुसऱ्या उपोषणाची नोटीस द्यावी लागेल. वरवर बघणाऱ्याला हा सारा पोरकटपणा वाटेल. पण माझ्या मते ते तसे नाही माझ्याजवळ अधिक काही मोलाचे असते तर हा शाप दूर करण्यासाठी मी त्याची देखील आहुती दिली असती. परंतु माझ्या पंचप्राणाखेरीज मजपाशी दुसरे काहीच नाही.

माझी अशी श्रध्दा आहे की, अस्पृश्यतेचे खरोखरीच निर्मूलन झाले तर हिंदूधर्मावरील एक महाभयंकर कलंक धुतला जाईल .एवढेच नव्हे तर त्याचे जगद्व्यापी सुपरिणाम घडून येतील. अस्पृश्यतेविरुद्धचा माझा लढा हा मानवतेतील हिणकसपणाविरुद्ध आहे आणि म्हणून सर सॅम्युअल होअर यांना जेव्हा मी पत्र लिहिले त्यावेळेस माझा असा पूर्ण विश्वास होता की, मनुष्यप्राण्यास शक्य असेल त्या

मार्यादेपर्यंत मालिन्य विरहित व सर्व द्वेष, क्रोधविरहित  हृदयाने मी या कार्यास प्रारंभ केला असेल तर मानव कुटुंबातील सर्वोत्तम वृत्ती माझ्या साहाय्यार्थ येतील. यावरून तुम्हास दिसून येईल की ,माझे उपोषण सर्वप्रथम हिंदू समाजावरील श्रद्धेवर, तसेच सर्वसामान्य मनुष्य स्वभावातील व नोकरशाहींच्या हृदयातील चांगुलपणाच्या श्रद्धेवर देखील आधारित आहे.

''अस्पृश्यतेवर हल्ला करून मी अगदी मुळावरच घाव घातला आहे. आणि म्हणून ही समस्या सर्व विषयांना गवसणी घालणारी सर्वश्रेष्ठ अशी समस्या आहे. राजकीय घटनेने अनुबद्ध असलेल्या स्वराज्याच्याही पलीकडची ही समस्या आहे. लक्षावधी पद्दलिताच्या हृदयात आज एक आशा फुलली आहे की, त्यांच्या मानेवरचे जू आता काढले जाणार आहे. त्या आशेच्या स्वरुपातील नैतिक बैठक त्या राजकीय घटनेस आधारभूत होणार नसेल तर ती घटना निर्जीवच ठरेल. या प्रश्नाची ही जिवंत बाजू इंग्रजी अधिकाऱ्यांच्या लक्षातच येत नसावी आणि म्हणून स्वतःच्या अज्ञानात व आत्मसंतुष्टपणात गुरफटून जाऊन लक्षावधी जनतेच्या, यात मी सवर्ण हिंदू व अस्पृश्य म्हणजेच दमन करणारे व दलित या दोहोंचाही समावेश करतो, जीवन-मरणाच्या मूलभूत प्रश्नाबाबत न्यायाधीशाची भूमिका करण्याचे धाडस ते करीत असावे आणि या नोकरशाहीस देखील तिच्या घोर अज्ञान निद्रेतून जागृत करण्याच्या उद्दिष्टाने अशा शब्दप्रयोगाने मी गुन्हा केल्याबद्दल अपराधी ठरणार नसेन तर माझ्या अंतःस्थ प्रेरणेने माझ्यातील सर्व शक्तीनिशी प्रतिकार करण्यास मला प्रवृत्त केले आहे.

ते पुढे म्हणाले की,आणीबाणी समितीस काल आपण भेटलो त्यावेळी आपण समितीच्या शिष्टमंडळापुढे काही विशिष्ट सूचना मांडल्या होत्या आणि त्या सूचना आज मुंबईत वृत्तपत्रांना कळविल्या असतील अशी अशा प्रकट केली.

नंतर घेण्यात यावयाच्या छायाचित्राबाबत बोलतांना महात्मा गांधी आपल्या अंत्यसंस्काराबद्दल काहीसे विनोदाने बोलले. त्यावर मी त्यांना विचारले ''काल तुमचे चिरंजीव देवदास तुम्हास भेटायला आले होते तेव्हा यातून अगदी वाईटच घडले तर अंत्यसंस्काराच्या तयारी संबंधी काही बोलणे झाले का? या प्रश्नास मला नाटयमय उत्तर मिळाले. ते म्हणाले :

''मी माझ्या मुलास आदेश दिला आहे की, त्याने मुंबईस भरणाऱ्या परिषदेस माझ्यातर्फे सांगावे की,घिसाडघाई करून दलित वर्गाच्या हितसंबंधांना कोणताही बाधा येत असेल तर मी त्यांचा पुत्र आहे म्हणूनच मी त्यांचे प्राण पणास लावण्यास तयार आहे.'' 'तुमचा उपवास दीर्घ काळ चालला तर संभाव्य अशा घटना कोणत्या?' या प्रश्नास उत्तर देतांना ते म्हणाले

''इतर कुणाही व्यक्तीप्रमाणे माझीही जगायची तीव्र इच्छा आहे. पाण्यात मनुष्यप्राण्याची जीवनज्योत प्रदीर्घकाळ तेवत ठेवण्याची शक्ती आहे आणि मला गरज भासेल तेव्हा मी पाणी घेत जाईन. हिंदू समाजाच्या व ब्रिटीश शासनाच्या सदसद्विवेकबुद्धीस लवकरात लवकर जाग यावी म्हणून मी माझी जीवनयात्रा चालू ठेवण्याचा पराकाष्ठेचा प्रसत्न करीन याबद्दल तुम्ही माझ्यावर विश्वास ठेवा आणि

जीवनमृत्यूच्या लढाईचाही अखेर शेवट होईल. माझी आर्त हाक त्या जगन्नियंत्याच्या सिंहासनापर्यंत जाऊन पोचेल.''

## ३.४ उपोषणाचा दुसरा दिवस

दिनांक २१/९/१९३२ रोजी दुपारी बारा वाजता समितीच्या दुसऱ्या दिवसाच्या कामकाजाला सुरुवात झाली. परंतु विशेष चार्चा न करता एक लहानशी कमिटी नेमून तडजोडीने निर्णय करायचा असे आगाऊच ठरले होते. प्रथम पुण्यास गेलेल्या शिष्ठमंडळाच्या प्रतिनिर्धीपैकी सर चुनिलाल मेहता यांनी म. गांधीजींच्या नवीन तडजोडी विषयाचा निर्णय परिषदेमुळे मांडला बैठकीला तेजबहादूर सप्रू, जयकर वगैरे मंडळी हजर होती. अध्यक्ष पंडित मालवीय यांनी सभेला सुरुवात करण्यापूर्वी सभेचे कामकाज शक्य तितक्या आटोपशीररीतीने पार पाडण्यासाठी व निष्कारण अधिक चर्चा न करता पुढील जबाबदारीच्या कामासाठी एक लहानशी कमिटी नेमून परिषद पुन्हा तहकूब करणे किती आवश्यक आहे ,हे सर्वांना पटवून दिले. त्यानंतर सर चुनिलाल यांनी म. गांधीजींचे म्हणणे पुढीलप्रमाणे परिषदेपुढे मांडले.

१) म. गांधी अस्पृश्यांना स्वतंत्र मतदारसंघ देण्याच्या विरुद्ध आहेत.

२) संयुक्त मतदारसंघ व राखीव जागा ही योजना त्यांना सर्वस्वी मान्य नाही. परंतु मुंबईत भरलेल्या अखिल हिंदूंच्या परिषदेत राखीव जागांसंबंधी एक ठरावीक निर्णय तयार केल्यास त्याला त्यांची हरकत नाही. पण त्याची मान्यता आहेच असे म्हणता येणार नाही. एखादा पॅक्ट ठरलाच तर ते कदाचित अनुमती देतील.

म. गांधींची योजना ऐकल्यानंतर डॉ. बाबासाहेब आंबेडकरांनी फारच तडफदार व हृदयस्पर्शी शब्दात आपले म्हणणे पुढीलप्रमाणे मांडले.

आजच्या बिकट परिस्थितीच्या वाटाघाटीत माझी सर्वांच्यापेक्षा फारच चमत्कारिक स्थिती आहे. शांततेच्या या सर्व तडजोडीत दुर्दैवाने केवळ माझ्या लोकांच्या न्याय हक्काच्या रक्षणासाठी मला खलनायकाची भूमिका घेण्याची वेळ येत आहे. माझ्या न्याय व लोकहिताच्या कामगिरीमध्ये मला कितीही त्रास झाला इतकेच नाहीतर जवळच असलेल्या एखाद्या रस्त्यावरील कंदिलाच्या खांबावर मला कोणी तात्काळ फाशी दिली तरी मी त्याची मुळीच पर्वा बाळगणार नाही आजचा प्रश्न नुसता भावनांना वश होऊन सोडविण्याचा नसून गुलामगिरीत खितपत असलेल्या असंख्य समाज बांधवांच्या न्याय्य हक्कांसाठी सनदशीर मार्गाने सोडविण्याचा प्रश्न आहे .येथे नुसता सद्सद्विवेकबुद्धीचा विचार करून भागणार नाही आणि म. गांधींची योजना विचारात घेता तिचा विचार करण्यासाठी थोडा कालावधी लागेल. तरी म. गांधींना परिषदेने ठराव करून १०-१२ दिवस उपोषण करण्याचे थांबविण्यास सांगणे, परंतु ही गोष्ट अगदी अशक्य आहे असे पंडित मालवीय यांनी सांगितले.

यात्रमाणे आपण सर्वस्वी स्वतंत्र मतदासंघ सोडण्यास तयार नाही, असे डॉ. आंबेडकर यांनी सांगितले.कोणत्याना कोणत्यातरी स्वरुपात स्वतंत्र मतदारसंघ असल्याखेरीज तडजोड होत नाही. हे त्यावेळी सर्वांना कळून चुकले आणि म्हणून सायमन कमिशनचे सभासद मेजर ॲटले यांनी सायमन कमिशनच्या रिपोर्टास जोडलेल्या मतपत्रिकेत मुसलमान लोकांचा स्वतंत्र मतदारसंघ टाळण्याकरिता प्रायमरी निवडणुकीची जी योजना तयार केली होती ती मान्य करण्यात आली. यानंतर स्वतंत्र मतदारसंघ सोडून दिल्याबद्दल अस्पृश्य वर्गाच्या होणाऱ्या नुकसान भरपाईकरिता आपल्याला कम्युनल ॲवॉर्डपेक्षा जादा सवलती मिळाल्या तरच आपण तडजोड करू असे डॉ. आंबेडकर यांनी कमिटीच्या सभासदांना सांगितले व कमिटीने आपण त्यांचा विचार करू असे अभिवचन दिले.

चर्चा त्वरित करण्यासाठी मालवीयजींनी एक लहानशी कमिटी नेमण्याविषयी सुचविले व तिचे नाव त्यांनी परिषदेला कळविले. या कमिटीवर सर तेजबहादूर सप्रु, बॅ. जयकर, पंडित मालवीय, मथुरादास वसनजी, डॉ. आंबेडकर यांचा समावेश होता.[२७]

---

[२७] डॉ.बाबासाहेब आंबेडकर लेखन आणि भाषणे, खंड १८ भाग १, प्रकाशक डॉ.बाबासाहेब आंबेडकर चरित्र साधने प्रकाशक समिती महाराष्ट्र शासन, दि.१५.१०.२००२ पृ.क्र. ३५४.

वरील कमिटी व डॉ. आंबेडकर यांच्यात विचार विनिमय होऊन डॉ. आंबेडकरांनी एक नवीन योजना तयारकेली तिला कमिटीने मान्यता दिली. **ती** योजना पुढील प्रमाणे- प्राथमिक निवडणूक व नंतर संयुक्त मतदारसंघातून राखीव जागांच्या धर्तीवर निवडणूक हे स्वतंत्र मतदारसंघाला सौम्य असे नाव दिले आहे. या योजनेत अस्पृश्यांना पुढील प्रमाणे राखीव जागा ठेवण्यात आल्या. वरील योजना घेऊन डॉ. आंबेडकर व सोलंकी रात्री बिर्लाहाऊस मध्ये गेले. ''ही योजना घेऊन आम्ही आताच्या आता पुण्यास जातो व गांधीजींना दाखवून त्यांनी तुम्हास भेटण्याची इच्छा दर्शविल्यास तुम्हाला बोलावू असे कमिटीने सांगितले व रात्रीच्या शेवटच्या गाडीने पुण्यास गेले.[२८]

डॉ. आबेडकरांनी सर तेजबहादूर सप्रु ,जयकर व पंडित मालवीय यांच्या संमतीने तयार केलेल्या योजनेतील कायदे कॉन्सेलातील जागा-

## कायदे कॉन्सेलातील जागा[२९]

| प्रांत | नवीन जागा | एकंदर जागा | अवॉर्डप्रमाणे जागा |
|---|---|---|---|
| मद्रास | २० | २१५ | १८ |
| मुंबई | १६ | २०० | १० |
| बंगाल | ५० | २५० | १० |
| पंजाब | १० | १७५ | ९ |
| संयुक्त प्रांत | ४० | २२८ | १२ |
| बिहार उडिसा | २० | १७५ | ७ |
| मध्य प्रांत | २० | ११२ | १० |
| आसाम | ११ | १०८ | ४ |

म. गांधीजी व कमिटी**चे** सभासद यांच्यात बुधवारी सकाळी गाठीभेटी झाल्या. त्यात महात्माजींनी डॉ. आंबेडकरांशी प्रत्यक्ष वाटाघाटाची इच्छा दर्शविली आणि त्याप्रमाणे बिर्लाहाऊस मधून डॉ. आंबेडकर यांना बुधवारी १.३० वाजता टेलिफोन करून तुम्हांस म. गांधीजी तातडीने बोलवित आहेत. असा संदेश देण्यात आला .त्यास उत्तर म्हणून आपण गुरुवारी पुण्यास येऊ असे डॉ. आंबेडकरांनी कळविले. त्याच बरोबर

[२८] डॉ.बाबासाहेब आंबेडकर लेखन आणि भाषणे, खंड १८ भाग १, प्रकाशक डॉ.बाबासाहेब आंबेडकर चरित्र साधने प्रकाशक समिती महाराष्ट्र शासन, दि.१५.१०.२००२ पृ.क्र. ३५६.

[२९] डॉ.बाबासाहेब आंबेडकर लेखन आणि भाषणे, खंड १८ भाग १, प्रकाशक डॉ.बाबासाहेब आंबेडकर चरित्र साधने प्रकाशक समिती महाराष्ट्र शासन, दि.१५.१०.२००२ पृ.क्र. ३५५.

**इतर कोणाही** अस्पृश्य पुढाऱ्यांशी आपण वाटाघाटी करणार नाही. फक्त म. गांधींजींशीच करू असे सुद्धा कळविले.[३०]

पुणे कराराच्या वाटाघाटी चालू असताना बाबासाहेबांच्या भूमिकेमुळे सर्व देशभर त्यांच्याबद्दल कलुषित वातावरण तयार झाले. त्यांना धमकीची पत्रे येऊ लागली. त्यापैकी गुजराती मध्ये असलेले एक पत्र ते दिनांक ०१-१०-१९३२ च्या जनता पत्रात छापलेले होते.[३१]

याच दिवशी गांधीजींनी श्री जयराम दास दौलतराम यांस पत्र लिहून ''अस्पृश्यतेच्या राक्षसाचा संपूर्ण नि:पात होण्यासाठी आपणापैकी कित्येकांना आपले प्राण अर्पण करावे लागतील'' याची जाणीव करून दिली व माझ्या उपोषणादरम्यान माझे प्राण वाचले काय किंवा प्राण गेले काय आपण यत्किंचितही दु:खी होता कामा नये असा सल्ला दिला.[३२]

## ३.५ उपोषणाचा तिसरा दिवस

''गुरुवार ता. २२ सप्टेंबर १९३२ रोजी सकाळी नऊ वाजता नॅशनल हॉटेलमध्ये सर तेजबहादूर सप्रु व बॅ. जयकर हे **उभयंता** डॉ. आंबेडकर यांना भेटावयास आले व नऊ वाजल्यापासून १२.३० वाजेपर्यंत **उभयतांत** चर्चा झाली. त्यात प्रथमत: असे सांगण्यात आले की, डॉ. आंबेडकर यांनी सादर केलेल्या योजनेत स्वतंत्र मतदारसंघ गाळण्यात आला असला तथापि त्यांनी योजिलेली प्रायमरी इलेक्शनची कल्पना म. गांधीं**जींना** सर्वस्वी मान्य नाही. कारण तिला स्वतंत्र मतदारसंघाची घाण येते असे महात्माजींचे मत आहे असे सांगण्यात आले. याशिवायस्वतंत्र मतदारसंघापुरती उभयपक्षात तडजोड झाली तर मुख्यमंत्री मि. रॅम्से मॅक्डोनॉल्ड यांना तार करून स्वतंत्र मतदारसंघाची योजना ताबडतोब रद्द करण्यास सांगावी व अस्पृश्यांच्या वतीने केलेल्या मागण्यांचा विचार पुढे केव्हा तरी करू. कारण विचारविनिमय करण्यास कालावधी लागणार आहे. व तोपर्यंत महात्माजींचा उपवास चालू राहिल्यास त्यांच्या जीवितास धोका पोचण्याचा संभव आहे ,असेही सांगण्यात आले. त्यावेळी डॉ. आंबेडकर यांनी स्पष्ट सांगितले की, आपल्या सगळया मागण्यांचा विचार ताबडतोब होऊन त्यातून आपल्याला काय मिळते हे कळल्याखेरीज अस्पृश्य वर्गाला प्राप्त झालेला स्वतंत्र मतदारसंघाचा हक्क सोडण्यास आपण केव्हाही तयार होणार नाही. हातचे सोडून पळत्याच्या पाठी लागावयास आपली कबूली नाही. त्याचप्रमाणे महात्मा गांधींनी किमानपक्षी प्रायमरी इलेक्शनची योजना

---

[३०] डॉ.बाबासाहेब आंबेडकर लेखन आणि भाषणे, खंड १८ भाग १, प्रकाशक डॉ.बाबासाहेब आंबेडकर चरित्र साधने प्रकाशक समिती महाराष्ट्र शासन, दि.१५.१०.२००२ पृ.क्र. ३५६.

[३१] डॉ.बाबासाहेब आंबेडकर लेखन आणि भाषणे, खंड १८ भाग १, प्रकाशक डॉ.बाबासाहेब आंबेडकर चरित्र साधने प्रकाशक समिती महाराष्ट्र शासन, दि.१५.१०.२००२ पृ.क्र. ३५६(परिशिष्ठ मध्ये क्र.६ चे पत्र पहा).

[३२] म.गांधींचे संकलित वाङ्मय,खंड ५१, पृ.क्र.११७, प्रकाशक महाराष्ट्र शासन,मुंबई.

मान्य केल्याशिवाय आपण तडजोडीस तयार होणार नाही असेही त्यांनी स्पष्ट सांगितले. या पहिल्या वाटाघाअीत तडजोडीच्या आशेची चिन्हे फारशी दिसत नव्हती. इतके झाल्यानंतर डॉ. सप्रु व बॅ. जयकर हे निघून गेले व तुमचे म्हणणे कमिटीच्या सभासदांस आपण कळवितो व सर्वांच्या अनुमतीने तुमची व महात्माजींची मुलाखत व्हावी असे जर ठरले तर आम्ही तुम्हाला कळवू, असे सांगून ते गेले. प्रथमतः चार वाजता म. गांधीजींची मुलाखत घ्यावयाची असे ठरले, परंतु कमिटीच्या सभासदांशी वाटाघाट केल्यामुळे महात्माजीस थकवा आला आहे व त्यांना विश्रांती मिळावी म्हणून अंमळ उशिरा या ,असा निरोप येरवडयाच्या तुरुंगातून आला. त्याप्रमाणे मंडळी एक तास उशिराने म्हणजे पाच वाजता येरवडयाच्या तुरुंगात गेली. महात्मा गांधी एका आंब्याच्या झाडाखाली उघड्या जागेत एका खाटेवर पडले होते. सभोवती त्यांच्या शिष्यवर्गापैकी महादेव देसाई, सरोजिनी नायडू, वल्लभभाई पटेल, राजगोपालचारी, बिर्ला, सर चुनिलाल मेथा वगैरे मंडळी बसली होती. प्रथमतः सर तेजबहादूर सप्रु यांनी महात्मा गांधींना नॅशनल हॉटेलमध्ये घडलेल्या **वृत्तांत** सांगितला व डॉ. आंबेडकर हे स्वत:जे सांगावयाचे ते सांगतील असे सूतोवाच केले. त्यानंतर डॉ.आंबेडकर यांनी जवळ जवळ १.३० तास भाषण केले व आपली नवी योजना व कॅम्युनल अॅवॉर्ड या दोहोंच्या गुणदोषाचे विवेचन केले. या वादविवादातून एक मोठी आश्चर्याची गोष्ट बाहेर आली. ती ही की, म.गांधींनी प्राथमिक निवडणुकीची घटना अमान्य असण्याऐवजी सर्वस्वी मान्य होती.हे त्यावेळी त्यांनी स्पष्ट करून सांगितले, इतकेच नव्हे तर स्वतंत्र मतदारसंघात जेवढे चांगले होते तेवढे घेतले याबद्दल मी तुमचे अभिनंदन करतो असेही ते म्हणाले व थोडक्याच जागांना लागू करण्याऐवजी तुम्हाला कौन्सिलात मिळणाऱ्या सर्व जागांना सर्रास लागू करा अशी त्यांनी शिफारस केली. त्यानंतर पहिल्या दिवशीची वाटाघाट संपली.

महात्माजींच्या प्राथमिक निवडणुकीच्या तत्तवाला मिळालेल्या संमतीमुळे दुपारी पसरलेले निराशेचे वातावरण नाहीसे होऊन समेटाची अशा दिसू लागली.

शुक्रवारी सकाळी नऊ वाजता पुण्याच्या शेठ शिवलाल मोतिलाल यांच्या बंगल्यावर बाकी राहिलेल्या डॉ. आंबेडकर यांच्या मागणीची वाटाघाट करण्याचे ठरले. वाटाघाटीत वादाचे असे चार प्रश्न होते. ते असे : १) प्राथमिक निवडणुकीमध्ये पॅनेल किती लोकांचे असावे. २) मध्यवर्ती कायदेमंडळात अस्पृश्य वर्गाचे प्रतिनिधी किती असावेत. ३) प्रांतिक कायदेमंडाळातील अस्पृश्यांना किती जागा देण्यात याव्या. ४) राखीव जागेची सवलत किती दिवस राहावी व ती काढावयाची झाल्यास कोणत्या अटीवर काढावयाची.[३३]

---

[३३] डॉ.बाबासाहेब आंबेडकर लेखन आणि भाषणे, खंड १८ भाग १, प्रकाशक डॉ.बाबासाहेब आंबेडकर चरित्र साधने प्रकाशक समिती महाराष्ट्र शासन, दि.१५.१०.२००२ पृ.क्र. ३५८,३५९.

## ३.६ २३ सप्टेंबर १९३२ उपोषणाचा चौथा दिवस

दिनांक २२/०९/१९३२ रोजी म्हणजे उपोषणाच्या तिसऱ्या दिवशी झालेल्या चर्चेनुसार म. गांधींनी प्राथमिक निवडणुकीच्या तत्त्वाला संमती दिल्यामुळे कोणतातरी सकारात्मक मार्ग निघण्याची चिन्ह दिसून आली होती त्यानुसार

अ) प्राथमिक निवडणुकीमध्ये पॅनेल किती लोकांचे असावे.

ब) मध्यवर्ती कायदेमंडळात अपृश्यवर्गांचे प्रतिनिधी किती असावेत.

क) प्रांतिक कायदेमंडळातील अस्पृश्यांना किती जागा देण्यात याव्या.

ड) राखीव जागेची सवलत **किती** दिवस राहावी ती काढवयाची झाल्यास कोणत्या अटींवर काढावयाची. या प्रश्नांचा विचार करण्याकरिता पुणे येथील राजा बहादूर ,शिवलाल मोतीलाल यांच्या निवासस्थानी शुक्रवार दि.२३ सप्टेंबर रोजी सकाळी नऊ वाजता कमिटीची बैठक भरविण्यात आली प्रथमतः प्राथमिक निवडणुकीत उभे राहिलेल्या किती माणसांना अखेर निवडणुकीत उभे राहण्याचा अधिकार असावा. या विषयावर चर्चा झाली कमिटीतील हिंदू सभासदांचा प्राथमिक निवडणुकीत उभे राहिलेल्या उमेदवारांपैकी सहा सातजणांनातरी निदान अखेर निवडणुकीत उभे राहण्याचा अधिकार असावा असा आग्रह होता. डॉ. आंबेडकर यांचा आग्रह तीनपेक्षा जास्त नसावा असा होता. अखेर बऱ्याच वादविवादानंतर उभयपक्षांनी चार ही संख्या मान्य केली व हा प्रश्न मिटविण्यात आला. त्यानंतर मध्यवर्ती मंडळात अस्पृश्यांचे किती प्रतिनिधी असावेत हा प्रश्न विचारात घेण्यात आला. प्रथमतः लोकसंख्येचे प्रमाण म्हणजे सगळया लोकसंख्येचे प्रमाण पडेल त्याप्रमाणे प्रतिनिधींची वाटणी करण्यात यावी असा आग्रह कमिटीच्या हिंदू सभासदांचा होता. आम्हाला सर्व लोकसंख्येशी आमच्या लोकसंख्येचे जे प्रमाण पडेल त्या प्रमाणात प्रतिनिधी मिळाले पाहिजेत असा आग्रह डॉ. आंबेडकर यांचा होता. राजा-मुंजे करारात लोकसंख्येच्या प्रमाणात प्रतिनिधी देण्याचे कबूल केले होते. त्याप्रमाणे तुम्ही आता वचन पाळले पाहिजे व अल्पसंख्यांकांच्या करारापेक्षा राजा-मुंजे करारात लोकसंख्येच्या प्रमाणान्वये जादा प्रतिनिधी मिळतात अशी भूलथाप लोकांना देऊन आमच्यातील काही लोकांना संयुक्त मतदारसंघास तुम्ही अनुकूल करून घेतले. अर्थात तुम्ही दिलेले वचन पाळणे हे तुमचे कर्तव्यकर्म आहे वगैरे मुद्दे डॉ. आंबेडकरांनी मांडले. त्यात एक आश्चर्याची गोष्ट निष्पन्न झाली ती अशी जेव्हा वरील मुद्दा मांडला तेव्हा त्यांना असे सांगण्यात आले की, राजा मुंजे करारात लोकसंख्येच्या प्रमाणात प्रतिनिधी देऊ असे जे ठरले होते त्यांत लोकसंख्येचे प्रमाण म्हणजे हिंदुंच्या लोकसंख्येशी प्रमाण, सर्वसाधारण लोकसंख्येशी नव्हे. सभेत डॉ. मुंजे नव्हते व मि. राजा यांना येऊ दिले नव्हते. तेव्हा कराराचा अर्थ या दोघांनी काय घेतला होता हे आपल्यास निश्चितपणे सांगता येत नाही तथापि. मि. राजा यांनी वारंवार जी कोष्टके प्रसिध्द केली आहेत त्यावरून

त्यांचा तरी समज अखिल लोकसंख्येच्या प्रमाणात प्रतिनिधी **मिळवायचे** असा होता असे आपणांस वाटते असे डॉ. आंबेउकरांनी सांगितले. त्याला उत्तर म्हणून असे सांगण्यात आले की, नुकतीच रा.ब.राजा यांच्याबरोबर ह्या प्रश्नांसंबंधी चर्चा करण्यात आली होती व त्यात डॉ. मुंजे यांच्याशी जो करार केला त्यातील लोकसंख्येचे प्रमाण हे हिंदुंच्या लोकसंख्येचे प्रमाण अशी आपली समजूत आहे असे त्यांनी सांगितल्याचे कमिटीत जाहीर करण्यात आले. रा.ब.राजा व त्यांच्या पार्टीचे लोक हे किती पराधीन व परवश झाले होते हे एका गोष्टीवरून सहज कळून येण्यासारखे आहे.

हिंदुंशी संगनमत करण्याकरिता अस्पृश्यांचे राजकीय हक्क बुडाले तरी बुडोत या एकाच धोरणाने ते लोक प्रेरित झाल्याचे दिसते. कारण रा.ब.राजा यांनी लोकसंख्ये**च्या** प्रमाणाच्या बाबतीत जी नवीन मखलाशी केली ती शुद्धलबाडीची होती याबद्दल काही शंका नव्हती व ती लबाडी सिद्ध करण्यास डॉ. आंबेडकर यांना फार वेळ लागला नाही. शेवटी सर्वसाधारण जागांपैकी १८ टक्के जागा अस्पृश्यांना मध्यवर्ती कायदे कौन्सिलात राखून ठेवाव्यात असे ठरले व हा प्रश्न मिटविण्यात आला. त्यानंतर अस्पृश्यांचा संयुक्त मतदारसंघ व राखीव जागा किती काळपावेतो राहावयाच्या व त्या कोणत्या अटीवरती नष्ट व्हावयाच्या हा प्रश्न चर्चेत घेण्यात आला. या प्रश्नावर अनपेक्षित असे रण माजले. हिंदू पुढाऱ्याचे असे मत होते की, ही सवलत दहा वर्षांनी आपोआप नाहीशी व्हावी. डॉ. आंबेडकरांचे म्हणणे असे होते की, ती निदान १५ वर्षे तरी अस्तित्वात राहावी व त्यानंतर ती काढावयाची झाल्यास अस्पृश्य वर्गाच्या मतदार लोकांची मते घेऊन त्यांनी ती आपणास नको असा बहुमताने निर्णय दिला तरच ती काढण्यात यावी नाहीतर ती तशीच चालू ठेवण्यात यावी. दोन प्रहरी दोन वाजल्यापासून ती रात्री साडेनऊ वाजेपर्यंत मोठ्या कडाक्याचा व खडाजंगी असा वाद झाला व शेवटी कोणताच पक्ष माघार घेण्यास तयार झाला नसल्यामुळे तडजोड अगदी फिस्कटण्याच्या बेतात आली.

शेवटी या प्रश्नांसबंधाने महात्माजींपुढे उभयपक्षाने आपापली बाजू मांडावी व ते काय म्हणतील ते पाहावे असे ठरले व त्याप्रमाणे रात्री ९.३० वाजतासर्व मंडळी येरवडयाच्या तुरुंगामध्ये महात्माजीस भेटावयास गेली. प्रथमतः डॉ आंबेडकरांनी आपली बाजू मांडली व नंतर हिंदूची बाजू पंडित मदनमोहन मालवीय यांनी मांडली. आश्चर्याची गोष्ट ही की, उभयपक्षाचे म्हणणे ऐकून घेतल्यानंतर महात्माजींनी आपले मत डॉ. आंबेडकर यांच्यातर्फेने दिले. हा निर्णय ऐकल्यानंतर वादाचा एक मोठाच प्रश्न मिटून गेला व मंडळी रात्री ११.३० वाजता जेलमधून परत शिवलाल मोतीलाल यांच्या बंगल्यावर आली आणि उरलेल्या प्रश्नाचा विचार दुसऱ्या दिवशी सकाळी करू असे ठरवून सभेचे काम रात्री सुमारे १२.३० वाजता तहकूब करण्यात आले.[३४]

---

[३४] डॉ.बाबासाहेब आंबेडकर लेखन आणि भाषणे, खंड १८ भाग १, प्रकाशक डॉ.बाबासाहेब आंबेडकर चरित्र साधने प्रकाशक समिती महाराष्ट्र शासन, दि.१५.१०.२००२ पृ.क्र. ३६०,३६१.

## ३.७ शनिवार २४ सप्टेंबर १९३२ उपोषणाचा पाचवा दिवस

ठरल्याप्रमाणे दुसऱ्या दिवशी सकाळी ८.३० वाजता पुन्हा सभेच्या कामास सुरुवात झाली. वादाचा मोठा असा काही प्रश्न उरला नसल्यामुळे लवकरच सेमट होऊन करारनामा तयार करण्यात येईल असे सर्वांनाचा वाटले होते. परंतु अगदी सुरवातीलाच वादाला अतिशय तीव्र स्वरुप आले. इतके की सारे प्रकरण पुन्हा चिघळले. हिंदू लोकांचा हट्ट असा होता की, सुरुवातीपासून पहिल्या पाच वर्षानंतर अस्पृश्य लोकांचा स्वयंनिर्णय घेण्यात यावा व त्यांनी जर ही सवलत काढून टाकण्याच्या विरुद्ध निर्णय दिला तर आणखी पाच वर्षे ती सवलत चालू ठेवून पुढे ती आपोआपच पाच वर्षांनी किंवा दहा वर्षांनी नष्ट करण्यात यावी. डॉ. आंबेउकरांचे म्हणणे असे होते की फार तर पहिल्या दहा वर्षानंतर स्वयंनिर्णय घ्यावा. पाच वर्षानंतर स्वयंनिर्णय घेण्याच्या मुद्यास त्यांनी कबूली देण्याचे नाकारले. तसेच काही काळाने ही सवलत आपोआप अस्पृश्य लोकांच्या स्वयंनिर्णयाशिवाय जावी या तत्वास त्यांनी जोराचा विरोध केला. केव्हाही काढावयाची झाल्यास अस्पृश्य लोकांचा स्वयंनिर्णय घेतल्याशिवाय ती केव्हाही काढली जाऊ नये. येथे देखील सर्वांची मति कुंठली व समेट होऊ शकत नाही असे सर्वांस वाटले. पुन्हा एकदा महात्माजींची भेट घेऊन आपले म्हणणे त्यांच्यापुढे मांडून त्यांचे मत काय आहे हे जाणण्याची आपली इच्छा आहे असे डॉ. आंबेडकरांनी दर्शविले. त्याप्रमाणे डॉ. आंबेडकर, राजगोपालाचारी व मि. बिर्ला असे तिघेजण साडे अकरा वाजता येरवडयाच्या तुरुंगात महात्माजीस भेटण्यास गेले. डॉ. आंबेडकरांनी आपले म्हणणे महात्माजींपुढे मांडल्यानंतर महात्माजींनी सांगितले की अस्पृशांना दिलेल्या राजकीय सवलती त्यांच्या स्वयंनिर्णयाशिवाय काढल्या जाऊ नयेत या तुमच्या मागणीस माझी पूर्ण संमती आहे. फक्त पहिला स्वयंनिर्णय पाच वर्षांनी घ्या एवढेच आपले सांगणे आहे. माझा जीव तुमच्या हाती आहे. सर्वच बाबतीत तुमचे म्हणणे मी मान्य केले आहे. एवढ्या एका बाबतीत माझे म्हणणे तुम्ही ऐकणार नाही का? असे ते म्हणाले. त्यानंतर डॉ. आंबेडकर वगैरे मंडळी शिवलाल मोतीलाल यांच्या बंगल्यावर आली व घडलेली हकीकत त्यांनी कमिटीच्या सभासदाना सांगितली. डॉ. आंबेडकरांनी शेवटी असे सांगितले की, महात्माजींचे म्हणणे ऐकून त्यावर आपण पूर्ण विचार केला आहे. विचारांती दहा वर्षाच्या अगोदर स्वयंनिर्णय घेण्यास आपली तयारी नाही असे सांगितले. पुन्हा तडजोडीच्या कार्यात अडचण उत्पन्न होऊन शेवटी तास दीड तास पुन्हा वाद झाल्यानंतर शेवटी असे ठरेल की, दिलेल्या सवलती केव्हा जावयाच्या यास कोणत्याच प्रकारची मुदत घालण्यात येऊ नये. उभय पक्षांच्या संमतीने निराळी योजना ठरेतोपर्यंत दिलेल्या सवलती निर्वेधपणे चालू राहाव्यात असे ठरले व ही योजना उभय पक्षास मान्य झाल्याने हा वाद संपला. त्यानंतर प्रांतिक कायदे कौन्सिलात अस्पृश्यांना किती जागा द्यावयाच्या एवढाच वाद शिल्लक राहिला होता.

डॉ. आंबेडकरांनी आपल्या नवीन योजनेत १९७ जागा मागितल्या होत्या हिंदू लोकांतर्फे १२३ जागा द्याव्या असे म्हणणे होते. शेवटी देवाणघेवाण होऊन १४८ जागांवर उभयपक्षांची तडजोड झाली. त्यानंतर डॉ. आंबेडकर यांनी आपल्या योजनेच्या दुसऱ्या भागात केलेल्या मागण्यांचा विचार करण्यात आला. ज्या ठरावीक भाषेत त्या लिहिल्या आहेत त्या ठरावीक भाषेत आपल्याला आज संमती देता येत नाही. तथापि त्या मागण्यांतील जे मूलभूत तत्त्व आहे त्या मूलभूत तत्त्वाला आपली कबुली आहे व ती कबुली दर्शविणारा एक मसुदा तयार करून आपण तो कारारनाम्यात समाविष्ट करण्यास तयार आहोत असे हिंदू पुढाऱ्यांतर्फे सांगण्यात आले. तूर्त एवढयानेच आपण समाधान मानून घेण्यास तयार आहोत असे डॉ. आंबेडकरांनी सांगितल्यामुळे हाही प्रश्न लवकरच निकालात निघाला. एवढे सगळे होता होता दुपारी दोन वाजले. त्यानंतर मंडळी करारनाम्याचा मसुदा करावयास बसली. सुमारे चार वाजता मसुदा तयार झाला. त्यानंतर करारनाम्यावर सह्या कोणी कराव्या याची वाटाघाट झाली. रा.ब.राजा व त्यांच्या पक्षाच्या मंडळींनी करारवर सह्या करून नयेत असा आग्रह मद्रासहून आलेल्या अस्पृश्यांच्या सर्व पुढाऱ्यांनी धरला व त्यांनी जर सह्या केल्या तर आपण सह्या करणार नाहीच नाही पण डॉ. आंबेडकर यांना सुध्दा आपण सही करू देणार नाही असा हेका धरला. त्याप्रमाणे डॉ. आंबेडकर व त्यांच्या पक्षातील पुढाऱ्यांच्या सह्या होऊन करारनामा तयार झाला. तो झाल्यानंतर इतर स्पृश्य हिंदू पुढाऱ्यांनी डॉ. आंबेडकरांना विनंती केली की रा. ब.राजा वगैरे मंडळींना सही करू देण्यास तुम्ही काही तरी खटपट करा.

शेवटी भवति न भवति होता असे ठरेल की, त्यांनी सर्वांच्या सह्याझाल्यानंतर अस्पृश्य वर्गातील व्यक्ती म्हणून सही करावी. अस्पृश्य वर्गातील एका पक्षातील पुढारी म्हणून प्रमुख ठिकाणी त्यांनी सह्या करू नयेत. त्याप्रमाणे राजा-गवई वगैरे मंडळीस टेलिफोन करून सर्व्हेन्टा ऑफ इंडिया सोसायटीच्या बिल्डिंगमधून बोलविण्यात आले व सर्वांच्या सह्या झाल्यानंतर शेवटी सह्या करण्याची त्यांना परवानगी देण्यात आली. आश्चर्यांची गोष्ट ही की, सर्वांच्या मागून आले असताना देखील व अगदी वरती जागा नसताना देखील जयकर व सप्रु यांच्यामध्ये आपली सही घुसडून देण्याचा रा.ब.राजानी लघळपणा केलाच. सह्या होऊन करारनामा तयार झाल्यानंतर पंडित मदनमोहन मालवीय व डॉ. आंबेडकर या दोघांच्या सहीने मुख्य प्रधानाला करार झाल्याची तार करण्यात आली व करारातील ठळक गोष्टींचा उल्लेख करणारी एक तार त्याच्यासोबत पाठविण्यात आली. डॉ. आंबेडकर व रा.ब.श्रीनिवासन यांनीही आपल्या सहीच्या तारा प्रधान सेक्रेटरी ऑफ स्टेट व्हाइसरॉय यांना **तार** करून करार आपणास संमत असल्याची बातमी दिली. त्यानंतर कराराची एक अस्सल नकल घेऊन डॉ. आंबेडकर, सर तेजबहूदर सप्रू, जयकर व सर चुनिलाल मेथा यांनी मुंबई सरकारचे होम सेक्रेटर मि. क्ली यांना संध्याकाळी सात वाजता दिली व सरकारी रीतीनुरूप प्रधानांना पाठवून द्या, अशी विनंती करण्यात आली. तेथून सर्व मंडळी येरवडा जेलमध्ये महात्मा गांधीना भेटावयास गेली. भेटीत महात्मा गांधीनी करारासंबंधी आपले समाधान व्यक्त केले व तडजोड केल्याबद्दल डॉ. आंबेडकर व इतर पुढाऱ्यांचे आभार मानले.[३५]

---

[३५] डॉ.बाबासाहेब आंबेडकर लेखन आणि भाषणे, खंड १८ भाग १, प्रकाशक डॉ.बाबासाहेब आंबेडकर चरित्र साधने प्रकाशक समिती महाराष्ट्र शासन, दि.१५.१०.२००२ पृ.क्र. ३६१ ते ३६४.

# पुणे करार

## नवीन करारातील कलमे[३६]

१) अस्पृश्यांना सर्वसाधारण मतदारसंघात सर्व प्रांतात मिळून लोकसंख्येच्या प्रमाणात १४८ राखीव जागा पुढीलप्रमाणे द्याव्या :-

| प्रांत | अस्पृश्यांना जागा | कायदे मंडळातील हिंदुंच्या जागा |
|---|---|---|
| बंगाल | ३० | ८० |
| मुंबई सिंधसह | १५ | १०८ |
| बिहार व ओरिसा | १८ | ११४ |
| मद्रास | ३० | १५४ |
| पंजाब | ८ | ४३ |
| मध्य प्रांत व वऱ्हाड | २० | ८८ |
| आसाम | ७ | ५७ |
| संयुक्त प्रांत | २० | १४४ |
| | १४८ | ७८७ |

अशा तऱ्हेने या समेटान्वये अस्पृश्यांना हिंदुंच्या एकंदर ७८७ जगापैकी १४८ जागा देण्यात **आल्या.**

२) या सर्व राखीव जागांकरिता अस्पृश्यांचे जे प्रतिनिधी निवडावयाचे त्यांची प्राथमिक निवड, प्रथम केवळ अस्पृश्यवर्गीय मतदारांनी प्रत्येक जागेकरिता ४ उमेदवार या याप्राणे निवडलेल्या उमेदवारांतून केली जावी व तद्नंतर या चारांच्या पॅनेलमधून एक प्रतिनिधी स्पृश्यास्पृश्य सर्व मतदारांनी निवडून द्यावा. प्राथमिक निवडणुकीत प्रत्येक अस्पृश्यवर्गीय मतदारास मत देण्याचा अधिकार आहे.

३) मध्यवर्ती कायदेमंडळात अस्पृश्यांचे प्रतिनिधी सर्वसाधारण मतदारसंघात राखीव जागासाठी पॅनेलच्या निवडणुकीने निवडले जावे.

४) मध्यवर्ती कायदेमंडळात ब्रिटीश हिंदुस्थानातील अस्पृश्यांना हिंदुंच्या जागापैकी १८ टक्के जागा द्याव्या.

[३६] डॉ.बाबासाहेब आंबेडकर लेखन आणि भाषणे, खंड १८ भाग १, प्रकाशक डॉ.बाबासाहेब आंबेडकर चरित्र साधने प्रकाशक समिती महाराष्ट्र शासन, दि.१५.१०.२००२ पृ.क्र. ३६४.

५) अस्पृश्य उमेदवारांच्या पॅनेलची  ही पध्दती फक्त १० वर्षेच अंमलात राहावी. पण तत्पूर्वी सर्व जातींनी एकमताने ती रद्द करावयाचे ठरविल्यास तसे करण्यास हरकत नाही.

६) राखीव जागांचे तत्त्व सर्व जातीत एकवाक्याता होऊन रद्द होईपर्यंत अमलात रहावे.

७) प्रांतिक व मध्यवर्ती कायदेमंडळांचा अस्पृश्यांचा मताधिकार लेथिअन कमिटीच्या रिपोर्टातील शिफारसीप्रमाणे असावा.

८) स्थानिक संस्थांनात निवडणूक किंवा सरकारी नोकऱ्यात नेमणुका या बाबतीत अस्पृश्यांवर कोणतीही नालायकी अस्पृश्यतेच्या मुद्यावर असू नये व त्यांना योग्य प्रमाणात जागा द्याव्या.

९) असपृश्यांच्या शिक्षणासाठी योग्य प्रमाणात प्रांतिक सरकारच्या बजेटात तरतूद करावी.

‘‘या करारावर २४ सप्टेंबरला २३ पुढाऱ्यांच्या सह्या झाल्या आणि २५ तारखेला १८ जणांनी सह्याकेल्या.’’

## पुणे करारावर ज्यांनी सह्या केल्या त्यांची नांवे.[३७]

1. Madan Mohan Malaviya
2. Tej Bahadur Sapru
3. .R.Jayakar
4. B.R.Ambedkar
5. Shrinivasan
6.M.C. Rajah
12. B.S. Kamat
13. G.K.Deodhar
14. A.V.Thakkar
15. R.R.Ba2ha3e
16. P.G.Solanki
17.P.Baloo

[३७] डॉ.बाबासाहेब आंबेडकर लेखन आणि भाषणे, खंड १८ भाग १, प्रकाशक डॉ.बाबासाहेब आंबेडकर चरित्र साधने प्रकाशक समिती महाराष्ट्र शासन, दि.१५.१०.२००२ पृ.क्र. ३६५.

7.C.V.Mehta

8.C.Rajagopalachari

9.Rajendra Prasad

10.G.D.Birla

11.Rameshwar Das Birla

18. Govind Malaviya

19.Devdas Gandhi

20. Biswas

21.P.N.Rajbhoj

22.Gavai G.A.

23. Shankarlal Bankar

The following signature were added in Bombay at the final sitting of the Hindu Conference on Sepetember 25

1.Lallubhai Samaldas

2.Hansa Mehta

3. K.Natrajan

4.Kamakoti Natrajan

5.Purushottamdas Thakurdas

6. Mathradas Vassanji

7. Walchand Hirachand

8. H.N.kunzru

9.K.G.Limaya

10. P.Kodandrao

11. N.V.Gadgil

12.manu Subhedar

13. Avntikabai Gokhale

14. K.J.Chitalia

15. Radhakant Malaviya

16. A.R.Bhatt

17. Colam

18. Pradhan

**मुख्य प्रधानांची मावशी ससेक्स परगण्यातील आर.डिगले या गावी वारली होती. तिच्या प्रेतयात्रेस मॅक्डोनॉल्डसाहेब २४ला निघाले होते. पण हिंदुस्थानातून आलेल्या तारा पाहून त्यांनी आपले जाणे रहित केले आणि पुणे कराराचा विचारविनिमय मंत्रिमंडळाबरोबर दोन दिवस करुन त्यांनी मंत्रिमंडळाची संमती परत तारेने व्हाईसरॉय, वगैरेंना २६ तारखेस कळविली. तारीख २६ सप्टेंबरला हिंदुस्थान सरकारने गृह**

चिटणीस (होम मेंबर) मि. हेग यांनी मध्यवर्ती कायदेमंडळात भाषण करून सरकारने हा करार मान्य केल्याचे जाहीर केले.

## ३.८....आणि गांधीजींनी उपोषण सोडले

सरकारने कराराला आपली संमती दिल्याचे पत्र इन्स्पेक्टर जनरल कर्नल डॉयल यांना पाठविले व ते त्यांनी गांधीजी आणि इतर पुढारी यांना मंगळवारी २७ तारखेला तिसऱ्या प्रहरी सव्वा चार वाजता दाखविले. गांधीजींनी आपला उपास सोडावा. असे सर्वांना वाटले. या सरकारी संमतीला अस्पृश्यांच्या पुढाऱ्यांनी आपला पाठिंबा व्यक्त केला पाहिजे, असे गांधीजी म्हणाले. हे सर्व पुढारी मुंबईला गेलेले होते आणि त्यांची पुन्हा सभा भरवावी लागेल व त्यात एक दोन दिवस जातील. या कराराला त्यांनी अगोदरच संमती दिलेली आहे व त्यावर सह्या केलेल्या आहेत. तेव्हा पुन: त्याबद्दल हा प्रश्न विचारात घेण्याची जरुरी नाही, असा पक्ष पंडित ह्दयनाथ कुंझरु यांनी गांधीजींच्यापुढे मांडला व त्याला श्री. राजगोपालाचारींनी पाठिंबा दिला. मग गांधीजी उपास सोडायला तयार झाले. कर्नल डॉयल म्हणाले 'कस्तुराबा गांधींच्या हातून फळांचा रस प्या व उपास सोडा गांधीजींनी संमती दिली. गांधीजींच्या सभोवती पाण्याचा सडा शिंपडण्यात आला रवींद्रनाथ टागोर यांनी आपल्या गीतांजलीतील एक भक्तीगीत म्हटले भगवद्‌गीतेतील श्लोक काहींनी म्हटले. तेथे जमलेल्या सुमारे २०० लोकांनी ''वैष्णव जन तो तेणे कहिये'' हा गांधीजींचा आवडता संत नरसी मेहतांचा अभंग म्हटला व कस्तुरबांनी संत्र्याचा रसाचा प्याला गांधीजींना दिला. ते रस प्याले व त्यांनी उपास सोडला.[३८]

[३८] डॉ.बाबासाहेब आंबेडकर लेखन आणि भाषणे, खंड १८ भाग १, प्रकाशक डॉ.बाबासाहेब आंबेडकर चरित्र साधने प्रकाशक समिती महाराष्ट्र शासन, दि.१५.१०.२००२ पृ.क्र. ३६५.

# प्रकरण ४

# पुणे करारानंतर

## अनुक्रमणिका


| अनुक्रमांक | तपशील |
|---|---|
| ४.१ | मु.रा.जयकर यांना गांधीजींची तार |
| ४.२ | सनातनी हिंदूंचा रोष व गांधीजींची भूमिका |
| ४.३ | गांधीजींची दिशाभूल केली. |
| ४.४ | अस्पुश्यता निवारण करण्याकीरता चातुर्वर्ण्य व्यवस्था **नष्ट** होणे आवश्यक |
| ४.५ | पुणे कराराची स्मृती |
| ४.६ | पुणेकरार एक  धोकेबाजी |

# प्रकरण ४

# पुणे करारानंतर

## ४.१ मु.रा.जयकर यांना गांधीजींची तार

दि.२७/९/३२ रोजी मु. रा. जयकर यांना म. गांधीजींनी तार करून ''अस्पृश्यतेचे संपूर्ण उच्चाटन होईपर्यंत आपण आपले प्रयत्न अखंडपणे चालू ठेवाल'' अशी अपेक्षा केली आहे.[३९]

त्याच दिवशी त्रावणकोरच्या महाराजांना गांधीजींनी तार करून गुरूवायूर मंदिर अस्पृश्यांना खुले व्हावे यासाठी केरळचे एक महान सुपूत्र श्री केलाप्पन यांनी आपले प्राण धोक्यात घालून उपोषणाद्वारे या प्रश्नावर सर्व देशभर अभूतपूर्व अशी जागृतीची लाट निर्माण केली आहे. ते पाहता सर्व मंदिर अस्पृश्यांना खुली करण्याबाबत देशवासीय अनुकूल असल्याचे दिसते असे कळविले आहे.[४०]

## ४.२ सनातनी हिंदूंचा रोष व गांधीजींची भूमिका

दिनांक १० नोव्हेंबर १९३२ रोजी गांधीजींनी दि टाईम्स ऑफ इंडिया मुलाखत दिली . त्या मुलाखतीच्या स्वरूपावरून गांधीजी अस्पृश्य वर्गाला मंदिरे खुले करण्याच्या प्रयत्नात असताना त्यांना हिंदू धर्मातील काही सनातनी लोकांच्या रोषाला सामोरे **जावे लागते** परंतु त्या रोषाची ते विशेष पर्वा करीत नाहीत असे दिसते.

दिनांक १२/१२/१९३२ रोजी मा. मॅक्डोनॉल्ड यांच्याशी चर्चा करीत असताना गांधीजींना स्पृश्य हिंदूंमधील जो सनातनी वर्ग आहे त्या वर्गाच्या रागाला सामोरे जाताना त्यांची हिंदू धर्माविषयी व अस्पृश्यता निवारणा विषयीची काय भूमिका असावी. ते खालील विवेचनावरून दिसून येते.

मी धारण केलेली व गेली ४५ वर्षे आचरणांत आणलेली मते, सामान्यत: स्वीकारण्यात आली आहेत. आणि माझे सनातनी मित्र, मी माझी मते लोकावर किंवा सनातन्यांवर लादतो असा आरोप करीत असले तर त्यात फारसे तथ्य नाही. मानवतेच्या इतिहासाकडे पाहता, आपणाला असे आढतते की, जेव्हा एखाद्या व्यक्तीने चांगली मते धारण केलेली असतात त्यांचा आग्रह धरलेला असतो आणि ती स्वत:च्या जीवनात आचरणात आणलेली असतात. तेव्हा साऱ्या समाजाने ती स्वीकारलेली आहेत. आता, त्यात आपले विचार लोकावर लादले असे म्हणणे आचरटपणाचे आहे. जोपर्यंत कोणाच्या मागे शारीरिक बळ नसते तोपर्यंत त्याने स्वत:ची मते दुसऱ्या वर लादली असे म्हणता येणार नाही.

---

३९ म.गांधींचे संकलित वाङ्मय, खंड ५१, पृ.क्र.१४६, प्रकाशक महाराष्ट्र शासन मुंबई

४० म.गांधींचे संकलित वाङ्मय, खंड ५१, पृ.क्र.१४६, प्रकाशक महाराष्ट्र शासन मुंबई

माझ्या उपोषणाने थोडी फार चिंता निर्माण झाली आहे हे खरे आहे. परंतु, त्याबद्दल मी दोषी नाही याविषयी माझ्या मनात मुळीच संदेह नाही. माझ्यासंकल्पित उपोषणामुळे झालेला व होत असलेलापरिणाम मी वैज्ञानिकाच्यानजरेने काळजीपूर्वक न्याहाळत आहे. मी जे पाहतो त्यामुळे मी आनंदाने व आशेने भरून जातो. उपोषणाने लोकांना विचार करावयास लावले आहे. उपोषण कोणालाही स्वतःच्या सद्सद्विवेकबुद्धी विरुद्ध काही करावयास भाग पाडणार नाही.परंतु जे सुस्त आहेत ते आपली सुस्ती सोडतील आणि उमेदीने काम करू लागतील; म्हणजे माझ्यावरप्रेम करणारे सारे जण सक्रियरीत्या काम करू लागतील.

या घटनेने, मला मुळीच अनुत्साह वाटत नाही. ज्यांना मी हिंदू धर्माचा नाश करीत आहे असे वाटते रागाची पत्रे लिहून म्हणतात की, मी उपोषण त्वरीत सुरु करावे आणि जागातून निघून जावे अशा पत्रांचा मजवर काहीही परिणाम होत नाही. मी पत्रांविषयी बोलत आहे ते फक्त एवढेच दाखविण्यासाठी की जे अस्पृश्यता निवारणाराच्या विरोधी आहे, त्यांच्यावर मी सुरू करणार असणाऱ्या उपोषणाचा मुळीदेखील परिणाम होणार नाही आणि ते असेच असावे. परंतु उपोषणाविषयी मला नंतर अधिक बोलावे लागेल. या क्षणी मी एवढेच म्हणू शकतो की परमेश्वराने प्रेरणा दिलेल्या उपोषणाच्या निर्धारापासून कोणीही मला किंवा श्री केलाल्पन विचलित करू शकणार नाही. मी श्री मेहता यांच्या प्रयत्नांचे गुण ग्रहण करतो. त्यांनी लोकांना आधीच इशारा दिला आहे.

मतदार संघटीत करण्यात व्यग्र असलेल्या लोकांवर झामोदीन सर्व प्रकारचे आरोप करीत आहे. या गोष्टीचे मला दुःख होते व आश्चर्य होते .मी त्यांना सभ्य गृहस्थ मानतो.मतदान समितीचे अध्यक्ष श्री माधवन नायर एक प्रतिष्ठित वकील **आहेत** व केरळमध्ये प्रख्यात **आहेत** हे ते जाणतात. राजाजी समितीला मदत करीत असून कामावर देखरेख करीत आ**हेत**. कसलाही गैरवाजवी प्रकार सहन न करणारे ते लोक आहेत. त्यांनी काही आक्षेपार्ह साधनांचा आश्रय केला असेल तर ते दाखवून देणे हे झामोदिन यांचे कर्तव्य आहे. हा प्रश्न केवळ नैतिक व धार्मिक आहे त्यात बाजू घेण्याला , प्रेमाला किंवा द्वेषाला जागा असू शकत नाही. सनातनी व सुधारक यांनी एकत्र काम केले तर ते सत्य बाहेर आणू शकतील[४१]

---

४१ म.गांधींचे संकलित वाङ्मय, खंड ५१, पृ.क्र.४११, प्रकाशक महाराष्ट्र शासन मुंबई

# अस्पृश्यांच्या शिष्ट मंडळाशी चर्चा

१५ डिसेंबर १९३२

**पुणे करारानंतर अवघ्या अडीच महिन्यानंतर अस्पृश्यांच्या शिष्ट मंडळाशी गांधीजींची खालील प्रमाणे चर्चा झाली.**

**प्रश्न** : अस्पृश्यता - निवारण संघाच्या अहवालात डॉ. आंबेडकर यांच्या पत्राचा उल्लेख नाही.

गांधीजी- तुमची तक्रार अशी असावी की त्यात उपस्थित केलेल्या मुद्यांचा विचार करण्यात आला नाही. तुमची मज विरुद्ध असलेली तक्रार मला कळू द्या. मी कोणत्या मार्गाने तुम्हाला मदत करीत आहे ,हे मी तुम्हाला सांगेल.

**प्रश्न** : तुम्ही देवरूखकरांना म्हणालात, ''या लोकांना प्रेमाने जिंका. '' परंतु प्रथम त्यांच्यात प्रेम असले पाहिजे.

गांधीजी- मग तुम्ही ती गोष्ट उलटी करा आणि तुम्ही त्यांना प्रेमाने जिंका!

**प्रश्न** : नाही, नाही ; ते गौरी शंकर पर्वताएवढे मोठे आहेत आम्ही त्यांच्याशी नि:संशय लढू शकतो; परंतु आमच्या हिंसेलाही मर्यादा आहे.

गांधीजी- मी असे ठामपणाने मानतो की, गटबाजी टाळण्यात यावी सवर्ण हिंदू मधली ही प्रवृत्ती दूर करण्यासाठी मी पराकाष्ठेचा प्रयत्न करीन .

**प्रश्न** : त्यांना काही सामाजिक विशेषाधिकार देण्याचे काय?

गांधीजी- हे सर्व प्रातांत चालू आहे .लोकांची समजूत पटवण्यात येत आहे आणि त्यात ढिलाई नाही. मलबारात जा व केवढामोठा फरक घडून आला आहे ते पाहा.

**प्रश्न** : परंतु , समाजाच्या या विभागाच्या सुधारणेसाठी तुमच्यापाशी काय योजना आहे?

गांधीजी- मी मंदिर प्रवेशाचा प्रश्न उपस्थित केला आहे तो नेमका याचसाठी त्यामुळे, सनातनी भयभित झाले आहेत तेमला सांगतात, '' तुम्ही दुसरी हर एक गोष्ट करा त्यांना विहीरीतून पाणी घेऊ द्या. परतु कृपया मंदिरांना स्पर्श करू नका.''हे केवळ पहिले पाऊल आहे प्रगत होईल असे अन्य प्रश्नही सोडवले जातील मंदिर प्रवेशाविषयी बरेच कार्य करावयाचे आहेत. आणि आधीच हे काम मलबारात योग्य रीतीने चालू आहे.

**प्रश्न** : अस्पृश्यांच्या यातना आणि स्पृश्यांनी त्यांचा चालविलेला छळ नष्ट करण्यासाठी उपाय शोधण्यासाठी, कृपया वकिलांची एक समिती नेमा.

गांधीजी- आम्ही वकील स्वंय सेवकांच्या सेवेचा उपयोग करू.

**प्रश्न** : स्वयंसेवक फार करू शकणार नाही.

गांधीजी- ते माझ्यासारखे असले तरी देखील?

**प्रश्न** : त्यांना (अस्पृश्यांना ) गिरण्यांच्या विणकाम खात्यात प्रवेश देण्यात यावा.आज उपहार गृहात आणि पाण्याच्या नळयांच्या बाबतीत अस्पृश्यता आहे मजूर महाजनच्या चहाच्या दुकानात ती आहे. चेंबर ऑफकॉमर्सने अस्पृश्यातून नैमेत्यिक कामगार घ्यावेत असे तुम्ही त्याला का सुचवित नाही? चार वर्णांविषयच्या तुमच्या मतात काही फरक आहे काय?

गांधीजी- मला भीती वाटत नाही. मी चार वर्णांवर ठामपणाने विश्वास ठेवतो .आंतरजातीय विवाह व सहभोजन याविषयी बंधने असू नयेत. निरनिरळया वर्णात विवाह होऊ शकत नाही असे शास्त्रात काहीही नाही. मी माझ्या जीवनात ते आचरले आहे. परंतु सध्या त्याचा प्रचार करण्याची माझी इच्छा नाही, मी जाती सुधारण्याच्या कार्यक्रमाचे काम हाती घेतले तर माझ्या अस्पृश्यता निवारण्याच्या कामाची हानी होईल. सर्व व्यवसाय वंश परंपरागत असावे. लाखो लोक प्रधानमंत्री व्हाईसरॉय होणार नाही. शिवाय आश्रम धर्माचे पुर्नरूज्जीवन होत नाही तोपर्यंत वर्ण धर्माचेही पुनरूज्जीवन होणार नाही

**प्रश्न** : आम्ही तुम्हाल किती प्रमाणात आमचा माणूस समजू शकतो?

गांधीजी- आंबेडकर जन्माला येण्याच्या पूर्वीपासून मी तुमचा माणूस आहे .ते पुरस्कार करीत असलेल्या सार्‍या गोष्टी तुम्हाला माझ्या लेखात आढळतील माझ्या इतक्या कडक भाषेत कोणीही अस्पृश्यतेला विरोध केलेला नाही.

**प्रश्न** : भाल याचे संपादकही तोच दावा करतात.

गांधीजी- जो प्रत्येकजण असा दावा करतो तो असे प्रामाणिकपणे करू शकतो परंतु सोलोन म्हणतो त्याप्रमाणे, माणसाची रक्षा थंड झाल्यावरच फक्त त्याला प्रशस्ती पत्र द्यावे. मी अगदी वाईट सनातनी ठरणार नाही असेकोणी सांगावे![४२]

---

४२ म.गांधींचे संकलित वाङ्‌मय, खंड ५१, पृ.क्र.४१५, प्रकाशक महाराष्ट्र शासन मुंबई

## ४.३ गांधीजींची दिशाभूल केली.

दिनांक ४/११/१९३२ रोजी डॉ. आंबेडकर तिसऱ्या राऊंडटेबल कॉन्फरन्सला जातात म्हणून प्रेमाचा निरोप देण्याकरीता सभा भरविली होती .त्या सभेत भाषण करताना बाबासाहेबांनी, गांधीजींचे लांगूल चालन करणाऱ्या लोकांनी कशी दिशाभूल करून दिली ते समजावून सांगितले. त्या भाषणात बाबासाहेब म्हणतात.’’ राऊंड टेबल कॉन्फरन्समध्ये जेव्हा माझा व म. गांधी यांचा तीव्र मतभेद झाला . तेव्हा म. गांधीची समजूत त्यांच्याभोवती लांगूलचालन करणाऱ्या लोकांनी अशी करून दिली होती की, डॉ. आंबेडकर म्हणजे महार जातीतील एक पोर आहे. त्यांच्या पाठीशी त्यांच्या ऑफिसमधील चार-दोन माणसांशिवाय कोणी नाही. पण म. गांधी रा. टे. कॉहून मुंबईला आले त्यावेळी बेलार्ड पियर बंदरावर अस्पृश्य वर्गातील २० हजार बंधुभगिनींनी त्याचे काळे बावटे दाखवून स्वागत केले. तेंव्हा त्यांचे डोळे उघडले आणि म्हणू लागले की, विलायतमध्ये व येथे माझी माझ्याच अनुयायांनी दिशाभूल करून मला फसविले. डॉ. आंबेडकर यांच्या पाठीशी अस्पृश्यांचा प्रचंड लोकसमुदाय आहे अशी माझी खात्री करून दिली असती तर मी त्यांच्या मागण्यांना विरोध केला नसता.

माझ्या मित्रांनी व अनुयायांनी अस्पृश्यातील गारगोटया व नदीतील दगड यांना शेंदूर फासून त्यांना जाणूनबुजून पुढारी केले व माझी फसवणूक केली. अस्पृश्यांच्या खऱ्या पुढाऱ्यांची मला ओळखसुध्दा होऊ दिली नाही.’’[४३]

## ४.४ अस्पुश्यता निवारण करण्याकरिता चातुर्वर्ण्य व्यवस्था नष्ट होणे आवश्यक

दिनांक १८ फेब्रुवारी १९३३ रोजी ठाणे जिल्ह्यातील कसारा येथील सभेत भाषण करताना बाबासाहेब म्हणाले की ‘‘म. गांधी व सनातनी लोक यांच्याशी अस्पृश्यता नष्ट करण्याच्या बाबतीत गेले ८/१० दिवस मी वाटाघाटी करीत आहे. म. गांधींनी अस्पुश्यता निवारण करण्याकिरता मंदिर खुले करण्याची व अस्पृश्यता धुऊन काढण्याची चळवळ चालविली आहे. मंदिर प्रवेशाच्या बाबतीत मी एक जाहीर पत्रक प्रसिद्‌ध केले आहे .त्यात मी स्पष्ट सांगितले आहे की ,आमची अस्पृश्यता नष्ट करण्याकरिता मंदिर प्रवेशाची जरूरच आहे असे नाही. आम्हाला हिंदू धर्मात समानता पाहिजे व चातुर्वर्ण्य नष्ट झाले पाहिजे तरच हिंदू धर्म आम्हास मानीत आहे ,असे आम्ही समजू तरच हिंदू धर्म आम्हास मान्य आहे.

---

४३. डॉ.बाबासाहेब आंबेडकर लेखन आणि भाषणे, खंड १८ भाग १, प्रकाशक डॉ.बाबासाहेब आंबेडकर चरित्र साधने प्रकाशक समिती महाराष्ट्र शासन, दि.१५.१०.२००२ पृ.क्र. ३८३,३८४.

## ४.५ पुणे कराराची स्मृती

शनिवार दिनांक २९ सप्टेंबर १९३४ रोजी परळ मधील कामगार मैदानावर पुणे कराराची स्मृती जागृत ठेवण्याकरिता एक प्रचंड जाहीर सभा भरली होती. त्या सभेतील पुणे करारासंबंधी बाबासाहेबांनी व्यक्त केलेले काही विचार पुढीलप्रमाणे-

आता हिंदूंकडून कदाचित असे सांगण्यात येईल की, ज्या वेळेस दोन पक्षात करार होतो त्यावेळेस कोणताही पक्ष संकटात असता कामा नये. म. गांधींनी आपले प्राण पणास लावले व त्यामुळे अशी परिस्थिती उत्पन्न झाली की ,त्यांचे प्राण वाचविण्याची जबाबदारी माझ्यावर पडली. त्यावेळी सर्व हिंदू समाज माझ्यावर संतप्त झाला होता. मी नमते घेऊन त्वरेने कसातरी करार घडवून आणावा म्हणून चोहो बाजूने मला पेचात धरले होते. देशातील कित्येक तरुण माझा जीव घेण्यास सज्ज झाले होते. बंगालातील तरुणांकडून मला धमकीची पत्रे येत होती. कोणत्याही प्रकारे म. गांधींच्या जीवितास अपायझाल्यास मला त्याबद्दल जबाबदार धरुन माझे प्राण धोक्यात तर येतीलच पण असहाय्य अशा सर्व अस्पृश्य समाजावर हिंदू समाजाकडून सूड घेतला जाईल, हे भीषण चित्र माझ्या डोळयांपुढे होते. अशा मन:स्थितीत प्रतिपक्षाजवळ वाटाघाट करून मला करारावरसही करावी लागली. असे असता आपले प्राण संकटात होते म्हणून करार मान्य करणे आपल्यालाभाग पडले. असे म्हणण्याचा कुणालाही हक्क पोचत असेल तर कायद्याच्या दृष्टीने तो मला पोचत आहे, यात शंका नाही.

परंतु पुणे करारातील सर्वबाबी माझ्या मताप्रमाणे जरी घडून आल्या नसल्या तरी या प्रकारचा हक्क बजावण्यास मी तयार नाही. मी पुणे कराराच्या बाबतीत इमानी राहणार आहे. अशा प्रकारे पुणे करार अभेद्य राखण्यास अस्पृश्य समाज तयार असला, तरी सर्व हिंदू समाज तसेच वर्तन ठेवील असे म्हणवत नाही. आणि हिंदू समाजातीलकित्येक जबाबदारी संस्था त्यांच्या अलीकडच्या चळवळी पहिल्या व उद्गार ऐकले तर हिंदू समाज पुणे करारास इमानी राहील किंवा नाही याची मला जबरदस्त शंका वाटते आणि त्याकरिता आपण जागरूक राहून आपापल्या मिळालेल्या हक्कांचे संरक्षण केले पाहिजे.

पुणे करार हा अस्पृश्यांच्या इतिहासातील एक चिरस्मरणीय असा प्रसंग आहे. या कराराच्याद्वारे आपल्या समाजाने बेदरकार हिंदू समाजास आपले राजकीय अस्तित्व कबूल करण्यास भाग पाडले आहे. याकरिता तो आपला राजकीय दिन म्हणून आपण पाळला पाहिजे. पुणे करारान्वये आपल्या समाजास मिळालेले अधिकार आपण योग्यरीतीने उपयोगात आणतो की नाही, हे पाहण्याकरिता आपण या दिवशी जमले पाहिजे.[४३.१]

---

४३.१ डॉ.बाबासाहेब आंबेडकर लेखन आणि भाषणे, खंड १८ भाग १, प्रकाशक डॉ.बाबासाहेब आंबेडकर चरित्र साधने प्रकाशक समिती महाराष्ट्र शासन, दि.१५.१०.२००२ पृ.क्र. ४२२,४२३.

## ४.६ पुणे करार एक धोकेबाजी

दिनांक २९ सप्टेंबर १९३४ रोजी परळच्या कामगार मैदानावर पुणेकरारची स्मृती जागृत ठेवण्याकरिता आयोजित केलेल्या सभेत डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांनी पुणे करारावर केलेली सही एकप्रकारे दबावाच्या मन:स्थित केलेली आहे असे मान्य केले आहे. गांधीजींनी उपोषण सुरू ठेवल्यामुळे संपूर्ण भारतभर बाबासाहेबाच्या विरुद्ध वातावरण तयारझाले. बाबासाहेब आपल्या प्राणाची काळजी करीत नव्हते. उलट त्यांनी पुणे कराराच्या वाटाघाटी सुरू असताना असे म्हटले आहे की, ''मला या समोरच्या पोलला फाशी दिले तरी चालेल .परंतु मी माझ्या समाजासाठी लढून झगडून मिळवलेले हक्क आणि अधिकार मुळीच सोडणार नाही'' एवढी मनाची खंबीरता असतानाही बाबासाहेबांनी पुणेकरार मान्य केला. कारण उपोषणादरम्यान जर गांधीजींच्या जीवतास धोका झाला असता तर भारतातील स्पृश्य लोकांनी असाहाय्य अशा अस्पृश्य लोकांना **बेदरकारपणे** चिरडून टाकले असते. त्यांचा अनन्वित छळ केला असता ,हे भीषण चित्र बाबासाहेबांच्या डोळयापुढे उभे राहिल्यामुळे विचित्र मन:स्थितीत प्रतिपक्षाशी बळजबरीने बाबासाहेबांना वाटाघाटी करून करार मान्य करावा लागला. हे एक प्रकारचे दबावतंत्र बाबासाहेबांवर होते. समाजाच्या हितासाठी एक पाऊल मागे येऊन बाबासाहेबांनी करार मान्य केला. परंतु अस्पृश्यांच्या निवडणुकीत स्पृश्य हिंदू ढवळाढवळ करणार नाहीत असे आश्वासन देऊन सुध्दा निवडणुकीत प्रत्यक्ष व अप्रत्यक्ष हस्तक्षेप करून अस्पृश्यांच्या प्रतिनिधित्वाला पूर्णपणे निष्प्रभ केले.

अशाप्रकारे पुणे करारात पूर्ण बदमाशी भरलेली आहे. तो स्वीकारण्यात आला याचे कारण म्हणजे श्रीमान गांधीजींनी उपोषणाद्वारे आणलेले दडपण व स्पृश्य हिंदूकडून अस्पृश्यांच्या निवडणुकीत कोणतीही ढावळाढवळ केली जाणार नाही असे आश्वासन दिले होते. परंतु त्या गोष्टींचे पालन न झाल्यामुळे अस्पृश्यांमधील खरे प्रतिनिधित्व विकसित होऊ शकले नाही.[४४]

डॉ बाबासाहेब आंबेडकरांच्या शब्दात ही अस्पृश्य समाजासोबत केलेली एकप्रकारची धोकेबाजी आहे.

---

४४ डॉ.बाबासाहेब आंबेडकर राज्य आणि अल्पसंख्यांक प्रकाशक प्रदिप शेडगे, नागपूर, पृ.क्र. ६६.

# प्रकरण ५

# प्रसार माध्यमांनी -(मासिकांनी) घेतलेली दखल

## अनुक्रमणिका


| अनुक्रमांक | तपशील |
|---|---|
| ५.१ | अस्पृश्यांचा प्रश्न |
| ५.२ | आनंद १९३३ |
| ५.३ | आत्मोन्नति १९३४, |
| ५.४ | मासिक- निर्झर १९३३ |
| ५.५ | नवजीवन १९३२ |
| ५.५.१ | लोकशाही आणि मतदार संघ |
| ५.५.२ | मंक्रा आणि जाणवे यांचे ढोंग नको |
| ५.५.३ | कम्युनल ॲवॉर्ड |

## प्रकरण ५

# प्रसार माध्यमांनी घेतलेली दखल

## ५.१ अस्पृश्यांचा प्रश्न

मसिक - ब्राम्हण पत्रिका

वर्ष - ९ अंक ७

इसलामपूर- आश्विनी शके १८५३सन-१९३१

संपादक- वा. दा. मुंडले

पा. न. १२ वर अस्पृश्यांचा प्रश्न या शीर्षकांतर्गत संपादकीय लेख पुढीलप्रमाणे-

सध्या विलायतेत जी वर्तुळ परिषद चालू आहे. त्यात अस्पृश्यांचे प्रतिनिधी डॉ. आंबेडकर यांनी विलक्षण व तऱ्हेवाईक धोरण स्वीकारलेले असून ते अमलात आणण्याची त्यांची तऱ्हा ही जराशी चमत्कारिक असल्यामुळे या प्रश्नास पुन्हा एकदा खळबळीचे स्वरूप प्राप्त झाले आहे.

डॉ. आंबेडकर यांनी मुसलमानांशी साथ करून त्यांच्याही पेक्षा अधिक दुराग्रहांचे धोरण पत्करून ते अमलात यावे म्हणून महात्मा गांधीशी जे उद्धट वर्तन केले. त्यामुळे तेथे व हिंदूस्थानात मोठीच खळबळ उडून गेली आहे. सर्व अस्पृश्यांचे खरे प्रतिनिधी आपण अशी डॉक्टरांची गर्वयुक्त गर्जना व कॉंग्रेस ही लबाड व ढोंगी असून म. गांधींना तर त्यांच्यातर्फे बोलण्याचा मुळीच अधिकार नाही. असे त्यांनी भर सभेत मोठया अट्टाहासाने सांगून महात्माजींचा तेजोभंग करण्याचा आव आणला. पण लवकरच हिंदूस्थानातून अनेक ठिकाणांहून स्वयंस्फूर्तीने अस्पृश्यांच्या शेकडो सभा भरून त्यांनी डॉ. आंबेडकरांच्या धोरणाचा धिक्कार व म. गांधींचा पुरस्कार केला. तशा आशयाच्या काही तारा विलायतेस मंत्रिमंडळाकडेही जाऊन धडकल्या! तेव्हा डॉक्टरांचे येथील चेले कावरे-बावरे होऊन त्यांनी कशातरी काही सभा भरवून वरील महापुरास आळा घालण्याचा प्रयत्न केला. पण त्याचा काहीच परिणाम न झाल्यामुळे अखेर मुंबईच्या टाईम्सला डॉ. आंबेडकरांची अब्रु सांभाळण्याची पाळी आली! पण त्यातही टाईम्सकारांना महात्माजींच्या अस्पृश्यता निवारण्याच्या चळवळीचा गौरव उल्लेख करून महात्माजींच्या आयुष्यक्रमातील एक महत्त्वाची विधायक कामगिरी असल्याचे कबूल करावेच लागले. गतांकी आम्ही म्हटल्याप्रमाणे डॉ. आंबेडकरांना मुंबई इलाख्याबाहेर फारसे कोणी जाणत नसल्यामुळे त्यांचा पाठपुरावा करण्यास इलाख्याबाहेर काही अपवाद सोडून दिल्यास फारसे कोणी धजले नाही. उलट हिंदूस्थानातील बहुतेक सर्व प्रमुख ठिकाणांतून म. गांधींचाच पुरस्कार करण्यात आला. हे गेल्या पंधरवडयातील वर्तमान पत्रांवरून कोणासही स्पष्ट करण्यासारखे आहे. मागासलेल्या जातीतला मनुष्य दैवयोगाने मोठया पदवीस चढला तर

तो लवकरच अधिक मदांध व उन्मादप्रवण बनतो अशी जी सामान्यत: समज आहे ती अक्षरश: खरी आहे. तथापि डॉ. मजकुरांच्या या उद्दामपणाचा दर्प परस्पर त्यांच्या वर्गातील लोकांनीच उतरविला असल्यामुळे त्याचा अधिक विचार न करिता अस्पृश्यांचा प्रश्न यापुढे कसा सोडवावा याचा विचार करणे योग्य होईल.

अस्पृश्यवर्गाने यावेळी जर म. गांधींवर अविश्वास व्यक्त करून डॉ. आंबेडकरांचीच बाजू धरली असती, तर ज्या अर्थी अस्पृश्यांचा फारमोठा भाग महात्माजींवर व राष्ट्रीय सभेवर आपला विश्वास व्यक्त करीत आहे .त्या अर्थी राष्ट्रीय सभेने आजवर त्यांची जी सेवा केली ती योग्य होती असे म्हणणे भाग आहे.

अस्पृश्यवर्गाबरोबर रोटीबेटी व्यवहार इतर जातींनी केला पाहिजे असा आग्रह डॉ. आंबेडकर व त्यांचा मुंबईतील कंम्पू यांचा आहे .ही गोष्ट सर्व अस्पृश्यांना मान्य होणारी नाही. कारण त्यांच्यातही महार, मांग, चांभार, ढोर वगैरे इतर अनेक जाती आहेत व त्या वंशिक आणि अनुवंशिक दृष्टया एकमेकांपासून भिन्न असल्यामुळे त्यांची गल्लत होणे केव्हाही इष्ट नाही व तसे करणे त्या जातीतील समंजस लोकांना मान्यही होणार नाही. काही लोक व डॉ. आंबेडकर काय असा टाहो फोडत असतात की, हे भेद ब्राम्हणांनी उत्पन्न करून कायम ठेवले आहेत. पण हे त्यांचे म्हणणे भ्रामक असून कपटाचे आहे . काही भोळे अस्पृश्य अडाणी आहेत तोवर ते खरे मानतील पण जसजसा शिक्षणाचा प्रसार होईल व मानवंशशास्त्र, समाजशास्त्र, या गोष्टी जसजशात्यांना कळू लागतील तसतसा अपरोक्त कम्पूच्या विचारातील भ्रामकपणा त्यांच्या लक्षात येऊन ते आपला वंशिक पृथकपणा रक्षण करण्याचाच अट्टाहास करतील यांत शंका नाही. या जातींची अस्पृश्यता निघाली म्हणजे त्यांच्यात बाह्य व्यवहार सुरू होईल पण रोटीबेटी व्यवहार विशेषत: बेटी व्यवहार होईल हे कदापि शक्य नाही. ही जर त्यांच्यातली स्थिती तर हिंदू जातींशी त्यांचा रोटीबेटी व्यवहार होण्याची गोष्ट कशाला बोलावी?

## ५.२ आनंद फेब्रुवारी १९३३

१) मासिक -आनंद

सन-फेब्रुवारी १९३३ (पुरवणी)

''राज्यघटनेची पूर्व तयारी'' या मथळ्याखाली गोपीनाथ गणेश तळवलकर यांचा लेख प्रसिद्धझाला.त्यात तिसऱ्या गोलमेज परिषदेविषयी व्यक्त केलेले विचार पुढील प्रमाणे - मंडलाकार परिषदेचे तिसरे अधिवेशन आटोपल्यानंतर प्रमुख पुढाऱ्यांनी जे उद्गार काढले त्यांचा तात्पर्यार्थ एका वाक्यात सांगायचा म्हणजे ''येणाऱ्या सुधारणा फारशा समाधानकारक नाहीत. तरी देखील त्यावर बहिष्कार घालू नका'' आता या सुधारणांच्या वाटेत अडचणींचे पर्वत आहेत हे खरे. मुख्य प्रश्न संस्थानिकांचा, त्यांना आपल्या अंतर्गत कारभारात कोणी ढवळाढवळ करावयास नको आहे. उद्या अस्तित्वात येणाऱ्या हिंदी लोकसत्तेचे वर्चस्व मानन्याची त्यांची तयारी नाही. संरक्षण अटींना व्यापारी

तयार नाहीत. जातीविषयक निर्णयाबद्दल हिंदू पुढारी तक्रार करीत आहेत. एक मताने निघालेले मुद्दे फार थोडे असल्याने सर्वच पक्ष आपापल्या परीने असंतुष्ट आहेत असे म्हणण्यास हरकत नाही.

वरील परिच्छेदाच्या आधारे पुणे करारानंतरही हिंदूपुढारी फार समाधानी नाहीत असाच सूर दिसतो.

## ५.३ आत्मोन्नति सन- मे १९३४

२) मासिक- आत्मोन्नति

सन- मे १९३४

अंक- आठवा.

अस्पृश्यता निवारणासंदर्भात गांधीजींनी १९३२ नंतर आपली भूमिका अधिक स्पष्ट व गतिमान केली होती. आणि त्यात कहीजनांना (अस्पृश्यांना) मंदिरप्रवेश मिळावा या दृष्टीने ते सर्वच हिंदूंचे (सनातनी हिंदूचे) मन कळविण्याचा काटेकोर प्रयत्न करीत होते. अस्पृश्यांसाठी मंदिर प्रवेश हा अस्पृश्यता निवारण्याचा प्रभावी मार्ग म्हणून गांधीजी या दृष्टीने प्रयत्न करीत होते .परंतु भारतातील सनातनी लोक आपला जुना विचार सोडण्यास फारसे तयार नव्हते म्हणून की काय २४ मे रोजी ओरिसा राज्यातील लेखनपूर या गावातील हरिजन वस्तीत तेथील लोकांनी गांधीजींकडे मंदिराची मागणी केली तेव्हा गांधीजी म्हणाले की ''पृथ्वीमातेच्या अंकावरील आपल्या सारख्या बालकांनी आकाशाच्या धुमटाकडे पाहून सूर्योदयापूर्वी व सूर्यास्तानंतर ईश्वराची प्रार्थना करण्याचे ठरविल्यास आपणास मंदिराची काय जरूरी आहे?''[४४.१]

गांधीजींनी हरिजनांनापुढील सहा आज्ञा निवेदन केल्या.

१) अस्पृश्यतेचे निवारण करा.

२) सकाळ सायंकाळ प्रार्थना करा.

३) आळस सोडा, उद्योगी बना म्हणजे तुमच्यावर उपाशी मरण्याची पाळी येणार नाही.

---

४४.१ आत्मोन्नती, मे १९३४, अंक आठवा पृ.क्र. २७.

४) मद्य व मादक पदार्थ सेवन करू नका .

५) शारीरिक स्वच्छतेकडे, आरोग्याकडे लक्ष द्या.

६) महिलांना अलंकाराचा त्याग करा. धर्म व सौंदर्य अलंकारांनी प्राप्त होत नाही.

## ५.४ मासिक- निर्झर

३) मासिक- निर्झर

संपादक- श्रीनिवास पाठक

सन- १९३३ वर्ष २ रे अंक ४ था

वरील मासिकात पान न. ६ वर कायदेमंडळातील बिनसरकारी ठराव या मथळयाखली आलेल्या लेखातील काही परिच्छेद.

कायदेमंडळाच्या चालू अधिवेशनातील काही अनेक महत्त्वाचे बिनसरकारी ठराव आणण्यात आले आहेत. त्यांपैकी एक श्री. रंगा अय्यर यांचे अस्पृश्यता निवारण बिल.

महात्मा गांधींच्या उपोषणापासून अस्पृश्यतेच्या बाबतीत जी जागृती हिंदू समाजात घडून आली त्याचे प्रत्यंतर म्हणजे मद्रास कायदे मंडळात डॉ. सुबरायन यांनी आणलेले मंदिर प्रवेशाचे बिल

अस्पृश्यता हा संबंध हिंदूस्तानचा प्रश्न असल्याकारणाने मद्रास कौन्सिलात सदर बिल आणण्यास व्हाईसरायनी परवानगी दिली नाही .परंतु रंगा अय्यर यांच्या बिलास त्यांची मंजूरी मिळाली आहे. मात्र या बिलाने अस्पृश्यता निवारण होईल ,अशी अपेक्षा करण्यात अर्थ नाही. कारण सदर बिल बिनसरफारी असल्या कारणाने त्याची प्रगती तितकी समाधानकारक होणार नाही. तसेच सदर ठराव धार्मिक स्वरूपाचा असल्याकारणाने शिवाय सदर प्रश्नही वादग्रस्त असल्याकारणाने हे बिल लोकमत आजमवण्यासाठी प्रसिद्धीस पाठविणे भाग पडणार त्यामुळे बराच कालापव्यय होणे शक्य असून कदाचित ह्या कायदेमंडळाच्या हयातीत त्यावर कधीच चर्चा होणार नाही.

## ५.५ मासिक- नवजीवन

४) मासिक- नवजीवन

वर्ष- १ ले, अंक १ला

सन- जानेवारी १९३२

संपादक- विठ्ठल यशवंत बोरकर

वरील मासिकात म. गंधी आणि जीजस ख्राईस्ट या मथळ्याखाली लेखक ल. वि. परळकर यांच्या लेखातील गांधीर्जीविषयीचेमत पुढीलप्रमाणे -

जीजस ख्राईस्ट हा मोठा धर्मसंस्थापक होता. तो गरिबांचा कैवारी होता. पापी लोकांना तो जवळ करीत असे. कोणाचाही द्वेष करीत नसे. म. गांधीजी देखील दलितांचे व गांजलेल्यांचे कैवारी आहे. ते कोणाचाही द्वेष करीत नाहीत. आपल्या प्रतिस्पर्ध्यावरही प्रेम करतात. नम्रता, अहिंसा, व प्रेम यांचा गांधीजी व जीजस हे दोघेही उपदेश करीत आले आहेत.

राजकीय सुधारणा अगोदर की सामाजिक सुधारणा अगोदर हा मतप्रवाह त्या काळात वाहत होता. त्या प्रश्नासंदर्भात ‘अस्पृश्यतेचा प्रश्न केवळ सामाजिक आहे काय? या मथळया खालील. पांडुरंग सबनीस यांचे काही विचार वरील मासिकात व्यक्त केले आहेत ते खालीलप्रमाणे-

अस्पृश्यता म्हणजे एक प्रकारची निर्दयी गुलामगिरी आहे. याच परिस्थितीत अस्पृश्यता ठेऊन हिंदूस्तानला स्वराज्य मिळाले की, तुम्हीही स्वतंत्र झ्गालातच असे अस्पृश्यांना सांगणे म्हणजे एखाद्याचे नाक कापून वर त्याला ‘वा! तुझे नाक किती चाकेफळीप्रमाणे सुंदर आहे!’’ असे सांगण्या इतकेच निर्लज्जपणाचे व अहमपणाचे आहे.

अस्पृश्यता हा जितका सामजिक तितकाच तो राजकीय प्रश्नही आहे. व काँग्रेसने सर्वशक्ती वेधून या प्रश्नांचा पाठपुरवठा करणे अत्यंत आवश्यक आहे.

## ५.५.१ लोकशाही आणि मतदार संघ

६) मासिक नवजीवन

वर्ष १ले अंक जून १९३२

विठ्ठल बोरकर

प्रसंग विचार या मथळयाखाली लोकशाही आणि मतदारसंघ या मुद्दयाचा विचार करता व्यक्त केलेले मत.

गेल्या १० वर्षात हिंदी राजकारणाला अगदी नवीन व निराळे असे वळण लागल्यामुळे जनता आणि तिचे पुढारी यांना मतदारसंघाचे महत्त्व आणि त्यांना सुशिक्षित करण्याची जबाबदारी यांचे भानच उरले नाही.

याचा एक दुष्परिणाम कौंसिले व असेंब्लीमधून योग्य प्रकारचे राजकीय पक्ष निर्माण होण्याऐवजी जातिविशिष्ठ संकुचित व स्वार्थी कल्पनांना **राष्ट्रकार्यात** प्राधान्य देण्याऱ्या लोकांचे लहानमोठे गट तेथे प्रस्तापित करणे हा झाला. कम्युनल रिप्रेझेंटेशनच्या योजनेमुळे या गटांना आज जवळजवळ चिरस्थायित्व प्राप्त झाले आहे. आणि त्याबरोबर मतदारसंघांद्वारा व्यक्त होणाऱ्या जनसमूहाचे राजकीय शिक्षणाचे कार्य मागे पडले आहे.

साडेतीन कोटी प्रजेला मतदानाचे हक्क देण्याबरोबरच हिंदुस्थानात लोकशाही आणि राज्यव्यवस्था रुळविण्याकरिता हिंदुस्थानातून कम्युनल रिप्रेझेंटेशनचे उच्चाटन करण्याचा निश्चय सरकारनेच केला पाहिजे.

## ५.५.२ मंत्रा आणि जाणवे यांचे ढोंग नको

७) मासिक : नवजीवन

वर्षे १ले अंक जुलै १९३२

संपादक :विठ्ठल बोरकर

'प्रासंगिक विचार' या सदरात मंत्र आणि जाणवे यांचे ढोंग नको. या शीर्षकाखाली काशी क्षेत्रात गंगेच्या घाटावर अस्पृश्यांच्या गळयात जान्हवी अडकवून त्यांना गायत्री मंत्राची संथा देण्याचा समारंभ पंडित मदन मोहन मालवीय यांनी केला होता. त्यासंदर्भात निव्वळ मंत्रोच्चाराने अस्पृश्यांचा स्पृश्य बनलेल्याचे कलियुगात तरी कोणालाही पहावयास मिळाले नाही.

ब्राम्हणांच्या बोकांडी आज शतकानुशतके बसलेला कर्मठपणा ब्राम्हणेतर आणि अस्पृश्य यांच्याही बोकांडी बसल्याने हिंदू धर्म, हिंदू संस्कृती यांची सुधारणा होऊन हिंदू समाज संघटित होईल, हा समज मुळातच चुकीचा आहे.

गायत्री किंवा इतर कोणत्याही संस्कृत मंत्राच्या पठणाने अस्पृश्यता नष्ट करण्याचे कार्य पार पडणार नाही. हिंदू समाजात आज ज्यारीतीने अस्पृश्यांना वागविले जाते, ती रीत माणूसकीला शोभणारी नसून अस्पृश्यांबद्दल अखिल हिंदू समाजाच्या अध:पाताला ती कारण झाली आहे. अशी जाणीव हिंदू

समाजाला करून देणे आणि अस्पृश्यांचा उद्धार म्हणजे स्वत:चा उद्धार या दृष्टीने कार्यास लागणे हाच आजचा तरणोपायाचा मार्ग आहे. हिंदू समाजाबद्दल आपलेपणाची भावना अस्पृश्यांच्या मनांत निर्माण झाल्याशिवाय ते संयुक्तमतदारासंघ व्यवस्थेला कधीही अनुकूल होणार नाहीत व यज्ञोपवित धारण करून गायत्रीमंत्र म्हणण्याचा अधिकार मिळाल्याने संतोष पावणार नाहीत.

## ५.५.३ कम्युनल ॲवॉर्ड

८) मासिक नवजीवन

अंक स्प्टेंबर १९३२

शीर्षक : कम्युनल ॲवॉर्ड

लेखक : वसंत नारायण नाईक (एम.ए)

हिंदुस्तानातील अल्पसंख्यांकांच्या प्रश्नावर विलायतेतील सरकारने दिलेला निवाडा १७ ऑगस्ट रोजी सर्वत्र प्रसिद्ध करण्यात आला. या निवाडयाच्या स्वरुपाचे दिग्दर्शन करण्यापूर्वी त्याला जोडलेल्या मॅक्डोनॉल्ड साहेबांच्या प्रास्ताविक पत्रकाचा आधी विचार करणे अप्रस्तुत होणार नाही. त्या पत्रकातील विधनांचा क्रमश: विचार करायचा झाल्यास तो पुढे दिल्याप्रमाणे करता येईल.

आपल्या पत्रकात मुख्यप्रधान म्हणतात की आपण हा निवाडा ''हिंदुस्तानचा मित्र'' या नात्याने दिला आहे. निवाडयाचे एकंदर स्वरूप व त्याचे दूरवरचे परिणाम लक्षात घेता मुख्यप्रधनांचा हा निवाडा हितशत्रूने दिल्यासारखा वाटतो, असे स्पष्ट सांगणे जरूर आहे .मुख्य प्रधान आणि ब्रिटीश सरकार यांनी या निवाडयामुळे जर कोणाचेही  मित्रकार्य केले असेल तर ते हिंदुथानातील बावीसकोटी प्रजाजनांचे नसून त्यातील ६/७ कोटी मुसलमांनाचे व आपलेच जातभाई जे येथील मुठभर युरोपीयन लोक त्यांचेच केले आहे.असले ॲवॉर्ड देऊन मॅक्डोनॉल्ड साहेबांनी यापेक्षा अधिक योग्य व उपकारक ॲवॉर्ड हिंदुस्थानातील ज्ञातिसमूहांनी एकमेकांत संघनमत करून निर्माण केले तर प्रस्तूत ॲवॉर्ड आम्ही मागे घेऊ असे  सांगावे आणि तोपर्यंत आम्हां, आमच्या ॲवॉर्डात लोकमतानरूप कोणताही इष्ट फेरबदल करण्यास तयार होणार नाही असेही त्याच बरोबर म्हणावे. या न्यायाप्रियेतला अजबच म्हटले पाहिजे.

''वस्तुस्थिती लक्षात घेऊनच आपण हे केले आहे'' हे मॅक्डोनॉल्ड साहेबांचे विधान मुसलमानांच्या बाबतीत कदाचित खरे धरता येईल .पण त्यापुढे जाऊन हिंदुस्थानातील स्त्री समाज, अस्पृश्य लोक, हिंदी ख्रिस्ती, ॲग्लो इंडियन यांच्याही बाबतीत स्वतंत्र मदारसंघ व्यवस्थेचा अवलंब करणे,याला वस्तूस्थितीचा दाखला कसा देता येईल?

यांपैकी ख्रिस्ती समाजाने या प्रकारची मागणी केलेली नाही. उलट याला विरोधच केला आहे. स्त्री समाजाने तर एकमुखाने याला विरोध केला आहे. अस्पृश्य समाजात या बाबतीत एकवाक्यता नाही. हे राजा-मुंजे ॲक्टने सिद्ध केले आहे. स्वतंत्र जातवारी मतदारसंघाद्वारा प्रत्येक गट दुसऱ्यापासून अलग

ठेवण्याचे (पुण्यकाम केले आहे) पुण्य जोडले आहे या प्रकाराला भेदनीतिचा अतिरेक याशिवाय दुसरे नावंच देणे अशक्य आहे.

अस्पृश्य समाजाला खाससंघ व सार्वत्रिक संघ या दोन्ही व्यवस्थेतून आपले सभासद निवडून देण्याच्या हक्काऐवजी सार्वत्रिक संघात अधिक जागा देण्यात आल्या असत्या तर फारसे बिघडले असते असे नाही.या अॅवॉर्डात मायनॉरिटीजचा निवाडा देताना त्यांच्या बरोबरच व्यापारी मंडळे, खाणीचे मालक, आसामासारख्या प्रांतातील चहाचे मळेवाले, जमिनदार यांचीही दावण बांधण्यात येऊन त्यांच्याही सभासदांची संख्या परस्पर ठरविण्यात यावी. ही तऱ्हा अजबच समजली पाहिजे.

अॅवॉर्ड प्रसिद्ध झाल्या दिवसापासून त्यावर हिंदुस्थानात जी टीका होत आहे, ती लक्षात घेता या अॅवॉर्डने कोणचेही समाधान होणे शक्य नाही.

## प्रकरण ६

# निष्कर्ष आणि समारोप

### अनुक्रमणिका


| अनुक्रमांक | तपशील |
|---|---|
| ६.१ | प्रास्ताविक |
| ६.२ | संशोधनाची उद्दिष्टे |
| ६.३ | संशोधन पध्दती |
| ६.४ | संशोधनाची साधने |
| ६.५ | संशोधनाची गृहीतके |
| ६.६ | गृहीतकांची पडताळणी आणि निष्कर्ष |
| ६.७ | **संशोधनांची व्याप्ती आणि मर्यादा** |
| ६.८ | **भविष्यातील संधी** |
| ६.९ | समारोप |

प्रकरण ६वे

# निष्कर्ष आणि समारोप

## ६.१ प्रास्ताविक

''पुणे करार आणि तत्कालीन प्रसार माध्यमांनी घेतलेली दखल'' या विषयावर प्रस्तुत (संशोधनासाठी) संशोधन प्रबंधासाठी अभ्यास करण्याचे निश्चित केल्यानंतर संशोधनासाठी काही उद्दिष्टे निश्चित केली. ही उद्दिष्टे खालीलप्रमाणे.

## ६.२ संशोधनाची उद्दिष्टे

अ) पुणे कराराची ऐतिहासिक पार्श्वभूमी जाणणे.

ब) पुणे कराराचे नेमके स्वरुप अभ्यासणे.

क) डॉ. आंबेडकर व म. गांधीजींच्या भूमिकांचा अभ्यास करणे.

ड) प्रसार माध्यमांनी (मासिके व वर्तमानपत्र इ.)घेतलेल्या नोंदींचा अभ्यास करणे.

इ) मूळ संदर्भ साधने तपासण्याचा प्रयत्न करणे.

प्रस्तुत संशोधनामध्ये वरील उद्दिष्टांची पूर्ती करण्यासाठी ऐतिहासिक संशोधन पद्धतीचा अवलंब केला आहे.

## ६.३ संशोधन पद्धती

अ) ऐतिहासिक संशोधन पद्धतीचा अवलंब प्रस्तुत संशोधनासाठी केला आहे.

ब) प्रामुख्याने ग्रंथालयीन संशोधन पद्धतीचा अवलंब करून उपलब्ध साधने आणि साहित्य अभ्यासातून संशोधन सादर केले आहे.

## ६.४ संशोधन साधने

ग्रंथालयीन संशोधन पद्धतीचा वापर करीत असताना गतसंशोधनाचा आढावा घेण्यासाठी दुय्यम संशोधन साधने म्हणजे ग्रंथ, मासिके, चरित्र यांचा आधार घेतला.

प्रस्तुत संशोधनासाठी वर उल्लेख केलेली सर्व (पाच) उद्दिष्टे पूर्ण करण्यात आली आणि उपलब्ध झालेल्या तथ्यांचे विश्लेषण करून निष्कर्ष काढण्यात आले.

हया संशोधनासाठी काही गृहीतके मानण्यात आली. ही गृहीतके खालीलप्रमाणे.

**६.५ संशोधनाची गृहीतके**

अ) पुणे करार ही एक ऐतिहासिक घटना आहे.

ब) भारतीय राजकारणावर या घटनेचा गंभीर परिणाम झाला आहे.

क) पुणे कराराचे मूळरूप व हेतू प्रतिनिधित्वाशी संबंधित होता.

ड) प्रसारमाध्यमांनी या घटनेची गांभीर्याने दखल घेतली आहे.

इ) पुणे कराराचे समर्थक व विरोधक दोन्ही प्रकारच्या मतांना प्रसारमाध्यमांनी प्रसिद्धी दिली आहे.

गृहीतकांची पडताळणी करून काढल्या गेलेल्या निष्कर्षाची मांडणी पुढील विवेचनात केली आहे.

**६.६ गृहीतकांची पडताळणी**

**६.६. अ गृहीतक : ''पुणे करार'' ही एक ऐतिहासिक घटना आहे.**

**६.६. अ १ गृहीतकाच्या संदर्भात संशोधनाअंती खालील तथ्ये समोर आलीत.**

१) विसाव्या शतकामध्ये भारतीय राजकारणातील डॉ. बाबसाहेब आंबेडकर व म. गांधीजी या दोन दिग्गज नेत्यांमध्ये झालेला हा समझोता आहे.

२) मदन मोहन मालवीय, टी.बी.सप्रू, आर.जयकर, देवदास गांधी यांसारख्या तब्बल ४१ पुढाऱ्यांनी या कराराला मान्यता देऊन स्वाक्षऱ्या केल्या आहेत.

३) भारतावर ज्यांची हुकूमत होती अशा इंग्रजांनी या कराराला मान्यता दिली आहे.

४) इंग्लंडमध्ये पुणेकरारा संदर्भातील दस्ताऐवज आजही जतन करून ठेवला आहे.

५) म.गांधी व डॉ. आंबेडकर या दोघांनी आपापल्या परस्पर विरोधी भूमिकांचे सप्रमाण विश्लेषण केले आहे.

६) म. गांधीजींच्या भूमिकेचे समर्थन करावे यासाठी डॉ. बाबासाहेबांवर दबाव असल्याचे जाणवले.

७) मुख्य प्रधानांच्या मावशीच्या प्रेतयात्रेस न जाता मॅक्डोनॉल्ड साहेबांनी तब्बल दोन दिवस मंत्रिमंडळाबरोबर या करारासंदर्भात चर्चा केली आहे.

८) पुणे करार घडण्यासाठी म. गांधीजींना आठ दिवस उपवास करावा लागला आहे.

६.६. अ २ निष्कर्ष

जातीय निवाडयात[४५] घोषित केलेल्या ''स्वतंत्र मतदारसंघास'' विरोध करण्यासाठी गांधीजींनी सुरू केलेल्या उपोषणाच्या पाचव्या दिवशी डॉ. आंबेडकर व म.गांधीजी यांच्या संमतीने तयार झालेल्या प्रस्तावावर मंत्रिमंडळात दोन दिवस चर्चा करून मंजूरी मिळाली. ही भारतीय इतिहासातील एक अविस्मरणीय व अत्यंत महत्त्वाची घटना आहे. ज्यासाठी एकीकडे म.गांधीजी तर दुसरीकडे डॉ. आंबेडकर या दोघांनी आपले प्राण पणास लावले होते.

इतिहासात अशाच अलौकिक व असामान्य घटनांची नोंद होत असते. म्हणूनच ''पुणेकरार'' ही एक ऐतिहासिक घटना आहे.

या आधारे असा निष्कर्ष काढता येतो की प्रस्तुत संशोधकाचे गृहीतक अः ''पुणेकरार'' ही एक ऐतिहासिक घटना आहे. हे पडताळणी अंती सत्य ठरले आहे.

६.६ ब. गृहीतक : भारतीय राजकारणावर या घटनेचा गंभीर परिणाम झाला आहे.

६.६. ब.१ : गृहीतकाच्या संदर्भात संशोधना अंती खालील तथ्ये समोर आलीत.

१. कम्युनल अॅवॉर्डची घोषणा म्हणजे अस्पृश्यांच्या राजकीय हक्काला मान्यता होय.
२. भारतीय राजकारणात कम्युनल अॅवॉर्डच्या माध्यमातून अस्पृश्य समाजाचे स्वतंत्र स्थान निर्माण झाले.
३. अस्पृश्य समाजाच्या विकासासाठी निर्णय घेण्याचे अधिकार अस्पृश्यांच्या प्रतिनिधींकडे एकवटले गेले.
४. पुणे करारामुळे अस्पृश्यांसाठी स्वतंत्र मतदारसंघ र्‍द झाला.
५. अस्पृश्यांना स्वतंत्र मतदारसंघा ऐवजी संयुक्त मतदारसंघ मिळाला.
६. कायदे कौंसिलात अस्पृश्यांच्या कमीत कमी १ व जास्तीत जास्त ४० जागांची वाढ झाली.

४५ डॉ.बाबासाहेब आंबेडकर लेखन आणि भाषणे, खंड १८ भाग १, प्रकाशक डॉ.बाबासाहेब आंबेडकर चरित्र साधने प्रकाशक समिती महाराष्ट्र शासन, दि.१५.१०.२००२ पृ.क्र. ३२५.

७. अस्पृश्य उमेदवाराला निवडून येण्यासाठी अस्पृश्यांच्या मतांबरोबरच स्पृश्य समाजाच्या मतांवर अवलंबून राहण्याची वेळ आली.

८. त्यामुळे उमेदवाराला अस्पृश्यांपेक्षा स्पृश्य समाजबांधवांची मर्जी संपादन करणे गरजेचे वाटले.

९. अस्पृश्यांच्या समस्यांसाठी, प्रश्नांसाठी त्यांच्या न्याय मागण्यांसाठी आवाज उठविणाऱ्या प्रतिनिधी पेक्षा स्पृश्यांची मर्जी राखणाऱ्या बेगडी प्रतिनिधींची निर्मिती पुणे करारामुळे झाल्याचे आढळते.

१०. पुणे करारामुळे अस्पृश्य व्यक्तिला राजकारणात प्रवेश करण्याची संधी मिळाली.

६.६. ब. २ निष्कर्ष

इंग्रजांनी घोषीत केलेल्या कम्युनल अॅवॉर्ड द्वारे अस्पृश्यांना स्वतंत्र मतदारासंघ व दोन वेळेस[४६]मत देण्याचा अधिकार प्राप्त झाला होता. परंतु पुणे कराराद्वारे स्वतंत्र मतदारसंघ व दोन वेळेस मत देण्याचा अधिकार नष्ट झाला. त्यामुळे अपृश्य उमेदवारांना निवडून येण्यासाठी अस्पृश्य तसेच स्पृश्य या सर्वांच्या मतांची गरज निर्माण झाली. संख्येच्या आधारे विचार केला तर अस्पृश्यांची संख्या ही स्पृश्यांच्या संख्येपेक्षा बरीच कमी असल्यामुळे सर्वच्या सर्व अस्पृश्यांनी जरी एखादया उमेदवराला आपली मते दिली व स्पृश्य समाजातील एकही मत त्याला नाही मिळाले तर तो उमेदवार निवडून येण्याची शक्यता फारच कमी असेल. उलट अस्पृश्यांची मते न मिळता जास्तीत जास्त[४७] स्पृश्यबांधवांची मते त्या उमेदवाराला मिळत असतील तर तो निवडून येणे सहज शक्य आहे.

राजकारणातील या आकडेमोडीचा विचार केला असता अस्पृश्यांना भलेही पूर्वीपेक्षा जास्त जागा मिळाल्या असल्या तरी त्यातून अस्पृश्यांमधील खरेखुरे प्रतिनिधी निर्माण होण्याची शक्यता मात्र फारच कमी आहे[४८]. असा निष्कर्ष काढणे सोपे जाते.

म्हणूनच प्रस्तुत संशोधकाचे गृहीतक ब: भारतीय राजकारणावर या गोष्टीचा गंभीर परिणाम झाला आहे. हे गृहीतक पडताळणी अंती सत्य ठरले आहे.

६.६ .क गृहीतक : पुणे कराराचे मुळरूप व हेतू प्रतिनिधित्वाशी संबंधित होता.

---

४६ डॉ.बाबासाहेब आंबेडकर लेखन आणि भाषणे, खंड १८ भाग १, प्रकाशक डॉ.बाबासाहेब आंबेडकर चरित्र साधने प्रकाशक समिती महाराष्ट्र शासन, दि.१५.१०.२००२ पृ.क्र. १२५.

४७ डॉ.बाबासाहेब आंबेडकर लेखन आणि भाषणे, खंड १८ भाग १, प्रकाशक डॉ.बाबासाहेब आंबेडकर चरित्र साधने प्रकाशक समिती महाराष्ट्र शासन, दि.१५.१०.२००२ पृ.क्र. १२५.

४८ भि.रा.आंबेडकर, कॅाँग्रेस आणि गांधींनी अस्पृश्यांसाठी काय केले, प्रकाशक - क्षितीज पब्लिकेशन, पृ.क्र. ११० ते ११२.

६.६.क.१ गृहीतकाच्या संदर्भात संशोधनाअंती खालील तथ्ये समोर आलीत.

१. २० ऑगस्ट १९१७ साली मॉटेंग्यू सुधारणा घोषणा झाल्या.

२. १९१८ साली साऊथ बरो कमिशन भरतात आले.

३. १९१९ साली फस्ट इंडिया ॲक्ट तयार झाला.

४. १९२८ साली सायमन कमिशन भारतात आले.

५. १८८५ ला स्थापन झालेल्या कॉग्रेस पक्षाची मुख्य मागणी ''प्रतिनिधित्व हवे'' असे होती.

६. साऊथ बरो कमिशन व सायमन कमिशन भारतातील समस्त जनतेच्या दृष्टीने प्रतिनिधित्वाचा मूळ स्त्रोत आहे.

७. सायमन कमिशनवर हिंदी प्रतिनिधी नसल्या कारणाने गांधीजींनी या कमिशनला तीव्र विरोध केला.

८. २० नोव्हेंबर १९३० साली पहिली गोलमेज परिषद भरविण्यात आली.

९. ७/०९/१९३१ दुसरी गोलमेज परिषद भरविण्यात आली.

१०. १७ ऑगस्ट १९३२ रोजी 'जातीय निवाडा 'घोषित झाला.

११. अस्पृश्यांसाठी स्वतंत्र मतदारसंघ देण्यात आला.

१२. २४ सप्टेंबर १९३२ ''पूणे करार'' मान्य झाला.

१३. अस्पृश्यांना कायदे कौंसिलात जादा जागा प्राप्त झाल्या.

१४. पुणेकराराद्धारे अस्पृश्यांना प्रतिनिधित्व करण्यासाठी राखीव जागांची तरतूद करण्यात आली.

६.६. क. २ निष्कर्ष

भारत देशात इंग्रजांचा एकछत्री अंमल सुरू झाल्यानंतर त्यांनी काही सामाजिक सुधारणा करण्यासाठी मॉटेंग्यू सुधारणा घोषणा केल्या. त्याचा अभ्यास करून रिपोर्ट देण्यासाठी साऊथ बरो कमिशन भारतात आले. सन १९१९ चा फस्ट इंडिया ॲक्ट तयार झाल्यानंतर[४९] राज्य घटनेच्या कार्यपद्धतीची तपासणी करण्यासाठी सायमन कमिशन[५०] भारतात आले. परंतु प्रचंड विरोधानंतर पहिली व दुसरी गोलमेज परिषद पार पडली. त्यानंतर जातीय निवाडा घोषित होऊन अपृश्यानां स्वतंत्र मतदारसंघाद्धारे आले प्रतिनिधी निवडण्याची संधी प्राप्त झाली. या गोष्टीला गांधीजींनी प्रखर विरोध करून उपोषणाद्धारे आपले म्हणणे मान्य करून घेतले.

---

[४९] डॉ. बाबासाहेब आंबेडकर,दलितांचे राजकीय अस्तित्व संपुष्टात आणणारा पुणे करार प्रकाशक राजेश रघुवंशी राजेश प्रकाशन पुणे ३८. पा.नं. १.

[५०] डॉ. बाबासाहेब आंबेडकर,दलितांचे राजकीय अस्तित्व संपुष्टात आणणारा पुणे करार प्रकाशक राजेश रघुवंशी राजेश प्रकाशन पुणे ३८. पा.नं. १.

कम्युनल अॅवॉर्डच्या ऐवजी ''पुणे करार'' लागू झाल्यानंतर स्वतंत्र मतदारसंघ जाऊन संयुक्त मतदार संघाद्वारे जादा जागा मिळवून अस्पृश्यांना कायदे कौंसिलात प्रतिनिधित्व करण्याची संधी मिळाली. म्हणून गृहीतक कः पुणे कराराचे मूळरूप व हेतू प्रतिनिधीत्वाशी संबंधित होता. हे गृहीतक पडताळणी अंती सत्य ठरले आहे.

६.६.ड. गृहीतक - प्रसार माध्यमांनी या घटनेची गांभीर्याने दखल घेतली आहे.

६.६.ड.१ : गृहीतकाच्या संदर्भात संशोधनाअंती खालील तथ्ये समोर आलीत.

१. जातीय निवाडा घोषित झाल्याचे वृत्त वर्तमानपत्रात झळकले होते.
२. इंग्रजांच्या कुटील नीतीचा वर्तमानपत्रांनी समाचार घेतला.
३. मासिकांनी या घटनेची नोंद घेतली आहे.
४. अनेक लेखकांनी पुस्तकरूपाने या करारावर आपले मत व्यक्त केले आहे.

६.६.ड.२. निष्कर्ष

ब्राम्हण पत्रिका, अंक क्र. ७ मध्ये डॉ. आंबेडकरांची गोलमेज परिषदेतील भूमिका ही दुराग्रही होती असे मत व्यक्त केले आहे.

आनंद मासिकात गोलमेज परिषदेनंतर येणाऱ्या सुधारणा फारशा समाधानकारक नाहीत'' असे विचार व्यक्त केले आहेत.

ठाकूरदास बंग यांच्या गांधी विचार या पुस्तकात पुणेकरारा संदर्भात गांधीजींनी उपवास करून इंग्रजांच्या भेद नीतिचा समाचार घेतला असे नमूद केले.

उपवास सुरू असताना २०/०९/१९३२ रोजी गांधीजींनी वृत्तपत्रास जी मुलाखत दिली ती २१/०९/१९३२ च्या टाईम्स ऑफ इंडिया'' [५१] या वर्तमान पत्रात छापून झाली आहे.

म्हणून गृहीतक डः प्रसार माध्यमांनी या घटनेची गांभीर्याने दखल घेतली आहे. हे गृहीतक पडताळणी अंती सत्य ठरले आहे.

---

५१ म.गांधींचे संकलित वाङ्मय खंड ५१, पृष्ठ क्रमांक ११२ ते ११६ प्रकाशक, महाराष्ट्र शासन मुंबई

५२ – मासिक आनंद, सन – फेब्रुवारी १९३३

६.६.इ. - गृहीतक : पुणे कराराचे समर्थक व विरोधक दोन्ही प्रकारच्या मतांना प्रसार माध्यमांनी प्रसिद्धी दिली आहे.

६.६.इ.१ - गृहीतकाच्या संदर्भात संशोधनाअंती खालील तथ्ये समोर आलीत.

१. जास्तीत जास्त प्रसार माध्यमांनी कम्युनल ॲवॉर्डच्या विरोधात भूमिका मांडली आहे.
२. कम्युनल ॲवॉर्ड म्हणजे इंग्रजांच्या फोडा व झोडा नीतिचाच भाग असल्याचा प्रसार अधिक झाला.
३. पुणे करार झाल्यानंतर त्याच्या समर्थक विचारांना मोठया प्रमाणावर प्रसिद्ध केले गेले.
४. पुणे करारानंतर त्याच्या विरोधी मतांना अधिक मोठया प्रमाणात प्रसिद्धी दिल्याचे दिसून आले नाही.
५. प्रसार माध्यमांवर गांधीजींच्या करिष्म्याचा अधिक प्रभाव असावा असे जाणवते.

६.६.ई.२ निष्कर्ष

१७ ऑगस्ट १९३२ रोजी जाहीर झालेल्या कम्युनल ॲवॉर्डकडे विरोधी भूमिकेतूनच पाहिल्यामुळे अस्पृश्यांच्या प्राप्त झालेल्या अधिकाराकडे दुर्लक्ष झाले. कम्युनल ॲवॉर्डला गांधीजींनी विरोध केल्यामुळे कम्युनल ॲवॉर्ड म्हणजे भयंकर काहीतरी गोष्ट आहे [९२] व डॉ. आंबेडकर या गोष्टींचे समर्थन करतात म्हणजे निश्चितच देशहिताच्या दृष्टीने डॉ. आंबेडकर खलनायक आहेत ,असे समाजात चित्र निर्माण झाले.

म्हणून गृहीतक ई पुणे कराराचे समर्थक व विरोधक दोन्ही प्रकारच्या मतांना प्रसार माध्यमांनी प्रसिद्धी दिली आहे. हे गृहीतक पडताळणी अंती सत्य ठरले आहे.

## ६.७ संशोधनाची व्याप्ती आणि मर्यादा

'' पुणेकरार व तत्कालीन प्रसार माध्यमांची भूमिका'' या विषयावर संशोधन करताना 'पुणे कराराचे' समर्थक व विरोधक अशा दोन्ही प्रकारच्या लेखकांनी लिहिलेल्या पुस्तकांचा अभ्यास केला. म. गांधीजी व डॉ. बाबासाहेब यांच्या या संदर्भातील भूमिका अभ्यासण्याची संधी मिळाली . इंग्रज अधिकाऱ्यांबरोबर झालेला गांधीजींचा पत्रव्यवहार व बाबासाहेबांनी घेतलेली भूमिका यांचा तटस्थ भूमिकेतून अभ्यास केला. एम.फिल. अभ्यासक्रमाच्या दीड वर्षे मुदतीच्या मर्यादेमध्ये या सर्व बाबींचा अभ्यास करताना बऱ्याच मर्यादा आल्या.

या मर्यादांबरोबरच पुणे करारासंदर्भात तत्कालीन घटनांचा अभ्यास करणे शक्य झाले. तरीसुध्दा भविष्यकाळात पुणे करारासंदर्भात अधिक सखोल संशोधन व्हावे असे वाटते.

६.८ भविष्यकालीन संधी

भविष्यकालीन संशोधन संधी

'पुणे करार आणि तत्कालीन प्रसार माध्यमांनी घेतलेली दखल' या विषयावरील संशोधन करताना, पुणे करार कोणत्या परिस्थितीत,कोणत्या वेळेला व केव्हा घडला याचा अभ्यास करता आला.

पुणे करारा दरम्यान काँग्रेसकडून दिल्या गेलेल्या आश्वासनांची पूर्णपणे अंमलबजावणी झाली किंवा कसे? याचा सर्वांकष अभ्यास करण्याची गरज आहे. पुणे करारामुळे अस्पृश्य समाजातील प्रतिनिधीत्वावर संख्यात्मक व गुणात्मक काय परिणाम झाला याचा साकल्याने अभ्यास होणे गरजेचे वाटते.

भारतातील संसदीय लोकशाहीच्या सुदृढ विकासाच्या दृष्टीने अंतर्बाह्य प्रभावापासून मुक्त राहून जनतेच्या प्रतिनिधींनी निर्णय घेणे गरजेचे असताना, आज अस्पृश्य समाजाच्या आर्थिक,सामाजिक व राजकीय स्थितीच्या परिणामांचा अभ्यास होणे गरजेचे आहे.

वरील सर्व मुद्यांचा अभ्यास पी.एचडी.च्या संशोधन प्रकल्पामध्ये करण्याचा प्रस्तुत संशोधकाचा मानस आहे. पुणे करार आणि तत्कालीन प्रसार माध्यमांनी घेतलेली दखल हा प्रस्तुत संशोधन प्रबंध इतरही संशोधकांना उपयुक्त ठरेल अशी आशा आहे.

६.९ समारोप

आपल्या महाराष्ट्रामध्ये विशेष करून ग्रामीण भागात एक शब्दप्रयोग बऱ्याचवेळा ऐकावयास मिळतो तो म्हणजे ''भल्याने कोर्टाची पायरी चढू नये'' म्हणजे चांगल्या माणसांनी कोर्ट कचेऱ्यांच्या मागे लागू नये तो स्वत:साठी व कुटुंबासाठी त्रासदायक भाग आहे.

त्याच प्रमाणे ''राजकारण हे सज्जनांचे काम नाही'' ''चांगल्या माणसांनी राजकारणात पडू नये'' असे काही वाक्ये आपल्या कानावर पडत असतात.

या प्रकरणांचा अनुभव घेतलेल्या व्यक्तिच वरील विधानांच्या सत्यतेबाबत सांगू शकतात.

येथे या वाक्यांची आठवण होण्याचे कारण असे, १९३२ साली राजकारणाच्या या सारीपटावर बॅरिस्टर असलेल्या दोन प्रभावशाली नेत्यांनी अस्पृश्यांच्या प्रतिनिधित्वाच्या मुद्दयावर आपले प्राण पणास लावले होते. यांपैकी एक म.गांधीजी व दुसरे डॉ. बाबासाहेब आंबेडकर.

कम्युनल ॲवॉर्डच्या माध्यमतून अस्पृश्यांसाठी काही राजकीय अधिकार प्राप्त झाले. परंतु गांधीजींनी ''स्वतंत्र मतदारसंघ'' अपृश्यांसाठी व हिंदूसाठी हानीकारक आहे.[५३] म्हणून आमरण उपोषणास सुरुवात **केली**. सुवारुतीला म.गांधीजी निर्णयावर ठाम होते. परंतु उपोषणाच्या तिसऱ्या/चौथ्या दिवसापासून उभयतांमधील बऱ्याच विचार विनिमयानंतर दोन्ही पक्षांना मान्य होईल असा तोडगा निघून अस्पृश्यांना स्वतंत्र मतदारसंघाऐवजी राखीव जागा देण्याचे मान्य करण्यात आले. हाच तो पुणे करार.

हा करार बंधनकारक समजून स्पृश्य बांधवानी कृती करावी[५४] अशी डॉ. आंबेडकरांची इच्छा होती. परंतू पुढील काळात कॉंग्रेस कडून तसेच म. गांधीजींकडून त्या सर्व आश्वासनांची पूर्ती झाली नसावी या कारणाने ''अस्पृश्यांसाठी राखीव जागांकरिता निवडणूक लढवून कॉग्रेसने अस्पृश्यांच्या राजकारणाचा सत्यानाश करू नये''[५५] व ''पुणे करार स्वीकारल्यानंतर श्री. गांधी यांनी आपल्या शब्दाचा आदर का केला नाही? आणि कॉग्रेस हायकमांडला कॉंग्रेसच्या मंत्रिमंडळात अस्पृश्यांचा समावेश करण्याची सूचना का केली नाही![५६] अशा प्रकारची विधाने करून बाबासाहेबांनी ''पुणे कराराच्या'' कॉंग्रेसकडून होणाऱ्या अंमलबजावणी बाबत खेद व्यक्त केल्याचे जाणवते.

कम्युनल ॲवॉर्ड आणि त्याचे झालेले पुणे करारातील रूपांतर ही राजकीय सारीपटावर लढली गेलेली तत्त्वांची लढाई होती. पंरतु पुणे करारानंतरचा कालखंड पाहता राजकारण हे मतं मिळविणे, मिळालेल्या मतांच्या आधारे सत्ता हस्तगत करणे ,या कृतीक्रमामध्ये कदाचित तत्त्वांकडे, सिद्धांतांकडे सत्ताधाऱ्यांकडून दुर्लक्ष झाले असावे व पुणे करारादरम्यान दिलेल्या शब्दांचा विसर पडला असावा. त्यामुळे अपृश्यांमधील खऱ्या प्रतिनिधित्वाचा विकास न होता ,अस्पृश्य समाजातील व्यक्ती कॉग्रेसचे आश्रितझालेत की काय? अशी स्थिती निर्माण झाल्यासारखी वाटते. या शंकेला बळ येण्याचे कारण असे की अस्पृश्य कॉंग्रेसच्या उमेद्वाराला आपल्या मर्जीप्रमाणे मत देता येत नव्हते. आपल्याला जे वाटते ते बोलता येत नव्हते. मुक्या जनावरांप्रमाणे कोणीही हाकावे, अशी त्यांची स्थिती झाली होती. ते अस्पृश्य

---

५३.म. गांधी यांचे संकलित वाड.मय, खंड ५०, रॅमसे मॅकडोनॉल्ड यांना पत्र, पत्र क्र. ३९९ पृ.क्र. ४३७

५४. डॉ. बाबासाहेब आंबेउकरांची भाषणे, खंड १८, भाग १, पृ.क्र. ३६९

५५. डॉ. बाबासाहेब आंबेडकर कॉग्रेस आणि गांधीजींनी अस्पृश्यांप्रतिकाय केले? पृ.क्र. २५४ व २५५.

५६. डॉ. बाबासाहेब आंबेडकर कॉग्रेस आणि गांधीजींनी अस्पृश्यांप्रतिकाय केले? पृ.क्र. २५५.

समाजावर होणाऱ्या अन्यायाची ना दाद मागू शकत होते ना त्या अन्यायाचे परिमार्जन करू शकत होते.[५७] ही भयानक वस्तूस्थिती अत्यंत दु:खद अंत:करणे डॉ. आंबेडकरांनी मांडली आहे.

राजकारण हे समाजहिताला प्राधान्य देणारे असेल तरच निकोप लोकशाहीचा विकास होऊन देशाचे हित साधले जाण्याची शक्यता अधिक असते. परंतु यासाठी राजकारणात तत्त्वनिष्ठ माणसं असणं गरजेच आहे. हाती घेतलेले कार्य प्रचंड अडचणी निर्माण झाल्या तरी ,तडीस नेण्याची जिद्द असली पाहिजे. २४ सप्टेंबर पासून सलग आठ दिवस उपोषण केलेले असतानासुद्धा २७ सप्टेंबर रोजी गांधीजी मुं. रां. जयकर यांना तार करून अस्पृश्यतेचे संपूर्ण उच्चाटन होईपर्यंत आपण आपले प्रयत्न अखंड चालू ठेवाल[५८] ,अशी अपेक्षा व्यक्त करतात.

जातीय निवाडा (कम्युनल अॅवॉर्ड) आणि  पुणे करार प्रतिनिधित्वाशी निगडित बाबी आहेत. कोणत्याही लोकशाही राज्यव्यवस्था असलेल्या देशात सर्वच्या सर्व जनता संसदेत जाऊन कायदे करू शकत नाही. संसदेत आपल्या वेदना, आपल्या समस्या, आपले म्हणणे मांडण्यासाठी व आपल्या समस्या सोडविण्यासाठी प्रतिनिधी पाठवावे लागतात. हे प्रतिनिधी इमानदार व प्रामाणिक असणे गरजेचे आहे.

त्यासाठी बुद्धिमान, समजदार, प्रामाणिक व इमानदार व्यक्तिंनी म्हणजेच चांगल्या व सज्जन माणसांनी राजकीय क्षेत्रात प्रवेश करावा असे म्हणावेसे वाटते.

---

५७. डॉ. भिमराव रामजी आंबेडकर, कॉंग्रेस आणि गांधींनी अस्पृश्यांप्रती काय केले? पृ.क्र. १११ व ११२

५८. म.गांधी यांचे संकलित वाड.मय, खंड ५१, पत्र क्र. २२१, पृ.क्र. १४६

# संदर्भसूची

## अ) ग्रंथ

१. अत्रे प्र.के., दलितांचे बाबा, आप्पा परचुरे, परचुरे प्रकाशन मंदिर, २०३/४, मेहता भवन, ३११, राजा राम मोहन रॉय मार्ग, गिरगांव, मुंबई - ४०० ००४, पहिली आवृत्ती १९६०, सहावी आवृत्ती १९९५.

२. आंबेडकर भिमराव रामजी, कॉंग्रेस आणि गांधींनी अस्पृश्यांप्रती काय केले?, सरिता गायकवाड, क्षितिज पब्लिकेशन, दीक्षाभूमी संदेश, डॉ. आंबेडकर पूल, लष्करी बाग, नागपूर, १९४५.

३. आंबेडकर भिमराव रामजी, दलितांचे राजकीय अस्तित्व संपुष्टात आणणरा पुणे करार संपूर्ण इतिहास, साहित्य सुगंध प्रकाशन, ६३/३१/१, गजानन नगर लेन नंबर १, पिंपळे गुरव, पुणे २७, प्रथम आवृत्ती २६ जून २०१३.

४. आंबेडकर भिमराव रामजी, राज्य आणि अल्पसंख्यांक, प्रदिप रोडगे, लष्करी बाग डॉ. आंबेडकर कॉलनी, नागपूर ४४००१७, १९४७.

५. किर धनंजय, डॉ. बाबासाहेब आंबेडकर, रामदास भटकळ, पॉप्युलर प्रकाशन प्रा.लि., ३५ सी, पंडीत मालवीय मार्ग, ताडदेव, मुंबई ३५, प्रथम आवृत्ती १४ एप्रिल १९६६.

६. खैरमोडे चांगदेव भगवान, डॉ. भिमराव रामजी आंबेडकर खंड ४, उषा वाघ, सुगावा प्रकाशन, ५६२, सदाशिव पेठ चित्त शाळा इमारत, पूणे ४११०३०, पहिला आवृत्ती जानेवारी १९६८, तृतिय आवृत्ती जुलै २००३.

७. खैरमोडे चांगदेव भगवान, डॉ. भिमराव रामजी आंबेडकर खंड ५, उषा वाघ, सुगावा प्रकाशन, ५६२, सदाशिव पेठ चित्त शाळा इमारत, पूणे ४११०३०, पहिला आवृत्ती जानेवारी १९६८, तृतिय आवृत्ती ऑक्टोबर २००२.

८. गांधी मोहनदास करमचंद, हिंद स्वराज्य, भांड साकेत बाबा, साकेत प्रकाशन प्रा.लि., ११५, म.गांधीनगर, स्टेशन रोड, औरंगाबाद – ४३१००५, पहिली आवृत्ती २०११

९. चपळगांवकर नरेंद्र, महात्मा गांधी आणि भारतीय राज्य घटना, माजगांवकर दिलीप, राजहंस प्रकाशन प्रा.लि., १०२५, सदाशिवपेठ पूणे ४११०३०, पहिली आवृत्ती मार्च २०13.

१० ताटके अरविंद, महात्मा गांधी, मंदाकिनी भावे, सरीता प्रकाशन, ३९७/१, सेनापती बापट मार्ग, पूणे ४११०१६, २ ऑक्टोबर १९९४.

११ धर्माधिकारी भाऊ, गांधी विचार दर्शन, (स्वराज्य सत्याग्रह, खंड १५) देवगिरीकर त्र्यं.र., अध्यक्ष गांधी वाङःमय प्रकाशन समिती, महाराष्ट्र, १२४२, सदाशिव विद्यापिठवाडा, पूणे -२, प्रथम आवृत्ती ३० जानेवारी १९६३.

१२ बंग ठाकूरदास, गांधी विचार, परधाम प्रकाशन, नवी दिल्ली १९९१.

१३ महाराष्ट्र शासन, म.गांधी यांचे संकलित वाङःमय, कार्यकारी संपादक सचिव, दार्शनिक विभाग, मुंबई, खंड ५०,५१,५२, १९६०.

१४ महाराष्ट्र शासन, डॉ. आंबेडकर यांची भाषणे, खंड १८, आंबेडकर चरित्र साधने प्रकाशन समिती, मुंबई, १५ ऑगस्ट २००२.

१५ मोरे शेषराव, डॉ. आंबेडकरांचे सामाजिक धोरण : एक अभ्यास, माजगावकर दिलीप, राजहंस प्रकाशन प्रा.लि., १०२५, सदाशिवपेठ पूणे ४११०३०,जून १९९८.

१६ मोरे सदांनद, लोकमान्य ते महात्मा, माजगावकर दिलीप, राजहंस प्रकाशन, १०२५, सदाशिवपेठ, पूणे ४११ ०३०. पहिली आवृत्ती : २६ जानेवारी २००७.

१७ लेले रा.के., मराठी वृत्तपत्रांचा इतिहास, कुलकणी अनिरूद्ध अनंत, कॉंटिनेन्टल प्रकाशन, विजयानगर, पूणे ४११०३०, प्रथम आवृत्ती १९८४, तृतिय आवृत्ती २००९.

## ब) मासिके (लेख)

१. अमोनकर दि.वि., "महात्माजींच्या दौऱ्यात", **आत्मोन्नति**, नाडकर्णी भालचंद्र विष्णू, आत्मोन्नति, ऑफीस ६, केळेवाडी, गिरगांव, मुंबई -४ मे १९३४, अंक ८ वा पृ.क्र.२७

२. जवळकर दिनकरराव, "लोकशाही आणि मतदारसंघ", **नवजीवन**, मोरे नारायण रामचंद्र, मुद्रणस्थळ - कामत प्रिंटींग प्रेस, गोवर्धन इमारत, पारेख स्ट्रीट, मुंबई -४ जून १९३२, पृ.क्र.७७

३. तळवळकर गोपिनाथ गणेश, "नव्या राज्यघटनेची पूर्व तयारी", **आनंद (पूरवणी)**, गोपाळ बळवंत जोशी, आनंद छापखाना, सदाशिवपेठ, पूणे फेब्रुवारी १९३३, पृ.क्र.१७

४. नाईक वसंत नारायण, "कम्युनल अॅवॉर्ड", **नवजीवन**, मोरे नारायण रामचंद्र, मुद्रणस्थळ- कामत प्रिंटींग प्रेस, गोवर्धन इमारत, पारेख स्ट्रीट, मुंबई -४, सप्टेंबर १९३२, पृ.क्र.५९

५. परळकर ल.वि., "महात्मा गांधी आणि जीजस ख्राइस्ट", **नवजीवन**, मोरे नारायण रामचंद्र मुद्रणस्थळ - कामत प्रिंटींग प्रेस, गोवर्धन इमारत, पारेख स्ट्रीट, मुंबई -४, जानेवारी १९३२, पृ.क्र.२०

६. पाठक श्रीनिवास बाबाजी, "जागतिक घडामोडी (कायदे मंडळालीत नवीन सरकारी ठराव)", **निर्झर**, पाठक श्रीनिवास बाबाजी, पी.नाथ आणि कंपनी, गोवर्धन भुवन खातेवाडी, ११ पथ, मुंबई -४, १९७७, अं.क्र.७, पृ.क्र.६

७. मुंडले वा.दा., "अस्पृश्यांचा प्रश्न", **ब्राम्हण**, आठले विष्णू सिताराम, छपाई प्रभाकर छापखाना, राधाश्रम ब्राम्हण कचेरीतून प्रकाशित १९३१, अंक -७,पृ.क्र.१२

८. मोरे नारायण रामचंद्र, "मंत्र आणि जाणवे यांचे ढोंग नको", **नवजीवन**, मोरे नारायण रामचंद्र, मुद्रणस्थळ : कामत प्रिंटींग प्रेस, गोवर्धन इमारत, पारेख स्ट्रीट, मुंबई -४ जुलै १९३२, पृ.क्र.७९

# परिशिष्टये

| क्र. | तपशील |
|---|---|
| १. | जातीय निवाडयावर म.गांधी व महादेव भाई देसाई यांची चर्चा |
| २. | सफिया झगलूल पाशा यांचा संदेश |
| ३. | वल्लभभाई पटेलांशी गांधीजींची चर्चा |
| ४. | उपोषणा संदर्भात गांधीजींनी वृत्तपत्रांकडे पाठविलेले निवेदन |
| ५. | पुण्याच्या सनातनी मंडळींशी गांधीजींची चर्चा |
| ६. | डॉ.आंबेडकरांना धमकीचे पत्र |
| ७. | म.गांधीजी व डॉ.आंबेडकर चर्चा |
| ८. | पुणे करार बंधनकारक समजून अस्पृश्य बंधुनी कृती करावी. |
| ९. | पुणे कराराचे तोटे |

# परिशिष्ट क्र.१

## जातीय निवाडयावर म.गांधीजी व महादेव भाई देसाई यांची चर्चा -

**१७ ऑगस्ट १९३२**

जातीय निवाडा आज प्रकाशित झाला. बापू संध्याकाळपर्यंत आपले कामकाज अशा रितीने करत होते की, काही झालेच नव्हते.... मी [५९] म्हटले की, ही नवी घटना मॉटेगू-चेम्स-फोर्ड सुधारणांपेक्षाही वाईट आहे. बापू म्हणाले, ''यात काहीच शंका नाही. त्या सुधारणा लखनऊ कॉंग्रेस आणि मुस्लिम लीग यांच्यामधील समझोत्यावर आधारित होत्या. पण ही घटना तर देशांमध्ये अशी फूट पाडण्याचा डाव आहे की, त्यामुळे देश आपल्या पायावर कधी उभाच राहू शकू नये.'' संध्याकाळच्या प्रार्थनेच्या पूर्वी ते मला म्हणाले ''बरं, तू आणि सरदार (वल्लभभाई) प्राप्त परिस्थितीवर विचार करा आणि तुम्हाला जे सांगायचे असेल ते नि:संकोचपणे मला सांगा. सॅम्युअल होअर यांना मी जे पत्र लिहीले आहे. त्यात आजच्या परिस्थतीशी तोंड देण्यासाठी मला जी पावले उचलली पाहिजेत असे वाटते त्यासंबंधी सविस्तर कळविले आहे म्हणून मला ब्रिटिश सरकारला जाहीर सूचना द्यावी लागेल''....... आणि पून: रात्री बापू मॅक्डोनॉल्ड यांना पत्र लिहायला बसले.

१८ ऑगस्ट १९३२

बापूनी सकाळी पत्र लिहीणे समाप्त केले आणि म्हणाले, ''तू कांतण्याचे सोडून हे पत्र वाचून काढ, म्हणजे ते लागलीच पाठविता येईल.'' सरदारांनी आणि मी जे वाचले. तेव्हा ते (सरदार) म्हणाले, ''यांत (जातीय) निवाडयांतील इतर बाबींचा तर कांही उल्लेखहि नाही. याचा अर्थ काही असा न मानला जावा की, बाकी सर्व गोष्टी तुम्हाला मान्य आहेत''. बापूंनी उत्तर दिले. ''नाही, माझे विचार सर्वांना माहीतच आहेत. तरीहि, जर तुम्हाला वाटत असेल तर एक परिच्छेद त्यात घालतो, अर्थात त्यामुळे मला युक्तिवादात पडावे लागेल. मी या पत्रात कोणत्याही प्रकारची चर्चा करु इच्छित नाही. कारण वादाचे मुद्दे मी सॅम्युअल होअर यांना लिहीलेल्या पत्रात दिलेलेच आहेत.'' मी म्हटले की, बापूनी एवढेच लिहावे की, त्यांचा आत्मा या सर्व निवाडयाच्या विरुध्द बंड करुन उठत आहे. पण त्यातला काही भाग असा आहे की, तो रद्द करवून घेण्यासाठी ते आपल्या प्राणाचीहि पर्वा करणार नाहीत. बापू म्हणाले, ''नाही, अशी तुलना करणे बरोबर होणार नाही. असे

५९''मी'' म्हणजे महादेव भाई देसाई. संदर्भ - म.गांधी यांचे संकलीत वाड.मय, खंड ५०,पृ.५३४ वरील उल्लेख.

केले तर ते असेच म्हणतील की, माझा उद्देश सर्वच निवाडा रद्द करवून घेण्याचा आहे. आणि त्यातील काही भागाचा मला बहाणा करायचा आहे.

हे खरे आहे की, मला सर्वच निवाडा रद्द करवून घ्यायचा आहे. पण रात्री एक क्षणभर मी या प्रश्नावर विचार केला की दुसरे मुद्देसुध्दा सामिल करावेत किंवा नाहीत, आणि ठरविले की, ते सामिल करु नयेत''.

संध्याकाळी पुन: याच विषयावर चर्चा झाली. बापू म्हणाले, ''दुसरे मुद्दे मी यात सामिल करु शकतच नाही कारण तसे करणे म्हणजे धर्मकारणात राजकारण घुसडण्यासारखे होईल. वस्तुत: हे दोन्ही प्रश्न एकमेकांपासून भिन्न आहेत.'' पुन: हे म्हणाले ''मी साऱ्या गोष्टी माझ्या मनांत एक वेळा पुन: घोळल्या आहेत. जे काही तू सूचवितो आहेत त्या सर्व गोष्टींबाबत मी हा निश्चय करण्यापूर्वी विचार केला होता. मुसलमानांना आणि दुसऱ्या लोकांना स्वतंत्र मतदानसंघ देणे हे भयानकच आहे. ते लोक इंग्रजांना मिळतील आणि सगळे मिळून हिंदूना दडपून टाकतील. पण या प्रकारच्या युतीला कशारीतीने तोंड द्यायचे त्यांच्या पध्दतीचा मी विचार करु शकतो. आमच्यात आपसात झगडे करायला लावणारे बाहेरचे लोक एकदा निघून गेले म्हणजे त्यानंतर आम्ही आपसातील झगडयाच्या प्रश्नांची यशस्वीरीत्या उकल करु शकू. पण या तथाकथित अस्पृश्यांच्या प्रश्नांबाबत, माझ्यापाशी दुसरा कोणंताहि उपाय नाही. त्या बिचाऱ्यांना मी या सर्व गोष्टी कशा समजावून सांगू शकेल? दुदैव एखाद्याचा पाठलाग करते तेव्हा स्वत:वर आणखी दु:ख ओढवुन घेते ही काही नवलाईची गोष्ट नाही. सुधन्वाने कशी उकळत्या तेलाच्या कढईत उडी घेतली आणि प्रल्हादाने विस्तवासारख्या तापलेल्या लोखंडी स्तंभाला कसे आलिंगल दिले? स्वराज्यप्राप्ती नंतरहि कित्येक सत्याग्रह - आंदालने होतील. किती तरी वेळा माझ्या मनांत येऊन गेले आहे की, स्वराज्य-स्थापनेनंतर मला कलकत्त्याला जाऊन धर्माच्या नांवावर होणारे पशु-बलि बंद करायला हवेत. कालीघाट येथील बकऱ्यांची अस्पृश्यांच्यापेक्षाहि वाईट स्थिति आहे. ते माणसांवर शिंगानीहि हल्ला करु शकत नाहीत. त्यांच्यात कोणी आंबेडकर कधीहि उत्पन्न होणार नाही. या हिंसेकडे ध्यान गेले म्हणजे माझे रक्त उसळून उठते. लोक बकऱ्याच्याऐवजी वाघांना बळि कां देत नाहीत?''

सकाळी आम्ही बापूंच्या या उपायाबाबत होणाऱ्या संभाव्य प्रतिक्रियासंबंधी विचार केला. मी म्हटले, ''याचा अनेकप्रकारे चुकीचा अर्थ लावला जाईल. येथे भारतात याचे अनर्थकारक अन्धानुकरण केले जाईल आणि अमेरिकेत म्हटले जाईल की, गांधीने उपवास करुन सुटका करुन घेतली.'' बापू म्हणाले ''मला माहीत आहे. अमेरिकेत तर कसलीहि गोष्ट लोकांच्या गळी उतरते, आणि गळी उतरायला मदत करण्यासाठी ब्रिटिश हस्तक तर हटकून तयार असतातच. पुष्कळसे लोक तर असेहि म्हणतील की मी आता दिवाळे काढले आहे. आणि माझ्या आध्यात्मिकतेचा कांही फायदा मिळत नाही म्हणूनच मी घूर्त दिवाळखोराप्रमाणे आत्महत्या केली आणि येथे या देशांत

अंधानुकरण आणि अर्थाचा अनर्थ केला जाईल.  सरकार मला सोडून देण्याचीहि शक्यता आहे आणि तुरुंगाच्या बाहेर मला मरुं देईल, किंवा असे मॅक्स्वीनीच्या बाबतीत घडले, तसे कदाचित मला तुरुंगामध्येहि मरु देईल. आमचे लोक पण टीका करतील.  जवाहरलालना हे कृत्य जरा सुध्दा पसंत पडणार नाही, ते म्हणतील, ‘असले हे धर्मकारण आता पुष्कळ झाले,’ पण त्याची काही परवा नाही. जर मी आपल्या आध्यात्मिक अस्त्रागारांतील अत्यंत शक्तिशाली अशा अस्त्रांचा प्रयोग करायला निघालो आहे तर त्याचा चुकीचा अर्थ होईल या भयाने किंवा असल्याच काही कारणांनी हा प्रयोग थांबविला जाऊ शकणार नाही’’.

---

*संदर्भ - म.गांधी यांचे संकलित वाड्मय खंड ५०, पृ.५२९ ते ५३१.*

# परिशिष्ट क्र.१

## सफिया झगलूल पाशा यांचा संदेश -

**२४ सप्टेंबर १९३२**

सफिया झगलूल पाशा या इंजिप्तचे राष्ट्रवादी पुढारी झघलूल पाशा यांच्या विधवा पत्नी होत. गांधीजीनी उपोषण सुरु केल्याचे ऐकुन त्यांनी दिनांक २३ सप्टेंबर रोजी खालीलप्रमाणे केबल धाडली होती; इंजिप्तमधील जनता, पुरुष आणि स्त्रियां, हिंदुस्थान आणि त्याचे थोर पुढारी महात्मा गांधी यांनी स्वातंत्रप्राप्तीसाठी जो वीरश्रीयुक्त लढा चालवला आहे त्यातील घटनांकडे बंधुभावाच्या सहानुभूतीने बघत आहे. आणि आता हिंदुस्थान देशाच्या ऐक्यासाठी आणि स्वातंत्रासाठी महात्मा गांधी आत्मार्पणाची उदात्त कृती करीत आहेत त्याकडे इजिप्तमधील जनता धडधडत्या अंत:करणाने पहात आहे. इजिप्तमधील ख्रिस्ती लोक तसेच मुसलमान, कॉप्ट व ईजिप्तवासी अशा सर्व धर्माच्या व पथांच्या जाती जमाती यांच्यात पवित्र ऐक्यांची भावना निर्माण व्हावी म्हणून मी माझ्या स्वर्गवासी पतीबरोबर कार्य करण्याचा आनंद उपभोगला आहे. ते सर्व आठवून मी अशी मन:पूर्वक आशा व्यक्त करते की, गांधीच्या आत्मत्यागाच्या उदात्त कृतीपासून स्फूर्ती घेऊन हिंदी लोक हिंदी स्वातंत्र अबाधित रहावे म्हणून बंधुभाव व देशभक्ती या भावनांनी एकत्र येऊन एका विराट समाजपुरुषांचे रुप धारण करतील व ज्यांचे आयुष्य आणि जीवनकार्य सर्व पौर्वात्यांना व आम मानवतेला जणू पितृप्राप्त धनासमान झाले आहे अशा आपल्या देशाच्या थोर सुपुत्राचे प्राण वाचवतील अशीही आशा मी व्यक्त करते.’’

---

*संदर्भ - म.गांधी यांचे संकलित वाड्.मय, खंड ५१, पृ.१३१.*

## परिशिष्ट क्र.३

### वल्लभभाई पटेलांशी गांधीजीची चर्चा -

६ सप्टेंबर १९३२

**गांधीजी** : सकाळी तुम्ही मस्करी करीत होता, पण तुम्हाला जर खरोखर काही प्रश्न विचारायचे असतील तर, ते विचारा.

**वल्लभ भाई पटेल** : हे लोक काय करतील असे तुम्हाला वाटते?

**गांधीजी** : अजूनही मला वाटते की ते मला १९ रोजी किंवा त्यापुर्वी सोडून देतील. जर त्यांनी मला उपोषण करु दिले व त्यासंबंधी कोणालाही कळू दिले नाही आणि नंतर कैदी म्हणून मी जे करायला नको होते ते मी केले व त्याबाबतीत आपण काहीच करु नाही शकू, तर ती त्यांच्या बाबतीत दृष्टपणाची हद्द ठरेल. ते तेवढे करणार नाहीत असे मी म्हणत नाही, फक्त त्यांना तसे करण्याची गरज असणार नाही आणि आवश्यक असेल त्यापेक्षा अधिक काही करणारे ते लोक खचितच नाहीत.

**वल्लभभाई पटेल** : तर मग तुम्ही काय कराल?

**गांधीजी** : २० तारखेला उपोषण सुरु होत नाही. आपण २० तारखेला चिटकून राहू शकत नाही.

**वल्लभभाई पटेल** : नविन घटना तयार होई पर्यंत आपणांस वेळ आहे असा याचा अर्थ होणार नाही काय? अथवा सरकारला व जनतेला तुम्ही अधिक मुदतीची नोटीस देवू शकता?

**गांधीजी** : होय, मी मुक्त झाल्यावर लोक मला किती काम करु देतात त्यावर ते अवलंबून आहे. परिस्थिती कशी असेल ते मी सांगू शकत नाही. मला कोणत्या प्रकारचे पत्र लिहावे लागेल याबद्दल काहीच कल्पना नाही. परंतू मला हिंदू समाज, अपृश्य समाज, सरकार व मुसलमान या सर्व पक्षांचे म्हणणे विचारात घ्यावे लागेल. हिंदूनी गावोगाव अपृश्यांसह सभा घेवून ही गोष्ट नाकारली पाहिजे. ख्रिश्चन सरकार म्हणून सरकारने हि गोष्ट केली आहे आणि म्हणून सरकार व ख्रिस्ती समाज या लोकांना मला एकच गोष्ट सांगावी लागेल. ख्रिश्चन म्हणून तुम्ही ती गोष्ट करु शकत नाही. आमचे स्वराज्य अस्तित्वात येवू दया, नंतर त्यांना पाहिजे त्या रीतीने प्रभाव पाडता येईल, परंतू त्यांनी आज आम्हाला विभागू नये. इंग्लडमध्ये देखील मी मुसलमानांना हीच गोष्ट सांगितली होती. येथे देखील मी तेच सांगेन. मी हिंदू समाजाला सांगिन की, आता हरिजनांना दोनच पर्याय खुले आहेत. मुसलमान होणे अथवा ख्रिश्चन होणे हे ते दोन पर्याय होतं.

**वल्लभभाई पटेल** : परंतू तुमचे म्हणणे ऐकून घेतील असे मुसलमान आहेत कुठे?

**गांधीजी** : कोणीही नसले तरी काही हरकत नाही, परंतू ते लोक देखील जागे होतील अशी आपण आशा करुयां. सत्याग्रहाचे मुळ मानवी स्वभावावरील विश्वासात आहे. अगदी निष्ठूरातील निष्ठूर

मनुष्याचे देखील मन वितळविता येईल या विश्वासात आहे. म्हणून असेही मुसलमान खचितच असतील की जर गोष्टी त्या थराला गेल्या तर आपल्याला सहन करणे शक्य होणार नाही असे म्हणतील. हे सर्व साध्य करण्यासाठी मला काही लोकांना बोलवून घ्यावे लागेल. त्यासर्वांना येथे येण्यास परवानगी मिळेल किंवा नाही ते मला माहित नाही. परंतू ते माझा अपमान देखील करतील. ते म्हणतील की, माझ्या मृत्यूची जबाबदारी त्यांना घ्यायची नाही म्हणून त्यांनी मला सोडून दिले आहे. तथापि, मी जर सविनय कायदेभंगाची चळवळ सुरु केली तर, त्यांना मला पुन्हा तुरुंगात टाकावे लागेल.

**महादेव देसाई :** जे लोक **येतील** त्यांना **ख्रिश्चन** मित्र देखील असतील व ते तुम्हाला म्हणतील की, सरकारला दोष देण्याआधी तुम्ही स्वत:ला दोष दिला पाहिजे. हिंदू समाज अंत्यजांना अस्पृश्य म्हणून का मानतो?

**गांधीजी** : त्या गोष्टीचा खुलासा करण्याचे काम माझ्याकडे लागले. ती काही मोठी कठीण गोष्ट नाही. आपण त्यांना सांगू शकतो : ''आमचे प्रश्न आम्हाला मिटवू दया, तुम्ही ढवळाढवळ का करता? आम्ही एकदा आमचा कारभार पाहू लागलो की, लागलं ते करा. तुम्ही आमच्यात तोडफोड का करता आणि नंतर वस्तुस्थिती संबंधी चर्चा करता? आज अंत्यजांपूढे मुसलमानांकडे जाणे अथवा तुमच्याकडे जाणे असे दोनचं पर्याय खुले आहेत. स्त्रियांचा प्रश्न देखील अंत्यजांच्या प्रश्नासारखाच आहे. परंतू स्त्रिया काही अस्पृश्य **समजल्या** जांत नाहीत. त्यांची जरी अस्पृश्य होण्याची इच्छा असली तरी, पुरुष त्यांच्याकडे जातील व बिछान्यावर बसतील, स्वतंत्र मतदार संघ **मिळवून** देखील त्यांना अलग करता येणार नाही. आज अंत्यजाना कायमचे अलग करण्यात आले आहे. त्याचा परिणाम काय होईल? आपसांत, भांडण तंटे होतील..... यांच्यासारखे लोक आहेत. ते आपल्या समाजातील वाईट लोक जमवतील व त्यांना हिंदूवर हल्ले करायला सांगतील, विहीरीचे पाणी विषारी करतील व इतरही अनेक गोष्टी करतील.

तुमच्यापैकी जे कोणी येथे राहीले आहेत त्यांचे कर्तव्य हेच की, त्यांनी कॅम्प जेल मधील प्रत्येकाला सांगायचे की, उपोषणाला पूर्णपणे मनाई करण्यात आलेली आहे. आणि प्रत्येकानी शांत राहिले पाहिजे.

---

*संदर्भ - म.गांधी यांचे संकलित वाड्.मय, खंड ५१, पृ.४५१ व ४५२.*

## परिशिष्ट क्र.४

**उपोषणा संदर्भात गांधीजीनी वृत्तपत्रांकडे पाठविलेले निवेदन -**

१६ सप्टेंबर १९३२

मी लवकरच करणार असलेले उपोषण हे ईश्वराच्या नावाने व त्याचे कार्य म्हणून करण्याचे ठरविले आहे आणि त्याच्याच प्रेरणेने करीत आहे असे मी अत्यंत नम्रतेने मानतो. जनतेला संघटीत होण्याची संधी मिळावी म्हणून उपोषणाची तारीख पुढे ढकलावी अशी माझ्या मित्रांनी मला गळ घातली आहे. पंतप्रधानांना लिहीलेल्या पत्रात नमुद केलेल्या कारणांव्यतिरिक्त इतर कोणत्याही कारणांसाठी उपोषणाची वेळ देखील मी बदलू शकत नाही. माझे आगामी उपोषण ज्यांची माझ्यावर श्रध्दा आहे असे भारतीय किंवा परकीय यांचे विरुध्द आहे. तसेच ज्यांची माझ्यावर श्रध्दा नाही अश्यांच्याही विरुध्द आहे. परंतु इंग्रजी अधिकारी वर्गाविरुध्द नाही. जर अधिकारी वर्गाकडून होणाऱ्या विरोधी प्रचाराची पर्वा न करता ज्यांची माझ्यावर व मी ज्या कार्यास वाहून घेतले आहे त्या कार्यावर श्रध्दा आहे. अश्या इंग्रज स्त्री- पुरुषांच्या विरुध्द आहे. तसेच माझ्यावर श्रध्दा नसलेल्या माझ्या देशबांधवाच्या, **हिंदू** किंवा इतर यांच्या विरुध्द नाही. मी न्याय्य कार्याचे प्रतिनिधित्व करीत आहे अशी त्यांची भावना आहे अशा असंख्य भारतीयांच्या (मग ते कोणत्याही पंथाचे असोत) विरुध्द आहे. प्रामुख्याने एकंदरीत हिंदूच्या सद्सदविवेक बुध्दीला योग्य धार्मिक कृती करण्यास उद्युक्त करणे हा त्याचा हेतु आहे.

नियोजित उपोषण हे केवळ भावनेला आवाहन नाही. या उपोषणाद्वारे मला माझे सर्व वजन (जे काही असेल ते) शुध्द व सरळ न्यायाच्या पारडयात घालावयाचे आहे. म्हणून माझे प्राण वाचविण्यासाठी अयोग्य घाई किंवा फाजील काळजी करण्याची आवश्यकता नाही.**त्याच्या** इच्छेशिवाय पानही हलत नाही या म्हणीच्या सत्यतेवर माझी नितांत श्रध्दा आहे. माझ्याकडून अधिक सेवा करुन घेण्यासाठी त्याला माझी गरज असेल तर तो माझे प्राण वाचवेल. त्याचे इच्छेविरुध्द कोणीही माझे प्राण वाचवू शकणार नाही. मानवतेच्या दृष्टीकोनातून बोलावयाचे झाल्यास माझे शरीर उपोषनाचा ताण काही काळ सहन करील अशी माझी श्रध्दा आहे.

स्वतंत्र मतदार संघ हा केवळ अखेरचे निमित्त आहे. सवर्ण हिंदू पुढारी व प्रतिस्पर्धी हरिजन पुढारी यांचेमध्ये कसा तरी घडवून आणलेला करार हा हेतुपूर्ती करु शकणार नाही. कायदेशिर करार हा खराखुरा असावा लागतो. जर सर्व हिंदू समाजाची संपूर्ण अस्पृश्यता निवारण करण्याची मानसिक तयारी नसेल तर त्याने किंचितही विचार न करता खुशाल माझा बळी द्यावा. संयुक्त मतदार संघास ज्यांचा विरोध आहे त्याचेवर दडपण आणले जाऊ नये. त्याचा कडवा विरोध मला

समजू शकतो. माझेवर अविश्वास दाखविण्याचा त्यांना संपूर्ण हक्क आहे. तथाकथित **अश्पृश्यांचा** अनन्वित छळ करणाऱ्यांना सवर्ण हिंदू अथवा वरिष्ठ वर्गाचे हिंदू असे चूकीचे मानले जाते त्यापैकी मी एक नाही काय? आश्चर्याची बाब म्हणजे एवढे होऊनही अस्पृश्य हिंदू समाजात राहिले आहेत.

पण जरी मी प्रस्तुत विरोधाचे समर्थन करु शकत असलो तरी विरोधकांची चूक होत आहे असे मला वाटते. शक्य असते तर त्यांनी हिंदू समाजापासून हरिजन वर्ग संपूर्ण अलग करुन त्यांचा निराळा वर्ग केला असता तर ते कायमचे हिंदू धर्माला लांच्छन ठरले असते. जर त्यामुळे त्यांचे खरोबर हित होत असते तर त्याला माझी हरकत राहिली नसती.

पण अस्पृश्यतेच्या सर्व थरांची मला संपूर्ण माहिती असल्यामुळे माझी अशी खात्री झाली आहे की, ज्या सवर्ण हिंदूसाठी ते जिवाभावाने राहतात त्यांच्यामध्ये ते इतके मिसळले आहेत की त्यांना त्यांचेपासून विभक्त करणे अशक्य आहे. विभक्त न करता येण्याजोग्या कुटूंबाचे ते घटक आहेत.

हिंदूबरोबर राहत असुनसुध्दा त्यांनी त्याचे विरुध्द बंड केले व हिंदू धर्माचा त्याग केला तर ते मी समजू शकतो. पण त्यांची मला जी माहिती आहे त्यावरुन ते करणार नाहीत. हिंदू धर्मामध्ये ज्यांचे स्पष्टीकरण करता येणार नाही असा धागा आहे. तोच त्यांना आपल्या इच्छेविरुध्द हिंदू धर्मामध्ये ठेवीत आहे.

आणि म्हणून त्यांचेमध्ये राहून अनुभव आल्यावरुन नियोजित विभक्तीकरणास विरोध करणे मला भाग पडत आहे आणि त्याप्रित्यर्थ मला माझे प्राण गमवावे लागले तरी हरकत नाही.

त्या प्रतिकाराचा मतितार्थ फार दूरगामी आहे. हिंदू समाजामध्ये हरिजनांना संपूर्ण स्वातंत्रांची हमी ज्यायोगे मिळणार नाही अशी कोणतीही योजना नियोजित विभक्तीकरण टाळण्यास पुरेशी असणार नाही. विश्वासघात झाल्यास ती फक्त माझ्या आत्मबलिदानाचा दिवस लांबवू शकेल आणि यापुढे जे माझ्या मताचे आहेत त्यांचेही बाबतीत माझ्यासारख्या एका सुधारकाच्याच नव्हे जर हिंदुस्थानात सध्या असलेल्या व सतत संख्येने वाढणाऱ्या असंख्य सुधारकांना, जे हिंदू धर्मातील खुळया समजुती नष्ट करण्यासाठी व या वर्गावर होणाऱ्या सामाजिक, नागरिक व राजकीय अन्यायातून त्यास मुक्त करण्यासाठी प्राणांतिक उपोषणाच्या स्वरुपाचा सत्याग्रह करतील त्यास तोंड द्यावयाचे किंवा कसे हा प्रश्न जबाबदार हिंदूसमोर विचारासाठी आहे.

माझ्याबरोबर कार्य केलेल्या सुधारकांनी देखील उपोषणाचा मतितार्थ समजून घ्यावा.

तो एक माझ्या मनचा भ्रम आहे किंवा मनातील प्रकाश ज्योत आहे. भ्रम असल्यास मला माझी तपश्चर्या शांतनेने करु दिली पाहिजे. त्या योगे हिंदूधर्मातील मृतप्राय बोजा

उतरविल्यासारखे होईल. प्रकाशज्योत असल्यास माझ्या क्लेशामुळे हिंदू धर्माचे शुध्दिकरण होऊ द्यावे. जे सध्या माझ्यावर अविश्वास दर्शवितात त्यांचे मतपरिवर्तन होऊ द्या.

माझ्या उपोषणाच्या हेतूबाबत गैरसमज दिसून येतो. ते हरिजनांसाठी कोणत्याही स्वरुपात कायदेशीर स्वतंत्र मतदारसंघ निर्माण करणाऱ्या विरुध्द आहे, हे पुन्हा एकवार स्पष्ट करीत आहे. ती धमकी कायमची नष्ट झाल्याबरोबर मी माझा उपवास संपवीन. जागा राखून ठेवण्यासंबंधी तसेच या संबंध प्रश्नासंबंधी माझी निश्चित मते आहेत. परंतु कैदी असल्यामुळे माझ्या सूचना मांडण्यास मी स्वतःस अयोग्य समजतो. सवर्ण हिंदुच्याच व हरिजनांच्या जबाबदार नेत्यांनी संयुक्त मतदारसंघाच्या तत्वावर आधारलेला व सर्व हिंदूबांधवांनी प्रचंड सभांतून मान्यता दिलेला करार मी पाळीन.

पण एक गोष्ट मी स्पष्ट करु इच्छितो. पददलित वर्गाच्या प्रश्नासंबंधी समाधानकारक सोडवणुक झाल्यास त्यामुळे जातीय प्रश्नांच्या इतर बाबतीत ब्रिटिश सरकारने घेतलेले निर्णय मान्य करण्यास मी बांधला गेलो आहे असे समजण्यात येऊ नये. स्वतंत्र व लोकशाहीवर आधारलेली घटना राबविणे अशक्यप्राय होईल अशा या प्रश्नांच्या इतर अनेक बाबींना माझा व्यक्तीगत विरोध आहे व या प्रश्नांच्या समाधानकारक तडजोडीवर आधारलेली घटना माझेवर बंधनकारक असणार नाही. हे राजकीय प्रश्न आहेत व त्यांचा राष्ट्रीय कॉंग्रेसने विचार करुन निर्णय घ्यावयाचा आहे. ते प्रश्न माझ्या वैयक्तिक अधिकार-कक्षेबाहेरचे आहेत. कैदी असल्यामुळे या प्रश्नावर मी माझे मत व्यक्त करु शकत नाही. माझ्या उपोषणाचा हेतू मर्यादित आहे. पददलित वर्गाचा प्रश्न ही प्रामुख्याने धार्मिक बाब असल्याकरणाने संबंध आयुष्यभर त्या प्रश्नावर लक्ष केंद्रित केले असल्यामुळे ती बाब विशेषतः माझी व्यक्तिगत आहे असे मी मानतो. त्या प्रश्नाबाबत माझी व्यक्तिगत पवित्र निष्ठा असल्यामुळे ती मी टाळू शकत नाही.

आत्मज्ञानासाठी उपोषण व तप हा फार पुरातन मार्ग आहे. ख्रिश्चन धर्मामध्ये तसेच मुसलमान धर्मामध्येही तो मला दिसून आला आहे. आत्मशुध्दीसाठी व तपश्चर्येसाठी उपवास केल्याची हिंदू धर्मात असंख्य उदाहरणे आहेत. पण तो जरी एक प्रकारचा अधिकार असला तरी ते एक प्रकारचे कर्तव्यही आहे. माझ्या समजुतीप्रमाणे मी त्याचे एक शास्त्र बनविले आहे. मी त्याबाबत तज्ज्ञ असल्यामुळे माझ्या मित्रांना व माझ्याविषयी सहानुभूति असणाऱ्यांना मी ताकीद देतो की त्यांनी माझे अंधपणाने अगर खोटया व सांनिपानिक सहानुभूतीने अनुकरण करु नये. त्या सर्वांनी स्वार्थत्यागाने व परिश्रमपूर्वक स्वतः अस्पृश्यांची सेवा करुन उपोषण करण्यास पात्र ठरावे. त्यांची उपोषणाची वेळ आली असल्यास त्यांना स्वतंत्र प्रकाश मिळेल.

मी स्वतःस जेथवर जाणतो तेथवर मी हे उपोषण अत्यंत शुध्द हेतूने व कोणत्याही व्यक्तीबाबत राग अगर द्वेष न ठेवता सुरु करीत आहे. माझ्या दृष्टीने हे उपोषण अहिंसेचे प्रतीक असून त्यावरील अखरेचा ठसा आहे. माझे शत्रु आहेत व या कार्याच्या विरुध्द आहेत असे मानून या विवाद्य प्रश्नाबाबत काही जणांबाबत हिंसात्मक कृत्ये जे करतील केवळ माझा शेवट जवळ आणतील. या प्रश्नाबाबत संपूर्ण सौजन्य दाखविणे व विरोधकांच्या म्हणण्याचा योग्य विचार करणे हे इतर सर्व बाबतीत नसले तरी याबाबतीत 'यश मिळविण्यासाठी अत्यावश्यक आहे.

---

*संदर्भ - म.गांधी यांचे संकलित वाङ्मय, खंड ५१, पृ.५९ ते ६२.*

# परिशिष्ट क्र.५

**पुण्याच्या सनातनी मंडळीशी गांधीजीची चर्चा -**

७ डिसेंबर १९३३

**गांधीजी** - मंदिर प्रवेश हा एक केवळ धार्मिक प्रश्न आहे. मी तो कधीच व्यवहारबुध्दीचा प्रश्न मानलेला नाही. माझ्या दृष्टीने धर्म हा आचार आहे. प्रत्येक हिंदुला मंदिरात जाण्याचा हक्क आहे. व्यक्तीगत स्वच्छतेचे नियम सर्वांना लागू पडतात. एका विशिष्ट वर्गाच्या हिंदूना मंदिरात प्रवेश देण्याची रुढी अनेक वर्ष प्रचलित आहे. परंतु कोणत्या हिंदूना मंदिरात प्रवेश द्यावा व कोणाला देऊ नये हा धार्मिक प्रश्न नाही. यासाठी फक्त मंदिरात जाणारांचा विचार घ्यावा. त्यात धर्मशास्त्रे आणू नयेत. जे थोडे वगळले गेले आहेत त्यांनी दुसऱ्यावर जबरदस्ती करु नये. त्यांनी स्वत:साठी दुसरे मंदिर बांधावे. माझ्या धर्माचा मी जो अभ्यास केला आहे त्यावरुन मला असे वाटते की ज्यांना दुसऱ्या मंदिरात प्रवेश दिला जात नाही त्याच्यासाठी ते मंदिर काही तास खुले ठेवावे. जो आध्यात्मिक प्रगतीकडे नेतो आणि ज्यांच्यासाठी आपण हर एक गोष्टीचा त्याग करावयास तयार असतो तो खरा धर्म, मंदिर 'स्पृश्यासाठी' काही तास खुले ठेवण्यात यावे. परंतु, सुधारक थोडे असतील तर ते अस्पृश्यासाठी खुले ठेवणे शक्य नाही. बहुमत व अल्पमत हा प्रश्न माझ्या उपोषणातून उद्‌भवला. मंदिर अस्पृश्यांना खुली ठेवण्याची बहुसंख्येची इच्छा असल्याबदद्ल ज्यांना शंका होती त्यांना उत्तर म्हणून, सार्वमत सुचविण्यात आले. अस्पृश्यांचा मंदिर-प्रवेश शास्त्रांच्या विरुध्द आहे असे तुम्ही निस्संशय रीतीने सिध्द केलेत तर मी असहाय होईन.

**प्रश्न** - शास्त्रांनी ५१ टक्के बहुमत मिळविले तर त्यांचे ऐकण्याचे वचन तुम्ही देता काय?

**गांधीजी** - तुम्ही तो अधर्म आहे असे सिध्द केलेत तर मी आजच उपोषण सोडून देईन.

**प्रश्न** - या संधीचा तुम्ही शास्त्रांशी चर्चा करण्यासाठी विचार कराल काय?

**गांधीजी** - माझ्या उपोषणामुळे तुम्ही लोक येथे आला आहात. मग ते माझे सद्‌भाग्य असो की दुर्भाग्य असो. मंदिरे खुली करणे आपले कर्तव्य आहे असा निश्चय मी केला आहे. मी हे फार पुर्वी ठरविले आहे. बायकोम येथे मी शास्त्र्यांना भेटलो. त्यांनी मला शंकर-स्मृती दाखविली व तिचे भाषांतरही केले. या प्रश्नावर नवा प्रकाश टाकण्यासाठी तुम्ही आला असल्याने, मी अर्थातच, तुमचे ऐकून घेईन. परंतु चर्चेच्या ओघात मी उपोषणाचा निर्धार सोडणार नाही. मी अनेक ग्रंथ व त्यांची भाषांतरे यांचा अभ्यास केला आणि अखेरीस असे ठरविले की, जो अंहिसा व सत्य यांच्या कसोटीला उतरतो तो धर्म. मी गीतेकडे गेलो नाही. उलट गीताच मजकडे आली. माझ्यासाठी गीता

हा स्वतंत्र आधार आहे. सर्व प्रकारच्या टीकेपासून स्वतःला वाचविण्यासाठी मी माझी श्रध्दा, विवेकबुध्दी व भक्ती यांचा आश्रय घेतला. तुम्ही म्हणता ते माझ्या विवेकबुध्दीला पटले तर विवेकाच्या पातळीवर मी हरलो असे मी म्हणेन. मग मी माझ्या ह्दयावर विसंबून राहीन. तुम्हाला माझ्या अंतःकरणाचे समाधान करावे लागेल.

**प्रश्न** - **जी** गोष्ट तुमच्या ह्दयाला पटते **तो** तुमचा धर्म होय असे समजले जाणार नाही काय?

**गांधीजी** - जे काही माणसाच्या ह्दयाला पटते ती त्यांचा धर्म होय. **धर्मापर्यंत** बुध्दीने पोचणे शक्य नसते. केवळ अंतःकरणानेच त्यांच्यापर्यंत पोचता येते. म्हणून तो मूर्खासाठीही आहे. मंदिर - प्रवेशाचा प्रश्न केवळ धार्मिक आहे. माझी मते बदलणे खरोखरी फार अवघड आहे. कारण माझ्या मतांच्या मागे भूतकाल आहे. मंदिर-प्रवेशाच्या बाबतीत धर्म काय आहे व काय नाही हे सामान्य माणूस ठरवू शकत नाही. मंदिर-प्रवेश मी अधर्म मानीत असेन तर मी याचा पुरस्कार करणे चुकीचे होईल. परंतु, प्रदीर्घ अभ्यासानंतर व अनुभवानंतर, मला असा विश्वास वाटू लागला आहे की मंदिरे हरिजनांना खुली करणे हे आपले धर्मकर्तव्य आहे. मी स्वतःसाठी जे ठरविले आहे ते दुसऱ्यांवर **लादण्याची** माझी इच्छा नाही. परंतु, मी तुम्हाला असे सांगेन की तुमचे अंतःकरण प्रचलित परंपरेविरुध्द बंड करीत नसेल तर मला उपोषण करणे भाग पडेल. ते बंड करीत असेल तर मला ते सुरु करण्याची गरज पडणार नाही. आधीच मी स्वतःसाठी ठरविले आहे. लोकांना स्वतःसाठी ठरवावयाचे आहे.

**प्रश्न :** आम्ही तुमच्या ह्दयाला आवाहन कसे करु शकणार?

**गांधीजी** - विद्यार्थ्याला पाठाचा बोध करुन देणे हे शिक्षकाचे कर्तव्य आहे. ते कसे करावयाचे ही शिक्षकाची जबाबदारी आहे. त्याला हे ठाऊक नसेल तर त्याला शिक्षक कसे म्हणता येईल? मी गुरुसाठी कुठे शोध करावयाचा? गुरुने मला शोधून काढावे. मी त्यांच्या शोधासाठी गेलो तर मी ठेचकाळेन. माणसाला परमेश्वराच्या शोधार्थ जावे लागत नाही. आपल्याला त्यांच्या शोधासाठी जावे लागले तर तो काय परमेश्वर आहे? परमेश्वर स्वतःच्या सेवकांना व भक्तांना शोधून काढतो.

**प्रश्न** - कृपा करुन संस्कृतमध्ये बोला.

**गांधीजी** - मी अडाणी आहे. मी तुमच्यासारखा पंडित असतो तर मी तुम्हाला येथे येण्याची मुभा दिली नसती किंवा मी तुम्हाला बंदिस्त केले असते. मी म्हणालो असतो, 'निघून जा', शास्त्रांचा माझा अभ्यास तुमच्याहून निराळा आहे.

---

*संदर्भ - म.गांधी यांचे संकलित वाड्मय, खंड ५२, पृ.४१४ ते ४१५.*

**परिशिष्ठ क्रमांक ६**

**डॉ.आंबेडकरांना धमकीचे पत्र -**

**डॉ.आंबेडकर,**

जो तमे दिवस ४ मां महातमा गांधीनी मागणी मंजूर करशो नही तो तमारी जान लोवामां आवशे. माटे जो तमारु जीवन तमोने वहालुं होय तो महातमा गांधीजीनी मागणी मंजूर करीने तेओने उपवास मांथर जलदी छोडावो. आ चेतवणी छेल्ली छे हवे जुदी तकरार छोडी देशो नही तो तमारी खून करवामां आवशे.

ली. हरिभाई के.भट

B.P.E.E. ना एक मेंबर अने वर्कर

---

*संदर्भ - डॉ.बाबासाहेब आंबेडकर लेखन आणि भाषणे, खंड १८, भाग १ पृ.३५७.*

## परिशिष्ट क्रमांक ७

**महात्मा गांधीजी व डॉ.आंबेडकर चर्चा -**

२२ सप्टेंबर १९३२

**आंबेडकर** - वेगवेगळया विचारसरणीचे दोन गट देशात आहेत ही गोष्ट आपण मान्य केली पाहिजे, आणि त्याप्रमाणे वागले पाहिजे, आणि मला माझी भरपाई मिळाली पाहिजे. तसेच स्पष्ट समझोता घडून आला पाहिजे व त्यायोगे इतर बाबतीत देखील मला भरपाई मिळू शकेल अशी देखील माझी इच्छा आहे. सरकारी निर्णयानुसार मला एकाहत्तर जागा मिळतात व मला वाटते की, ती न्याय्य, वाजवी व निश्चित अशी विभागणी आहे.

**गांधीजी** - तुमच्या मते.

**आंबेडकर** - त्याशिवाय, मला मताधिकार आणि सामान्य मतदारसंघातून निवडणूक लढविण्याचा हक्क प्राप्त होतो. याशिवाय मंजूर मतदारसंघात मत देण्याचा हक्क देखील मला मिळतो. तुमची आम्हाला प्रचंड मदत आहे या गोष्टींची मला जाणीव आहे.

**गांधीजी** - व्यक्तिगत तुम्हाला नव्हे.

**आंबेडकर** - माझं तुमच्याशी एकच भांडण आहे, ते म्हणजे, तुम्ही तथाकथित राष्ट्रीय कल्याणाचे कार्य करता केवळ आमच्या हितासाठी कार्य करीत नाही. तुम्ही जर संपूर्णतया पददलित वर्गाच्या कल्याणाला वाहून घेतले तर त्या परिस्थितीत तुम्ही आमचे वीरपुरुष व्हाल.

**गांधीजी** - असे बोलण्यात तुमचा चांगुलपणा आहे.

**आंबेडकर** - मला माझ्या समाजासाठी **राजकीय** सत्ता हवी आहे. आमच्या अस्तित्वासाठी ती मिळणे अत्यावश्यक आहे. म्हणून हा करार पुढील गोष्टींवर आधारलेला असावा. मला मिळणे आवश्यक असलेल्या गोष्टी मला मिळाल्या पाहिजेत. हिंदूना मी हे सांगू इच्छितो की, माझ्या नुकसानभरपाईची मला हमी मिळाली पाहिजे.

**गांधीजी** - तुम्ही तुमची बाजू स्पष्टपणे मांडली आहे. तथापि, मला तुम्हाला एक प्रश्न विचारावासा वाटतो. तुम्ही म्हणता की, पददलित वर्गामध्ये जर एकादा खराखूरा पक्ष असेल तर, मोठा होण्यासाठी त्याला पुरेसा वाव देण्यात आला पाहिजे. म्हणून प्राथमिक निवडणुकी न घेता संयुक्त मतदारसंघ स्वीकारण्यास त्यांनी दिलेला नकार हा अगदी वाजवी आहे. अशातऱ्हेची स्वतंत्र निवडणूक असावी असे अद्यापपावेतो तुम्ही का म्हणाला नाही हेच मला कळत नाही. या विषयाचा मी जो काही अभ्यास केला आहे त्यावरुन मला वाटते की, मी प्राथमिक निवडणूक स्वीकारली तरी, त्यामुळे माझ्या शपथेच्या एका अक्षराचाही भंग होत नाही. म्हणून ती शर्त (प्राथमिक निवडणुकांची) मी मान्य करतो. परंतु तिच्या शब्दप्रयोगाची मला नक्कीच चिकित्सा करावी लागेल. याक्षणी मी फक्त एवढेच सांगतो की, स्वतंत्र प्राथमिक निवडणुका घेण्याची कल्पना माझ्या शपथेशी

विसंगत नाही. परंतु पॅनेलवर फक्त तीनच उमेदवार असले पाहिजेत असा जेव्हा तुम्ही आग्रह धरता तेव्हा मला काहीतरी संशय येतो. ती (अट) मान्य करण्यास मला पुरेसा वावच मिळत नाही. त्याशिवाय, फक्त काही जागांच्या बाबतीतच तुम्ही या पॅनेल पध्दतीचा स्वीकार करता, त्यायोगे हरिजनांमधील दोन्ही पक्षांचे समाधान करता प्राथमिक स्वरुपाची फक्त हरिजन मतदारांची एक निवडणूक असेल. दुसरी (निवडणुक) संयुक्त मतदारसंघाची असेल. मला कोणताही भेदभाव न करता केवळ एकाच पक्षाचे हितसंबंध सुरक्षित ठेवावयाचे नाहीत तर, संबंध पददलित वगर्बाचे हितसंबंध सुरक्षित ठेवावयाचे आहेत. मला अस्पृश्यांची सेवा करावयाची आहे; आणि म्हणूनच मी आपणावर मुळीच रागावलो नाही. तुम्ही जेव्हा माझ्याविषयी अपमानास्पद व रागाचे शब्द वापरता तेव्हा, मी स्वत:ला सांगतो की, माझ्याबाबतीत ते योग्यच आहे. तुम्ही जरी माझ्या तोंडावर थुंकलात तरी देखील मी रागावणार नाही. ईश्वर साक्षीने मी हे बोलत आहे. तुम्ही भरपूर हलाहल प्राशन केले आहे हे मी जाणतो. तथापि, तुम्हाला आश्चर्यकारक वाटावा असा एक दावा मी करणार आहे. तुम्ही जन्माने अस्पृश्य आहात, परंतु मी खुशीने अस्पृश्यता स्वीकारली आहे, आणि नवीन अस्पृश्य असल्याने, आधीपासून अस्पृश्य असलेल्यांपेक्षा त्यांच्या कल्याणाबद्दल मला अधिक काळजी वाटते. या क्षणी दक्षिण भारतातील अनभिगम्य-अनपश्य असे मुके अस्पृश्य माझ्या डोळ्यासमोर आहेत. प्रस्तुत योजनेचा त्या लोकांवर काय परिणाम होईल हे पाहण्यासाठी मी सध्या या योजनेचा काळजीपूर्वक अभ्यास करीत आहे. अर्थात तुम्ही म्हणाल की, त्याची काळजी मी का करावी. तुम्ही सर्वजण एकतर ख्रिश्चन धर्म स्विकाराल किंवा इस्लामी धर्म स्विकाराल. माझा देह पडल्यानंतर तुम्ही तुम्हाला वाटेल ते करा. मी असे म्हणतो की जर पॅनेल पद्धत ही पददलित वर्गांसाठी योग्य असेल तर ती सबंध मतदारसंघासाठी देखील चांगली असली पाहिजे. समाजाची दोन गटांत विभागणी करण्यात यावी ही गोष्ट प्रथमपासूनच मला आवडत नाही. सर्व अस्पृश्य लोक जर एकत्रित झाले व त्यांच्यात मतैक्य असेल तर, सनातनींचा किल्ला मी सुरुंगाने उडवून देऊन जमीनदोस्त करीन. सबंध अस्पृश्य वर्गांने संघटितपणे सनातनी लोकांच्या विरुध्द बंड पुकारले पाहिजे, असे मला वाटते. नेमणूक करण्याचा अधिकार तुमच्या हातात असताना संख्येविषयी तुम्ही काळजी करण्याचे कारण नाही. मी आमरण लोकसत्तावादी आहे. माझी रक्षा हवेत उधळल्यावर अथवा तसे न झाले तर, ती रक्षा गंगेत टाकल्यानंतर सबंध जग ही गोष्ट मान्य करील की, लोकसत्तावाद्यांमध्ये मी अग्रेसर होतो. प्रौढी मिरवण्यासाठी मी हे सांगत नाही तर नम्रतेने सत्य तेच सांगत आहे. समाजवादाचा हा धडा मी कोवळ्या वयात म्हणजे मी जेव्हा १२ वर्षांचा होतो त्यावेळी शिकलो. घरातले संडास साफ करणाऱ्या भंग्यास माझी आई अस्पृश्य मानीत असल्यामुळे मी तिच्याशी भांडण केले. त्या दिवशी भंग्याच्या स्वरुपात मला ईश्वर दिसला. तुम्ही जेव्हा म्हणालात की, हरिजनांचे कल्याण तुम्हाला माझ्या प्राणापेक्षा प्रिय आहे तेव्हा तुम्ही सत्य तेच सांगीतलेत.

आता प्रामाणिकपणे त्याच विधानाला चिटकून रहा. तुम्ही माझ्या प्राणाची मुळीच काळजी करु नका. परंतु हरिजनांचा विश्वासघात करु नका. माझे कार्य माझ्याबरोबर नष्ट होणार नाही. माझा संदेश परिषदेला कळविण्यास मी माझ्या मुलाला सांगितले आहे. त्या संदेशात मी म्हटले आहे की, माझे प्राण वाचविण्यासाठी त्यांनी हरिजनांच्या हिताला तिलांजली देऊ नये. माझी खात्री आहे की, मी निधन पावलो तर माझा मुलगा नक्कीच माझ्या मागे येईल. फक्त तो एकटाच नव्हे तर इतर अनेक लोक देखील आपले प्राण अर्पण करतील कारण मला फक्त एकच मुलगा नाही तर हजारो मुलगे आहेत. हिंदू धर्माच्या प्रतिष्ठेसाठी जर त्याने प्राण दिला नाही तर, तो मला साजेसा माझा मुलगाच नव्हे. अस्पृश्यता समुळ नष्ट केल्यावाचून हिंदूधर्माची प्रतिष्ठा वाचवता येणार नाही. जेव्हा प्रत्येक बाबतीत अस्पृश्यांना सवर्ण हिंदूंच्या बरोबरीचे म्हणून समजण्यात येईल तेव्हाच ते घडून येईल. आज जो इसम ' अस्पृश्य ' म्हणून समजला जातो त्याला भारताचा व्हाइसरॉय होण्याची संधी देखील उपलब्ध असली पाहीजे. भारतात आल्यानंतर माझ्या पहिल्या राजकीय भाषणात मी म्हणालो होतो की, एखाद्या भंग्याला कॉंग्रेसचा अध्यक्ष बनविणे मला अधिक आवडेल.

म्हणून तुम्ही घासाघीस करु नका अशी माझी तुम्हाला कळकळीची विनंती आहे. माझ्या डोळ्यांसमोर आलेली देखील मला आवडणार नाही इतकी वाईट असलेली कोणतीही गोष्ट माझ्यासमोर आणू नका. जो स्वखुशीने प्राणार्पण करण्यास तयार आहे अशा मनुष्याचा निश्चय बळकट करील अशी एखादी चांगली भेट मला आणून द्या. तथापि, माझ्या सहकार्याला काहीतरी किंमत आहे याविषयी तुमची खात्री झाली असेल तरच तुम्ही तसे करा.

---

*संदर्भ - म.गांधी यांचे संकलित वाड्मय खंड ५१, पृ.४५३ ते ४५५.*

**परिशिष्ट क्रमांक ८**

**पुणे करारनामा बंधनकारक समजून स्पृश्य बंधुंनी कृती करावी.-**

पुण्याला म. गांधी व डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्यामध्ये तडजोड होऊन एक नविन करारनामा तयार करण्यात आला. हा सर्व हिंदु पुढारी मंडळींना पसंत पडताच गेल्या शनिवारी करारनाम्यावर अस्पृश्य व स्पृश्य हिंदू पुढाऱ्यांच्या सह्या झाल्या. हा करारनामा पास झाल्यानंतर मुंबईत पुन्हा सर्व हिंदू पुढारी जमले व रविवार तारीख २५ सप्टेंबर १९३२ रोजी कोर्टातील इंडियन मर्चन्टस् असोसिएशनच्या हॉलमध्ये मुंबई नागरिक इमर्जन्सी कौन्सिल तर्फे पंडित मदनमोहन मालवीय यांच्या अध्यक्षतेखाली दुपारी सभा भरुन कराराला सर्वानुमते संमती देण्यात आली.

प्रथमतः परिषदेचे अध्यक्ष पंडित मदनमोहन मालवीय यांनी भाषण केले. त्यांनी आपल्या भाषणात तडजोडीला ज्या ज्या पुढाऱ्यांचे जिवाभावाचे सहाय्य झाले त्या त्या मंडळींचे त्यांनी अंत:करण पूर्वक आभार मानले. तथापि, अस्पृश्य वर्गाचे पुढारी डॉ.आंबेडकर यांचे आभार प्रामुख्याने मानणे अगदी योग्य आहे. त्यांच्या सहकार्याशिवाय ही तडजोड होणे कठीण होते. करारनाम्यातील कलमांचा विचार करता स्पृश्य हिंदूंवर ती प्रत्यक्ष कृतीत पार पाडून दाखविण्याची मोठी जबाबदारी आहे.

**पंचविस लखांचा फंड -**

अस्पृश्यता निवारण्यासाठी मुख्यतः पैशांची अत्यंत जरुरी आहे. सर्व देशभर जागृतीचे कार्य करण्यासाठी पैशाशिवाय सर्व प्रयत्न व्यर्थ ठरतील. या कार्याारिता आपण एक लहानशी कमिटी नेमून या कमिटीतर्फे निदान २५ लाख रुपये फंड उभारण्यात आला पाहिजे आणि पुढील तीन-चार महिन्यात प्रत्यक्ष कार्य करुन आपल्या हिंदू धर्माचे तेज वाढविणे, आपल्या दलित बांधवांना समानतेचे सर्व हक्क देणे आणि आपली अंत:करणे शुध्द करुन उच्चनिचतेचा भाव समुळ नाहीसा करणे इत्यादी गोष्टी तात्काळ झाल्या पाहीजेत. आपल्या समाजातून अस्पृश्यता समुळ नाहीशी करण्यासाठी महात्माजींनी आपला प्राण पणास लाविला होता ही गोष्ट सर्वांनी पूर्णपणे लक्षात ठेवावयास पाहिजे.

पंडितजींचे हृदयस्पर्शी भाषण झाल्यावर पुण्याला झालेल्या करारनाम्यास संमती देणारा मुख्य ठराव शेठ मथुरादास वसनजी खिमजी यांनी पुढे मांडिला. ठराव मांडताना ते म्हणाले की, पुण्याला झालेल्या करारनाम्याला ब्रिटिश सरकारने आता आपली संमती द्यावयास कोणतीच हरकत नाही. तरी सरकारने म. गांधी यांच्या बिकट अवस्थेतील प्रकृतीचा विचार करुन तात्काळ मान्यता असल्याचा विद्युत संदेश पाठवून द्यावा.

ठरावाला अनुमोदन देण्याकरिता सर तेजबहादूर सप्रू हे बोलावयाला उठले. ते म्हणाले की, या करारनाम्याचे सारे कार्य पंडित मालवयजींच्या अध्यक्षतेखाली झाले आहे ही गोष्ट लक्षात

घेण्यासारखी आहे. पंडितजींनी आपला कट्टर धर्मनिष्ठपणा बाजूला ठेवून बदलत्या काळानुसार वागण्याचे जे मनोधैर्य दाखविले ते कितीतरी पटीने अलौकिक आहे आणि आपण सर्वांनी आजच्या परिस्थितीत असेच धडाडीचे धोरण स्वीकारल्याशिवाय गत्यंतर नाही. तसेच ह्या तडजोडीच्या यशस्वीतेचे बरेच श्रेय डॉ. आंबेडकर यांना दिले पाहिजे. त्यांनी आपल्या समाजाच्या न्याय्य हक्कासाठी झगडण्यात जे धैर्य व जो करारीपणा दाखवला तो अभिनंदनीय असाच होता.त्यांच्या धैर्याकडे ते अस्पृश्यांचेच नव्हे तर हिंदूस्तानचे भावी खरे निधड्या छातीचे पुढारी होतील यात तिळमात्र शंका वाटत नाही. ब्रिटिश सरकारच्या कम्यूनल अवार्डपेक्षा ह्या नवीन कराराने अस्पृश्य वर्गाचे अधिकच हित झाले. तरी आपण सर्वांनी यापुढे सहकार्याने वागून अंगिकारलेल्या कार्यामध्ये यश मिळविण्याचा कसून प्रयत्न केला पाहीजे.

डॉ. आंबेडकर भाषण करावयास उभे राहताच टाळ्यांचा कडकडाट झाला. ते म्हणाले की,

थोड्याच दिवसांपूर्वी माझी बिकट परिस्थिती व आजचा आनंदाचा समय याचा विचार केल्यास हे सारे स्वप्नवत असे दृश्य दिसले. एकीकडे मला म. गांधीचे प्राण वाचवावयाचे होते तर दुसरीकडे मला माझ्या समाजबंधुंच्या न्याय हक्कांचे संरक्षण जिवापाड करावयाचे होते. हा दुहेरी पेच यशस्वीरीतीने सुटला जाईल अशी मला बिलकूल शंका वाटत नव्हती. परंतु एकंदर भयानक व जबाबदारीची परिस्थिती जाणून सर्व हिंदू पुढाऱ्यांनी जे सारासार विचारसरणीचे व सहकार्याचे धोरण स्वीकारले त्यामुळे हया बिकट प्रश्नातून समाधानकारकरित्या बाहेर पडण्याचा मार्ग दिसू शकला आणि यामुळे मला खरोखर अत्यानंतर होत आहे. या लढयाच्या वाटाघाटीतून पार पडण्यास मुख्यतः म.गांधीच कारणीभूत झालेले आहेत. मला मोठे आश्चर्य वाटते की, माझ्या सर्व मागण्यांना म.गांधीनी मान्यता देऊन उलट माझेच अभिनंदन केले. म.गांधीनी ही जी एकप्रकारची तडजोड मान्य केली ती दुसऱ्याच रांऊड टेबल परिषदेच्या प्रसंगी मान्य केली असती तर आजचे बिकट व भयानक असे वातावरण कधीच उत्पन्न झाले नसते. असो. हया यशस्वी करारनाम्याला मान्यता देण्यात मला आनंद होतो. माझ्या स्पृश्य बंधुनी हा करारनामा बंधनकारक समजून त्याप्रमाणे प्रत्यक्ष कृतीत कार्य करुन दाखविल्यास मला व माझ्या समाजाला अत्यानंद होणार आहे. या करारनाम्याच्या यशाचे श्रेय म.गांधीशिवाय सर तेजबहादूर सप्रू, पंडित मालवीय व सी. रोजगोपालाचारी यांना दिल्याशिवाय मला राहावत नाही.

डॉ.आंबेडकर यांच्या भाषणानंतर रा.ब.राजा व मि.के.नटराजन यांची भाषणे झाल्यावर श्री. सी.राजगोपालाचारी यांचे आभार प्रदर्शनार्थ भाषण झाले. पुढील विधायक कामकाजाकरिता जी कमिटी नेमावयाची तिच्याबद्दल सर्वस्वी अधिकार अध्यक्षांना असावा अशी सूचना शेठ मथुरादास वसनजी यांनी केली व तिला सभेने मान्यता दिल्यावर परिषद बरखास्त करण्यात आली.

---

*संदर्भ - डॉ.बाबासाहेब आंबेडकर लेखन आणि भाषणे खंड १८, भाग १ पृ.३६७ ते ३६९.*

**<u>पुणे कराराचे तोटे -</u>**

१) अस्पृश्यांना आपल्या निवडीप्रमाणे विधीमंडळात प्रतिनिधी पाठवता यावेत याकरिता निवडणुक पध्दती सुचविण्याचा पुणे कराराचा उद्देश होता. परंतु हा उद्देश पूर्णतः धुळीस मिळाल्याचे पुढे दिलेल्या आकडेवारीच्या मालिकांवरुन दिसून येईल. ही आकडेवारी गेल्या फेब्रूवारी १९४६ मध्ये झालेल्या निवडणुक निकालांचे आधारावर उभारलेली आहे.

२) हे आकडेवारीचे तक्ते चार वेगवेगळया मालिकेत मांडलेले **आहेत.**

१) पहिल्या मालिकेत अंतिम निवडणुकीत विजयी झालेल्या स्पृश्य व अस्पृश्य उमेदवारांनी मिळविलेली मते दाखवलेली आहेत.

२) दुसऱ्या मालिकेत असे दाखविले आहे की अंतिम निवडणुकीत यश मिळण्याकरिता अस्पृश्य उमेदवारांना राखीव तरतुदींचा आधार घेणे किती निवडणुकांत आवश्यक होते आणि किती निवडणुकात राखीव जागांचा लाभ न घेता ते निवडून आलेत.

३) तिसऱ्या मालिकेत राखीव जागा असलेल्या मतदारसंघात स्पृश्य हिंदू आणि अस्पृश्य यांच्या मतदारांचे बलाबल दर्शविले आहे.

४) चवथ्या मालिकेत, अंतिम निवडणूकीत विजय झालेल्या अस्पृश्य उमेदवारांना प्राथमिक निवडणुकीत मिळालेली मते दाखविलेली आहेत.

३) ही आकडेवारी लक्षपूर्वक तपासण्याची जे लोक काळजी घेतील त्यांना याचे निष्कर्ष सहज ध्यानात येतील. या आकडयांवरुन खालील निष्कर्ष सिध्द होतात.

एक) अंतिम निवडणुकीत निवडून आलेला प्रत्येक अस्पृश्य उमेदवार हा आपण अस्पृश्यांच्या नव्हे, तर स्पृश्य हिंदूच्या मतावर निवडून आलो असे मानतो. अनेक उमेदवारांनी तर सर्वात वरचा नंबर पटकावला आणि काहींनी स्पृश्य हिंदु उमेदवारांच्या बरोबर तर काहींनी त्यांचेपेक्षा जास्त मते मिळविली. (पहिल्या मालिकेतील तक्ते पहा) अस्पृश्य उमेदवारास अस्पृश्यांच्या राखीव जागांवर विसंबून राहावे लागले असे मतदारसंघ फार थोडे आहेत. (दुसऱ्या मालिकेतील तक्ते पहा) ही अतिशय अनपेक्षित बाब आहे. निरनिराळया मतदार संघातील स्पृश्य व अस्पृश्य मतदारांच्या संख्याबलाची तुलना केली (तिसऱ्या मालिकेतील तक्ते पहा) तर असे लक्षात येईल की अस्पृश्य मतदारांनीच अस्पृश्य उमेदवारांना मतदान केले असते तर अशी परिस्थिती निर्माण झाली नसती, कारण अस्पृश्य मतदारांची त्या मतदारसंघातील संख्या अतिशय अल्प आहे. ज्याअर्थी वरील

परिस्थिती निर्माण झाली, त्यावरुन अस्पृश्य उमेदवाराना अंतिम निवडणुकीतील विजय हा स्पृश्य हिंदू मतदारांवर अवलंबून असतो ही बाब सिध्द होते.

दोन) आता आपण प्राथमिक व अंतिम निवडणुकीच्या निकालांची तुलना करु. (चवथ्या मालिकेतील तक्ते पहा) जो अस्पृश्य उमेदवार अंतिम निवडणुकीत निवडून आला तो प्राथमिक निवडणुकीत पडलेला आहे. (जर प्राथमिक निवडणुक ही अंतिम निवडणूक समजण्यात आली आणि मतदार संघ एक सदस्यीय समजला जात असेल तर).

तीन) स्पृश्य हिंदू आणि अस्पृश्य यांच्या मतसंख्येत जी प्रचंड तफावत आहे (ही तफावत प्रौढ मतदान पध्दतीतही नाहीशी होणे अशक्य आहे. - त्यामुळे अस्पृश्यांना आपले खरे प्रतिनिधी निवडून आणण्याचे दृष्टीने संयुक्त मतदारसंघाची पध्दती निरुपयोगी आहे.

चार) पुणे कराराने अस्पृश्यांना प्रतिनिधीत्वाचे बाबतीत पूर्णपणे निष्कासन केले आहे. ज्या उमेदवारांना त्यांनी प्राथमिक निवडणुकीत धुडकावून लावले (व प्राथमिक निवडणूक हीच त्यांचे खरे मत दर्शविणारा आरसा आहे) हे उमेदवार स्पृश्य हिंदूंच्या मतांवर अंतिम निवडणुकीत निवडून आलेत.

अशा प्रकारे पुणे करारात पूर्ण बदमाशी भरलेली आहे. तो स्वीकारण्यात आला याचे एक कारण म्हणजे श्रीमान गांधीना उपोषणाद्वारे आणलेले दडपण आणि दुसरे म्हणजे अस्पृश्यांच्या निवडणुकीत स्पृश्य हिंदू ढवळाढवळ करणार नाही असे आश्वासन देण्यात आले होते.

---

*संदर्भ - राज्य आणि अल्पसंख्याक ले.भि.रा.आंबेडकर, पृ.६५ व ६६.*

## मालिका पहिली ✷

विजयी झालेल्या अस्पृश्य उमेदवारांनी स्पृश्य हिंदू उमेदवाराच्या तुलनेत मिळविलेली मते.

| | | | | |
|---|---|---|---|---|
| तक्ता क्रमांक | - | एक | - | मद्रास |
| | | दोन | - | बंगाल |
| | | तीन | - | मुंबई |
| | | चार | - | उत्तर प्रदेश |
| | | पाच | - | मध्यप्रदेश |
| | | सहा | - | आसाम |
| | | सात | - | ओरिसा |

### एक मद्रास

| अ.क्र. | मतदार संघाचे नांव | जागा | विजयी हिंदु उमेदवाराने मिळविलेली मते | विजयी अस्पृश्य उमेदवाराने मिळविलेली मते |
|---|---|---|---|---|
| १ | २ | ३ | ४ | ५ |
| १. | कोकोनाडा | २ | ३२,६०७ | २८,५४४ |
| २. | एल्लोर | २ | ३७,६१८ | ३८,१९५ |
| ३. | बंदर | २ | ६९,३१९ | ७०,९३१ |
| ४. | ओंगल | २ | ५०,९०६ | ४९,९९२ |
| ५. | पेतुकोंडा | २ | १७,४०६ | १८,४२५ |
| ६. | करनूल | २ | ३२,७५६ | ३२,२९४ |
| ७. | चिंगलपुट | २ | १३,८६५ | १५,१२९ |
| ८. | थिरुवल्लुर | २ | १७,२२५ | १७,८१८ |
| ९. | रानीपेठ | २ | २१,२४९ | २१,०५९ |
| १०. | तिरुवन्नमलाई | २ | ३१,४७६ | ३२,१३२ |
| ११. | तिंडीवनम | २ | २५,६२६ | २५,४४२ |
| १२. | चिदंबरम | २ | १५,२७२ | १४,८७४ |
| १३. | तंजोर | २ | २६,९०४ | १६,१३३ |
| १४. | मन्नरगुडी | २ | २९,९३२ | ३०,११६ |
| १५. | अरियालुर | २ | २२,६५६ | २०,५२० |
| १६. | सत्तूर | २ | ३०,९८८ | २९,५३० |
| १७. | मजपूरम | २ | २८,२२९ | २८,०८५ |
| १८. | नमक्कल | २ | १५,४२२ | १५,०८५ |

✷ फेब्रुवारी १९४६ निवडणूक निकालांची आकडेवारी

# परिशिष्ट तीन

## मालिका दुसरी ✷

**ज्या मतदारसंघात निवडून येण्याकरिता अस्पृश्यांना राखीव जागा आवश्यक होत्या असे मतदारसंघ**

| अ. क्र. | प्रांत | अस्पृश्यांकरिता जागा राखून ठेवलेल्या आहेत अशा मतदार संघाची संख्या | निवडणुक लढावी लागली अशा मततदार संघाची संख्या | हिंदु उमेदवारांची संख्या जास्त असल्यामुळे निवडणूक घेणे भाग पडले असे मतदारसंघ | अस्पृश्य उमेदवारांची संख्या जास्त असल्यामुळे निवडणूक घेणे भाग पडले असे मतदारसंघ | स्पृश्य आणि अस्पृश्य असे दोन्ही उमेदवार जास्त असल्यामुळे निवडणुक घेणे भाग पडले अशा मतदारसंघाची संख्या | ज्या मतदार संघात निवडणूक जिंकण्याकरिता राखीव जागांवर विसंबून राहणे अस्पृश्य उमेदवारांस भाग पडले अशा मतदार संघाची संख्या |
|---|---|---|---|---|---|---|---|
| १ | २ | ३ | ४ | ५ | ६ | ७ | ८ |
| १. | मद्रास | ३० | १८ | १४ | १७ | | |
| २. | बंगाल | ३० | २४ | १९ | २४ | १९ | काही नाही |
| ३. | मुंबई | १५ | १५ | १५ | १५ | १५ | काही नाही |
| ४. | मध्यप्रांत | २२ | १७ | १४ | १७ | १४ | २ |
| ५. | उत्तर प्रदेश | १५ | ११ | ५ | ११ | ६ | २ |
| ६. | आसाम | - | - | - | - | - | काही नाही |
| ७. | ओरीसा | - | २ | - | २ | - | २ |
| ८. | पंजाब | ८ | - | - | - | - | - |

✷ फेब्रुवारी १९४६ निवडणूक निकालांची आकडेवारी

## मालिका तिसरी ✷

### स्पृश्य हिंदु आणि अस्पृश्य मतदार यांचे परस्पर संख्याबळ

#### १ - मद्रास

| अ.क्र. | मतदारसंघ | मतदार संघांतील एकूण मतदार | मतदार संघातील अस्पृश्य मतदार | रकना २ आणि रकाना ३ चे परस्पर प्रमाण |
|---|---|---|---|---|
| १ | २ | ३ | ४ | ५ |
| १. | मद्रास शहर - दक्षिण मध्य | २६,९२२ | ४,०८२ | १:६.६ |
| २. | चिककोले | ९०,४९६ | ८,०७० | १:११.२ |
| ३. | अमलापूरम | ९५,९५४ | २८,२८२ | १:३.४ |
| ४. | कोकोनाडा | ८६,९३२ | १७,६१६ | १:४.९ |
| ५. | एल्लोर | ८८,२४९ | १६,८३५ | १:५.२४ |
| ६. | ओंगल | १,१०,१५२ | ११,२३३ | १:९.८ |
| ७. | गुडुर | ५२,४१५ | १०,२६३ | १:५.१ |
| ८. | चुडापा | ९२,५७२ | १०,८४२ | १:८.५ |
| ९. | पेणुकोंडा | ७४,९५२ | ११,८९६ | १:६.३ |
| १०. | बेल्लारी | ८५,९२८ | १०,१४६ | १:८.५ |
| ११. | कर्नूल | ७२,७५३ | ११,६७९ | १:६.२ |
| १२. | तिरुतन्नी | ७७,३३७ | १५,२४३ | १:५.०७ |
| १३. | चिंगलपुट | ७३,५५४ | २२,१८२ | १:३.३ |
| १४. | तिरुवल्लुर | ८१,८१४ | २१,२८७ | १:३.८ |
| १५. | रानीपेठ | २४,४०३ | ११,२७१ | १:२.१ |
| १६. | तिरुवन्नमलाई | ९७,२५९ | १५,५३६ | १:६.२ |
| १७. | तिंडीबनम | ८५,५१४ | १९,२२१ | १:४.४ |

✷ फेब्रुवारी १९४६ निवडणूक निकालांची आकडेवारी

# मालिका चवथी ✷

## प्राथमिक आणि अंतिम निवडणूक निकालांची तुलना

| क्र. | मतदार संघ | अंतिम निवडणूकीत यशस्वी झालेला अस्पृश्य उमेदवार नांव | पक्ष | मिळाले ली मते | साधारण निवडणुक लढविणाऱ्या उमेदवारांत त्यांचा क्रमांक | एकसदस्यीय मतदारसंघ समजल्यास त्या उमेदवाराचे प्राथमिक निवडणुकीतील स्थान | प्राथमिक निवडणुकीत मिळवलेली मते | प्राथमिक निवडणुकी तील त्याचे यश निर्णायक |
|---|---|---|---|---|---|---|---|---|
| १ | २ | ३ | ४ | ५ | ६ | ७ | ८ | ९ |
| १. | असलापुरत | पांडु लक्ष्मण स्वामी | कॉंग्रेस | ४८,५२४ | तिघात पहिला | तिसरे (पराभूत) | २,६८३ | - |
| २. | कोकानाडा | बी.एस.मुर्ती | कॉंग्रेस | २८,५४४ | चौथात दुसरा (२ हिंदुना पराभूत करुन) | चवथे (पराभूत) | १,४११ | - |
| ३. | बंदर | वेसूल कुरमय्या | कॉंग्रेस | ७०,९३१ | सहात प्रथम (४ हिंदूंना पराजित करुन) | दुसरे (पराभूत) | ४,९१४ | - |
| ४. | चुडापा | स्वर्ण नागय्या | कॉंग्रेस | -- | चौथात पहिला (१ हिंदू व २ अस्पृश्यांना पराजित करुन) | पहिले | ३,४८२ | निर्णायक बहुमत |
| ५. | पेणुकोंडा | डी.कदरिप्पा | कॉंग्रेस | १८,१३५ | पाचात पहिला (२ हिंदू व २ अस्पृश्यांना पराजित करुन) | पहिले | २,५६४ | थोडे बहुमत |
| ६. | तिरुवन्नमली | आर.बंगवेलू | कॉंग्रेस | ३२,१३२ | पाचात पहिला (२ हिंदू व २ अस्पृश्यांना पराजित करुन) | पहिले | १,९६० | थोडे बहुमत |
| ७. | तिंडीवनम | के.कुलशेखरदास | कॉंग्रेस | २५,४४२ | चौघात दुसरा (२ हिंदूना पराजित करुन) | पहिले | २,७८५ | मत विभाजन |
| ८. | मन्नरगुडी | थ्यागु बोईकरार | कॉंग्रेस | ३०,११६ | पाचात पहिला (४ हिंदूना पराजित करुन) | पहिले | २,८९५ | मत विभाजन |

✷ फेब्रुवारी १९४६ निवडणूक निकालांची आकडेवारी